किंमत १ रुपया
( वा. वर्गणी ६ रु. )

Reg. No. B. 3434 Licence No. 53.
Licenced to post without prepayment

# अर्थ

वर्ष २२

## दिवाळी अंक

अंक ४३

१९५६

भारताचें उज्ज्वल भवितव्य यशस्वी सहकारी जीवनावर अवलंबून आहे:
सहकारी औद्योगिक क्षेत्रांत सहकारी साखर कारखाने आघाडीवर आहेत !

सहकार्यांतून जन्मास येणारी पवित्र व असीम शक्ति संपादन करून
तिच्या जोरावर औद्योगिक भरभराट करतां येते हें स्वकृतीनें सिद्ध
करणारी, इतरांस स्फूर्तिदायी व ललामभूत झालेली, केवळ शेतकऱ्यांनींच
जन्मास घातलेली व शेतकऱ्यांनींच चालविलेली

सहकारी साखर-कारखान्यांची जन्मोत्री म्हणजेच

दि सासवड माळी शुगर फॅक्टरी
लिमिटेड

माळीनगर जि. सोलापूर स्थापना : १९३२

★ मॅनेजिंग डायरेक्टर ★
हरीभाऊ बळवंतराव गिरमे

★ चेअरमन ★
मारुतीराव खंडुजी पांढरे

★ मॅनेजर ★
जी. एस. कारभारी, एम्. ए., एलएल. बी.

ही दीपावली व नूतन वर्ष आपणांस भरभराटीचें जावो !

तार : " CENCOBANK "　　　　फोन : २४८१

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि०

**दीपावलीचा शुभसंकल्प सहर्ष जाहीर करीत आहे.**

पूर्वींचें सर्व भाग-भांडवल खपल्यामुळें आपलें अधिकृत भाग भांडवल

**पांच लाखांनीं**

वाढविण्याचें बँकेनें ठरविलें आहे

ही दिवाळी आणि येतें वर्ष आमच्या सर्व ऋणानुबंधीयांना व हितचिंतकांना सुखसमृद्धीचें जावो !

वा. ग. अळतेकर,
कार्यकारी संचालक.



# धी बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. ३८३८१-८१ | चेअरमन **श्री. रमणलाल जी. सरैय्या** | पोस्ट बॉक्स नं. ४७१ तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल— | भागीदारांतर्फे रु. ३५,४५,६०० <br> मुंबई सरकारतर्फे रु. २६,००,००० | रु. | ६१,४५,६०० |
| गंगाजळी व फंड | .... .... .... | रु. | ५६,०३,५०० |
| ठेवी | .... .... .... | रु. | १२,८५,९७,२०० |
| खेळतें भांडवल | .... .... .... | रु. | १५,३९,९१,२०० |

## १३ जिल्ह्यांमध्यें ६० शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते.

सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात, शर्तीसाठीं चौकशी करावी.

दा. पुं. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

दिवाळी अंक

नोव्हेंबर, १९५६





स्थापना : १९३५

संस्थापक :

प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौधर्मकामाविति ।*

*—कौटिलीय अर्थशास्त्र*

---

★ ही दिवाळी व नवें वर्ष ★

## आमच्या वाचकांना

व

## हितचिंतकांना

सुखसमृद्धीचें जावो !

---


## बार्शी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, बार्शी

स्थापना १९०६

हेड ऑफिस : बार्शी　　　　शाखा : वैराग

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ३,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १,२१,५७० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. | १,४१,६०६ |
| ठेवी | रु. | १८,००,१६५ |
| कर्जें | रु. | ९,८९,३३५ |
| खेळतें भांडवल | रु. | २१,०४,४१५ |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात

ठेवीदार, सभासद, सर्वांच्या सहकार्यानें सुवर्ण महोत्सव साजरा करणारी व तालुका क्षेत्र असलेली सहकारी संस्था.

वि. ए. रेडे　　　　रा. गो. परंडकर
मॅनेजर.　　　　चेअरमन.

महाराष्ट्रांतील आदर्श व अद्यावत् यंत्रसामुग्रींनीं सुसज्ज असा साखर कारखाना म्हणजेच

## दि कोल्हापूर शुगर मिल्स लिमिटेड

कोल्हापूर

या कारखान्यांतून शुभ्र दाणेदार साखर, डिनेचर्ड स्पिरिट व फर्निचरसाठी उपयुक्त असें फ्रेन्च पॉलिश यांचा नियमित व मोठ्या प्रमाणांत पुरवठा केला जातो. आमचा माल मुंबई इलाखा, दख्खन व देशांत इतरत्रहि पुरविला जात असून मालाच्या चांगुलपणाबद्दल सर्वत्र ख्याति आहे.

अद्यावत् सुधारणा व कलात्मक रचना हें आमच्या कारखान्याचें वैशिष्ट्य आहे.

मॅनेजिंग एजंटस्

दि युनायटेड एजन्सीज लिमिटेड,
कोल्हापूर.

# पुढे पाऊल

## " जीवन शास्त्र " वरील उपयुक्त पुस्तक

[ लेखक-प्रकाशक : श्री. श्री. वा. काळे, दुर्गाधिवास, पुणें ४. पृष्ठें १३१. मूल्य २ रुपये ]

" कण आणि क्षण " या वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकाच्या लेखकानें त्याच प्रांतांत टाकलेलें हें पुढचें पाऊल आपल्या भावंडाच्या मानानें अधिक प्रौढ आणि व्यापक दृष्टिकोन असलेलें आहे !

रोजच्या व्यवहारांत घडणाऱ्या कित्येक घडामोडींचें यांत एक आगळेंच दर्शन आपल्याला घडतें. यांपैकी कित्येक गोष्टी आपल्याला पूर्वीच कशा ना कशा रीतीनें उमगलेल्या असतात. पण त्याचें असें सुस्पष्ट स्वरूप आपल्याला दिसलेलें नसतें. खाजगी आणि सामाजिक जीवनांत व्यक्तीचें काय नि कुठें चुकतें हें शोधून काढण्याचा या लेखकाचा दांडगा हव्यास. मात्र हा हव्यास त्यांनीं निव्वळ उपहासासाठीं बाळगलेला नाहीं. श्री. काळे यांचें अवलोकन सूक्ष्म आहे. ज्ञानहि चौरस आहे. घरच्या नि दारच्या दोन्ही गोष्टींबद्दल ते अधिकारानें बोलूं शकतात.

स्त्री-पुरुषांच्या मिश्रजीवनांतील खाचखळगे त्यांना दिसतात नि त्यांचें तें मार्मिक विवेचन करतात. त्यांत नडतं तें भगिनींचं, हें जाणून " मनावर डोक्याचा ताबा राखा " हें सूत्र ते सांगून ठेवतात. कॉलेजांत जाणाऱ्या मुलींपैकीं कांहींच्या गैरवर्तनाचीं कारणें शोधून, आईबापांनीं विशेषतः आयांनीं या बाबतींत कसें दक्ष राहायला हवें, ह्या बाबतींत महत्त्वाचा सल्ला त्यांनीं दिला आहे. ' संसारांतील सारंगी ' हा लेख समान हक्कावरून भांडणाऱ्या स्त्रियांना मार्गदर्शक ठरेल असाच आहे. या लेखांतहि स्पर्धेपेक्षा सहकार्य हिताचें आहे असा सल्ला ते देऊन ठेवतात. ' चांगले आणि वाईट शेजारी ', ' पाहुण्यांनो, यजमानांचा चष्मा लावा ! ' अगर ' वरसंशोधनाची आर्थिक मीमांसा ' हे लेख व्यावहारिक दृष्ट्या फार उपयुक्त असे आहेत. नेहमीं खुपत राहणाऱ्या या गोष्टी मार्मिकपणानें हेरून त्यांनीं चातुर्यानें सांगितल्या आहेत. याबरोबरच, बॉब केसांच्या प्रश्नावरून व्यक्ति आणि समाज यांच्या एकमेकांवरील नियंत्रणाची चर्चा केली आहे, तीहि चांगली आहे.

' तुम्ही चांगला पति होऊं शकतां ' हा लेख सूत्रबद्ध असला, तरी लेखकाच्या व्यापक निरीक्षणक्षेत्राची कल्पना देणारा आहे. घरगुती विषयांत घरगुती दाखले देऊन, तर सामाजिक विषयांत आपल्या आणि परकीय समाजांतील घडामोडींचें वर्णन करून हातीं घेतलेल्या विषयावर सुस्पष्ट विवेचन केलेलें दिसतें. असें हें ' जीवनशास्त्र 'वरील लेखन खरोखरच आजच्या वाचकांना अतिशय उपयुक्त ठरणारें आहे. श्री. काळे यांचें अवलोकन नि अनुभवाचें क्षेत्र वाढत आहे. त्याचा उपयोग अधिक ललित स्वरूपाचें लिखाण करून अधिकाधिक वाचकांना त्यांनीं करून द्यावा.

—केसरी, २६-१०-५६

## लेखकाला वाचकांनीं स्वयंस्फूर्तीनें कळविलेलीं मतें

" लिखाण ' अपूर्व ' आहे ! मनोरंजक भाषेंत, घरगुती दृष्टांतांनीं, सामाजिक जीवनांतीळ नैतिक सत्यें काय आहेत, ह्याची ओळख करून दिली आहे. " यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति" त्या त्या वेळीं सुविचार स्फुलिंगाचा अवतार घेतो व तो समाजाची पकड घेतो, हा अनुभवाचा सांठा आपल्या धर्मानें आपणांस दिला आहे, ह्यावर अशीं पुस्तकें वाचलीं म्हणजे विश्वास दृढतर होतो. "

के. व्ही. चाफेकर, पुणें.

" पांढरपेशा वर्गाच्या १५० ते ४०० रु. मासिक मिळकत असलेल्या समाजाच्या समस्यांचें समतोल दृष्टीनें परीक्षण, आकलन व उपाय यांचें दिग्दर्शन फारच समर्पक आहे. या समाजाचें आजचें डोकेंदुखी उत्पन्न करणाऱ्या प्रश्नांचें विवेचन मार्गदर्शक आहे. "

लक्ष्मीबाई गोखले, अ. न. गोखले, मुंबई.

" मला व माझ्या पत्नीला पुस्तक फार आवडलें. दैनंदिन जीवनांतील खांचखळगे अत्यंत सफाईदार पद्धतीनें उकलून दाखविले असून त्यावर उत्कृष्ट तोडगाहि सुचविला आहे. "

कु. धों. शिराळकर, मिरज.

" प्रत हातीं पडतांक्षणींच आमच्या घरांत वाचण्याची जणूं चढाओढच लागली होती. लेखकाचा जवळून परिचय झाल्यावर त्याच्या लेखणींतून उतरलेल्या साहित्याची गोडी कांहीं आगळीच वाटते. "

मनोरमा नगरकर, मुंबई.

" पुढे पाऊल " पाहून आम्हांला किती आनंद झाला म्हणून सांगूं ? वाचकांच्या विचारांना चालना देऊन त्याच्या व समाजाच्या जीवनांत अनुकूल बदल घडवून आणण्याचें आपलें कौशल्य वाखाणण्यासारखें आहे. "

य. गो. नित्सुरे, पुणें.

" सामाजिक विषयावरील आपलें लिखाण होईपर्यंत, समाजांत असे अनंत लहानलहान प्रश्न आहेत, कीं जे नीट रीतीनें हाताळले नाहींत, तर ते मनःक्षोभाला व कुरबुरीला कसे कारणीभूत होतात, याचें मर्म मराठी साहित्यक्षेत्रांत तरी अनेक लेखकांच्या ध्यानांत आलें नव्हतें. "

वि. त्र्यं. शेटे, पुणें.

" आपलें लेखन व विचार आम्हांस नेहमीं पटतात व आवडतात. असेंच लेखन आपण सदैव करावें अशी आमची ईश्वरास प्रार्थना आहे. "

सुमति संत, प्र. वि. संत, पुणें

" आपले विचार उपयुक्त व मार्गदर्शक आहेत. आपलीं पुढील पुस्तकें वाचण्यासाठीं इतर अनेक वाचकांबरोबर मीहि अत्यंत उत्सुक आहें. "

अ. रा. नाईक, बेळगांव.

" माझ्याप्रमाणें माझी पत्नी व मुलें ह्यांनींहि पुस्तक काळजी-पूर्वक वाचलें व त्यापासून त्यांना बराच बोध मिळाला. त्यामुळें आमच्या आयुष्यक्रमास एक नवीनच चालना मिळत आहे, त्याचें श्रेय तुम्हांसच आहे. "

द. के. जायफळकर, बार्शी.

" आपल्या सूक्ष्म दृष्टीचें आम्ही सर्वच जण फार कौतुक करीत आहों. विशेषतः ' बॅडमिंटन कोर्टवरील शिष्टाचार ' हा लेख म्हणजे अगदीं ॲटम बॉंब ठरला आहे. "

मा. गो. धारप, महाड.

# अ नु क्र म णि का


१ द्वितीय पंचवार्षिक योजनेचें सत्यस्वरूप ... ३४३
२ भारताच्या आर्थिक योजनांचें गुणदोष विवेचन ३४७
३ भारत सरकारची कर्जविषयक परिस्थिति ... ३५१
४ दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सहकारी लक्ष्यें ... ३५३
५ कारखानदारीचे कांहीं प्रश्न ... ३५५
६ बिनसरकारी कंपन्यांना भांडवल उभारणीची परवानगी ... ३५८
७ कापड गिरणीची आंतून पहाणी ... ३५९
८ सहकारी संस्थांची कुचंबणा आणि कर्जें थकविणारांची सोय ... ३६७
९ सहकारी लवादपद्धति ... ३७१
१० सहकारी न्यायदान दिवाणी कोर्टाकडूनच झालें पाहिजे ! ... ३७३
११ सहकारी संस्थांतील निवडणुकाबाबत लवाद दावे ... ३७५
१२ मुंबई राज्यांतील कांहीं मोठ्या सेंट्रल व अर्बन सहकारी बँका ... ३७६
१३ हिंदी औद्योगिक उत्पादनांत वाढ ... ३७७
१४ हिंदी चहाचा धंदा ... ३७८
१५ बँकिंगच्या परिसरांतील विनोद ... ३८०


## "अर्था"चा पुढील अंक

"अर्था"चे दिवाळीनंतरचे दोन अंक नेहमीप्रमाणें बंद राहतील. म्हणजे दि. ७ व दि. १४ नोव्हेंबरचे अंक निघणार नाहींत.




फोन नं. ११७ ] [ पोस्ट बॉक्स ३१

## दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑप. बँक लि., सोलापूर

स्थापना:—सन १९१८

( सोलापूर जिल्ह्याची सेन्ट्रल फायनान्सिंग एजन्सी )

शाखा :—कुर्डुवाडी, पंढरपूर, करमाळा, अक्कलकोट, मंगळवेढा, अकलूज, नातेपुते, सिद्धार्थ ( सोलापूर )

उपशाखा :—सांगोला, मोहोळ, मोडलिम्ब, माढा.

सेल शॉप :—अकलूज.

| | | |
|---|---|---|
| खपलेलें भांडवल | रु. | ७,९१,००० |
| फंडस् | रु. | १०,८०,००८ |
| ठेवी | रु. | ८९,८०,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १,१३,००,००० |

चेअरमन :—श्री. जी. डी. साठे, एम्. एल्. सी., (माढा)

व्हा. चेअरमन :—श्री. एम्. एल्. पाटील.

ही संस्था जिल्ह्यांतील सर्व सहकारी संस्थांना शेतीच्या उत्पादनासाठी कर्जपुरवठा करते. तसेच बँकेचे हेड-ऑफिसांतून व शाखा ऑफिसेसमधून सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

सी. एस. परांजपे,
मॅनेजर.

महाराष्ट्रांतील नागरी सहकारी चळवळींतील [illegible] प्रत्येक वर्षीं लोकादरास व ठेवीदारांच्या विश्वासास पात्र असलेली एकमेव नागरी सहकारी संस्था

## दि पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. पंढरपूर ( जि. सोलापूर )

| | | |
|---|---|---|
| ( १ ) शेअर भांडवल | ... रु. | ६६,२१० |
| ( २ ) रिझर्व्ह फंड | ... रु. | ५०,२१० |
| ( ३ ) इतर फंडस् | ... रु. | ५६,३१७ |
| ( ४ ) ठेवी | ... रु. | १०,३७,४०६ |
| ( ५ ) सरकारी कर्जरोख्यांत गुंतविलेली रक्कम | ... रु. | ४,५३,४१३ |
| ( ६ ) खेळतें भांडवल | ... रु. | १२,३७,४२४ |

या बँकेंत मुदतीच्या ठेवी, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक्स, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदी–विक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

तसेंच सभासदांमध्यें बचतयोजनेचा प्रचार करणेचे दृष्टीनें या बँकेंत 'सभासद प्रॉव्हिडंट फंड' पद्धति सुरू केली असून, सभासदाचे आजारीपणांत उपयुक्त अशीं उपकरणें पुरविणेकरितां 'रुग्णसाहाय्यक शाखा' उघडली आहे.

दागदागिने, मौल्यवान् वस्तु व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं अवश्य फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां ऑफिसकडे लिहा.

पं. रा. कुलकर्णी, जी. डी. सी. अँण्ड ए. मॅनेजर | औ. ह. कवठेकर चेअरमन

ही दीपावलि आमचे भागीदारांना व खातेदारांना सुखसमृद्धीची जावो !

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि०

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

भांडवल

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल ... ... | रु. | १६,००,००० |
| गंगाजळी वगैरे ... ... | रु. | ८,७५,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. | ७,००,००,००० |

: संचालक मंडळ :

| | | |
|---|---|---|
| श्री. वा. पुं. वर्दे ( अध्यक्ष ) | श्री. न. ग. पवार | श्री. धों. कृ. साठे |
| श्री. मा. रा. जोशी | श्री. फ. दो. पदमजी | श्री. मा. बी. शहा |
| श्री. भा. म. गुप्ते | श्री. म. बा. जांभेकर | श्री. म. स. पारखे |

★ शाखा ★

अहमदनगर, अमरावती, औरंगाबाद, बेळगांव, मुंबई ( फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार ), भिवंडी, चाळिसगांव, धुळें, हरिहर, हुबळी, द. हैदराबाद, जळगांव, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नाशिक, पनवेल, पुणें ( भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी ), रत्नागिरी, सांगली, सोलापूर, श्रीरामपूर व ठाणें.

याशिवाय अकोला व जालना येथें बँकेच्या शाखा नुकत्याच सुरू झाल्या आहेत.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता,
पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर.

# द्वितीय पंचवार्षिक योजनेचें सत्यस्वरूप

## ' सामान्य ' माणसाच्या श्रमावर, त्यागावर व सहनशक्तीवर सर्व कांहीं अवलंबून

मूळ लेखक :—डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव | अनुवादक:—श्री. पां. कृ. देवधर, बी. कॉम्.

भारताच्या द्वितीय पंचवार्षिक योजनेंतील निरनिराळया उद्दिष्टांची सर्वसामान्य रूपरेषा देणारा आराखडा प्रसिद्ध झाला आहे. तेव्हां तो पाहून या योजनेचा भारतांतील सामान्य माणसाच्या जीवनाशीं काय संबंध आहे हें पहाणें उचित ठरतें. आतां 'सामान्य माणूस' कोण ? हें कांहीं अगदीं एखाद्या व्याख्येंत बसवून समाधानकारकपणें सांगतां येणार नाहीं. परंतु 'सामान्य माणूस' हे दोन शब्द उच्चारतांच उच्च सरकारी अधिकारी, व्यापारी किंवा इतर उच्च धंदेव्यवसायांतील व्यक्तींचीं चित्रें आपल्या डोळयासमोर नक्कीच येत नाहींत; तर शेतकरी, शेतमजूर, कामकरी, गिरणीकामगार यांच्याच आकृत्या आपल्या डोळयांसमोर येतात.

### ' सामान्य ' माणसाचें महत्त्व

हा 'सामान्य' माणूस एकूण जनतेंतील गरीब वर्गाचा प्रतिनिधि म्हणतां येईल. त्याच्या राहणीचें मान निकृष्ट असतें, त्याची उत्पादनशक्ति कमी असते, त्याची कर देण्याची पात्रता कमी असते कारण त्याचें उत्पन्नहि कमी असतें आणि शिल्लक तर त्याजपाशीं नसतेच म्हणाना. त्याचप्रमाणें त्याला योग्य आणि आवश्यक असें काम मिळालेलें नसतें किंवा तो बेकारहि असूं शकतो. परंतु त्याच्या आर्थिक बाबींतील इच्छा-आकांक्षा उच्च असतात आणि त्याची राजकारणांतील शक्ति विचार करण्याइतपत असते. आणि म्हणून त्याला सारे कळल्याखेरीज, त्याची मदत मिळाल्याखेरीज किंवा त्याचें प्रत्यक्ष सहकार्य या योजनेला मिळाल्याखेरीज ही योजना यशस्वी होणें कठीण आहे. आणि म्हणून सामान्य माणसाच्या दृष्टिकोनांतून या योजनेकडे पहाणें महत्त्वाचें व आवश्यक आहे. ही योजना या सामान्य माणसाला काय देऊं इच्छिते ? ती त्याच्यापासून कोणत्या गोष्टींची अपेक्षा करिते ? या योजनेच्या कालांत त्यानें काय कार्य करावें, असें ही योजना इच्छिते ? असे हे नाना प्रश्न आहेत कीं ज्यांचीं उत्तरें शोधणें जरूर आहे.

सुरुवातीलाच हें सांगितलें पाहिजे कीं, त्या सामान्य माणसाच्या जीवनमानाच्या पातळींत ही योजना संपण्याचे वेळीं सुधारणा दिसून येईल. म्हणजे आतां आहेत त्यापेक्षा चांगले दिवस त्याला त्यावेळेस दिसूं लागतील. धान्य, फळें, भाज्या, दूध आणि दुधाचे पदार्थ, तेलें, साखर, कापड, राहण्याची जागा, वैद्यकीय मदत, शिक्षण, वीज, प्रवासाचीं साधनें आणि इतर कारखान्यांत आणि फॅक्टरींत उत्पन्न होणाऱ्या जीवनावश्यक गोष्टी इत्यादि बाबतींत तो जास्त सुखी होईल. ही योजना सामान्य माणसाच्या राहणींत कांहीं कमतरता आणणार नाहींच, पण अधिक जीवनावश्यक वस्तू आणि सुखसोयी त्याला प्राप्त करून देऊन त्याच्या राहणीचें मान वाढवील अशी अपेक्षा आहे.

### कांहीं गैरसमज

परंतु या साध्या गोष्टीसंबंधीं निरनिराळया लोकांच्या बोलण्यानें जनतेंत जो गैरसमज पसरलेला आहे त्याविषयींहि कांहीं सांगितलें पाहिजे. हें खरें आहे कीं, ही योजना मोठ्या उद्योगधंद्यांच्या वाढीला प्राधान्य देत आहे आणि तिची इच्छा सर्वसामान्यपणें देशांतील उत्पादनशक्ति वाढावी अशी आहे. पण त्याचा अर्थ असा नव्हे, कीं हीं उद्दिष्टें तीं सामान्य भारतीय माणसाच्या राहणीचे मानांत घट निर्माण करून साध्य करणार आहे.

दुसराहि एक गैरसमज असा पसरलेला दिसतो आहे कीं, ही योजना सर्वस्वीं जीवनावश्यक वस्तूंचें आणि सुखसोयींचें उत्पादन करण्याकरितां आहे. जरी सर्व उत्पादनाचें अंतिम ध्येय त्याचा योग्य तो उपयोग व्हावा हें असलें तरी प्रगत अशा उत्पादनाच्या निरनिराळया पद्धती वापरून ज्यावेळेस प्रत्यक्ष जीवनावश्यक नसलेल्या गोष्टींचें उत्पादन केलें जातें त्यावेळेसहि त्याचा हेतु जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादनांत वाढ व्हावी हाच असतो.

### मुख्य भर कशावर ?

आणि ज्या देशांत औद्योगिक विकासाला जेमतेम प्रारंभ झाला आहे, त्या भारतासारख्या देशाच्या बाबतींत तर, एकूण उत्पादनशक्ति वाढविण्यासाठी जीवनावश्यक असलेल्या वस्तूंचें आणि सुखसोयींचें उत्पादन करण्यापेक्षा जास्ती भर जीवनावश्यक उत्पादनाला आवश्यक असलेल्या वस्तूंचें उत्पादन करण्याकडे दिला पाहिजे. आणि म्हणूनच देशांतील अर्थव्यवस्थेंतील घडामोडींबरोबर धंदेव्यवसायांच्या उपलब्धतेंत व वैयक्तिक उत्पन्नांत वाढ होऊनहि लगोलग जीवनावश्यक वस्तूंच्या आणि सुखसोयींच्या परिमाणांत वाढ होत नाहीं.

निरनिराळया वस्तूंच्या उत्पादनांत गुंतविलेल्या रकमेच्या वाढीबरोबर जरी वैयक्तिक उत्पन्नेंहि वाढत असलीं तरी त्याचा अर्थ जीवनमानाची पातळी वाढली असा होत नाहीं. ह्याला कारणें दोन. एक तर आतां सांगितल्याप्रमाणें हें उत्पादन केवळ जीवनावश्यक वस्तूंचें होत नाहीं आणि दुसरें कारण म्हणजे ही योजना संपण्याचे वेळीं जो जीवनावश्यक वस्तूंचा सांठा असेल तो योजनेच्या प्रारंभकाळीं असलेल्या लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्येंत विभागला जाईल. कारण दर वर्षी ४० लक्षांची भर या देशाच्या लोकसंख्येंत पडत आहे.

### ' सामान्य ' माणसाचा फायदा

तेव्हां या योजनेनें वाढलेल्या राष्ट्रीय उत्पन्नावर दोन मुख्य दावेदार हक्क सांगूं लागतील. एक म्हणजे बचतयोजना आणि दुसरा म्हणजे वाढती लोकसंख्या आणि म्हणून या योजनेनें एकूण राष्ट्रीय उत्पन्नांत जितक्या वेगानें वाढ होईल त्यापेक्षां कमी वेगानें सरासरी जीवनमानांत प्रगति किंवा सुधारणा घडून येईल. आणि ही वस्तुस्थिति ध्यानांत घेऊनच ही योजना मांडणाऱ्यांनीं विशेष आग्रहानें बचतयोजनांकडे जास्त लक्ष देण्याची व खर्चावर नियंत्रण ठेवण्याची सूचना केली आहे.

यानंतर ही योजना सामान्य माणसापासून कोणत्या प्रकारच्या सहकार्याची अपेक्षा करते हें सांगण्यापूर्वी ही योजना त्याला त्याच्या श्रमाचा, सहकार्याचा मोबदला म्हणून काय देऊं इच्छिते हें पाहूं. ही योजना सामान्य माणसाला त्याच्या

नित्याच्या गरजेच्या वस्तू तर प्राप्त करून देईलच, पण त्याला योग्य असा कामधंदा मिळवून देईल आणि बेकारीपासून त्याला कांहीं अंशीं दूर करील. या योजनेमुळें जवळ जवळ ८० लक्ष नवीन उद्योगव्यवसाय निर्माण होतील. यांपैकी २७ लक्ष उद्योगव्यवसाय वैयक्तिक सामर्थ्यावर पुढें येऊं पहाणाऱ्यांना संधि देणाऱ्या स्वरूपाचें आहेत. तसेंच या योजनेनें नोकरी धंद्यांच्या उपलब्धतेंत वाढ झाल्यानें आज ज्यांना नोकरीधंदे आहेत परंतु त्यापासून त्यांना मिळणारीं उत्पन्नें पुरेशीं नाहींत अशांच्या उत्पन्नांत वाढ होईल.

त्याचप्रमाणें आज ज्यांना नोकरीधंदे आहेत परंतु त्यांच्या उत्पादनशक्तींत अपुरेपणा असल्यानें, कमतरता असल्यानें ज्यांना पुरेशीं वेतनें मिळत नाहींत अशांच्या उत्पन्नांत पाटबंधारे, वीज, खतें आणि तांत्रिक ज्ञान यांच्यांतील वाढीमुळें नक्कीच सुधारणा घडून येईल. मी नुसतें हें अतिशयोक्तीचें चित्र रंगवितों कामा नये. या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीसहि या देशांत बेकारी राहील, कमी उत्पन्न देणारें व्यवसाय असतील आणि कमी उत्पादनशक्तीहि असेल. परंतु तुलनात्मक दृष्ट्या आजच्या-पेक्षा त्यावेळेस स्थिति बरी असेल.

राष्ट्रीय उत्पन्नांतहि जी पंचवीस टक्के वाढ करावयाची आहे ती, ही योजना, आर्थिक क्षेत्रांतील कांहीं ठराविक बाबींवरच जास्त लक्ष केन्द्रित करून आणि त्यांची उत्पादनशक्ति विशेषत्वानें वाढवून साध्य करणार नाहीं. तर ही औद्योगिक विकासाची खटपट अर्थव्यवस्थेतील साऱ्या विभागांत करून आणि जास्तींत-जास्त लोकांशीं संबंध ठेवून केली जाणार आहे. कारण त्यामुळें वाढलेल्या उत्पादनाचा विनियोगहि आपोआप जास्त प्रमाणावर होईल.

तेव्हां शेतीच्या उत्पादनांतील वाढ जास्तींत जास्त शेतकऱ्यांत विभागली जाईल आणि औद्योगिक क्षेत्रांतील उत्पादनांतील वाढ ही लहान लहान धंद्यांतून काम करणाऱ्या जास्तींत जास्त मजुरांत विभागली जाईल. त्याचप्रमाणें व्यापार क्षेत्रांत आणि प्रवास व सार्वजनिक सुखसोयींच्या क्षेत्रांत जी उत्पन्नवाढ आणि नोकरीधंदा मिळण्याच्या बाबतींत वाढ होईल तीसुद्धां जास्तींत जास्त लोकांना फायदेशीर ठरेल. आणि विशेष म्हणजे या योजनेनें वाढीस लागणारी औद्योगिक हालचाल अशा प्रकारची आहे कीं ती ह्या देशांतील जास्तींत जास्त सामान्य माणसांवर आपला प्रभाव दाखविणार आहे.

या योजनेनें अशा प्रकारें या देशांतील बहुसंख्य लोकांना नोकऱ्या मिळतील किंवा त्यांची उत्पादनशक्ति वाढेल आणि म्हणून त्यांचें उत्पन्न आणि जीवनमान वाढेल ही गोष्ट लक्षांत घेतां या योजनेला ‘ लोकांची योजना ’ किंवा ‘ सामान्य भारतीय माणसांकरितां केलेली योजना ’ असें म्हणणें सयुक्तिक ठरेल.

### कांहीं बुद्धिपुरःसर प्रयत्न

यानंतर या देशांत अशा प्रकारें वाढलेल्या उत्पादनाचा विनियोग उत्पादकांच्या मार्फत करण्याबाबतचे कोणकोणते मार्ग ही योजना अवलंबिणार आहे हें पहाणेंहि रास्त ठरेल. पहिली गोष्ट म्हणजे या योजनेनें वाढीस लागणाऱ्या पाटबंधाऱ्यांच्या योजनांचा आणि विजेच्या सोयींचा फायदा देशाच्या कांहीं ठराविक भागालाच मिळणार नाहीं, तर ज्या ज्या ठिकाणीं तांत्रिक अडचणी येतील तीं ठिकाणें सोडून साऱ्या देशाला यांचा फायदा मिळेल.

जमीनविषयक सुधारणा करणारे कायदे हे आता निदान आणि तात्विक बैठकीवरून करावयाचे आहेत आणि त्यांत ‘ वैयक्तिक शेती ’ याची काटेकोरपणें व्याख्या करून एका कुटुंबाला इतकीच शेती करावयाला द्यावयाची कीं ज्यापासून सरासरी सोळाशें रुपये उत्पन्न तरी वर्षाकांठीं मिळालें पाहिजे. जीं शेतें मालकाला कधींहि आपल्या हातांत परत घेतां येतील अशा शेतांवरील कुळांना संरक्षण देण्याची व्यवस्था या योजनेंत केली आहे आणि कुळानें मालकाला द्यावयाचा खंड हा त्यानें केलेल्या शेतीपासून मिळणाऱ्या एकूण उत्पन्नाच्या पांचवा हिस्सा ठरविलेला आहे; मग तें शेत देशांतील कोणत्याहि भागांत असो.

प्रत्येक कुटुंबाला कमींत कमी जरूर असणाऱ्या जमिनीच्या तिप्पट जमीन त्या कुटुंबांतील कर्ता, त्याची बायको, मुलगे, मुली, नातवंडें यांच्या नांवानें करून देऊन जमिनीचें फेरवांटप करण्याची योजना या द्वितीय पंचवार्षिक योजनेंत आहे. आणि या नवीन योजनेप्रमाणें मिळालेल्या जमिनीपेक्षा जर जास्त जमीन एखाद्या कुटुंबाची असेल तर ती सरकारी मालकीची होऊन त्याचें मोठ्या प्रमाणावर वांटप होईल. भूदानयज्ञांत दान मिळालेली जमीन शेतीविना असलेल्या शेतमजुरांत वांटावयाची आहे आणि याकरितां फेरआंखणी योजना या योजनेंत समाविष्ट आहे.

राष्ट्रीय विकासयोजनेच्या क्षेत्राखालीं हल्लीं जेमतेम एक-चतुर्थांश लोकसंख्या आहे. परंतु आतां सर्व ग्रामीण लोकसंख्या त्या योजनेखालीं आणण्यांत येणार आहे. आणि या ग्रामीण लोकसंख्येपैकी चाळीस टक्के लोकसंख्येची सर्वांगीण उन्नति करण्याची योजना ग्रामविकास योजनेखालीं करण्यांत आली आहे. सहकारी संस्थांमार्फत शेतकऱ्यांना वेळोवेळीं ज्या रकमा दिल्या जातात त्यांची एकूण रक्कम आतां २२५ कोटी होईल. आतां ती फक्त ४२ कोटी आहे. आणि ही रक्कम प्रत्येक राज्यावारी कशी वापरायची याचा विस्तृत आराखडा तयार आहे. बाजाराशीं संबंधित असलेल्या संस्थाहि जास्तींत जास्त निर्माण करावयाच्या आहेत व सरकार आणि रिझर्व्ह बँक यांच्या आर्थिक मदतीनें मोठीं गुदामें आणि वखारी बांधावयाच्या आहेत.

औद्योगिक क्षेत्रांत हल्लीं जी तंत्रज्ञांची बेकारी जाणवते आहे तिच्या वाढीला आळा घालण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. त्याशिवाय विस्तृत प्रमाणावर खेड्यांपाड्यांतून आणि लहान लहान उद्योगधंद्यांतून नोकऱ्या मिळण्याची शक्यता निर्माण केली जाणार आहे, आणि त्यायोगें विकेन्द्रित अशा समाजाची पायाभरणी केली जाणार आहे. ७५० लक्ष मागासलेल्या लोकांना आर्थिक बाबतींत मार्गदर्शन करण्यासाठी विशेष सोयी करण्यांत आल्या आहेत. या ७५० लक्षांपैकी १९० लक्ष लोक रानटी टोळ्यांत समाविष्ट आहेत. ५२० लक्ष लोक मागासलेल्या जातींत समाविष्ट आहेत आणि ४० लक्ष लोक मागासलेल्या वर्गांत समाविष्ट आहेत. आणि म्हणून या द्वितीय पंचवार्षिक योजनेखालीं असा बुद्धिपुरःसर प्रयत्न करण्यांत येणार आहे, कीं ज्यामुळें जास्तींतजास्त सामान्य माणसें या वाढत्या उत्पादनाला प्रत्यक्षपणें साहाय्य करतील किंवा त्याचा जास्तींत जास्त लाभ तरी घेतील.

### ‘ सामान्य ’ माणसाला द्यावी लागणारी किंमत

परंतु या साऱ्याचा अर्थ असा नव्हे कीं, सामान्य माणसांच्या जीवनांत ही योजना जी कांहीं सुधारणा घडवून आणणार आहे त्याकरितां त्याला कांहींच किंमत द्यावी

लागणार नाहीं आणि सामान्य माणूस अगदीं स्वर्गसौख्य मिळविण्याचे मार्गावर आहे. मी हें मुद्दाम इथें स्पष्ट करूं इच्छितों कीं, ही योजना संपली तरीसुद्धां त्या वेळेस, एकूण जीवनमानांत १२ किंवा १३ टक्क्यांहून जास्त वाढ होणार नाहीं.

कांहीं लोकांना या योजनेचा यत्किंचितहि फायदा होणार नाहीं तर कांहींना त्यांचीं उत्पन्नें वाढल्यानें म्हणा किंवा त्यांच्या कुटुंबांतील इतरांनाहि नोकरीधंदे मिळाल्यानें त्यांच्या बऱ्याच अडचणी दूर झाल्यानें म्हणा, त्यांना त्यांच्या आर्थिक परिस्थितींत सुधारणा दिसेल.

परंतु सर्वच बाबतींत वरवर पाहतां जेवढी सुधारणा दिसेल त्यापेक्षा कितीतरी कमी प्रत्यक्षांत सुधारणा घडलेली असेल. कारण जी जीवनमानाची पातळी पाया धरून सुधारणा करावयाची तीच अत्यंत कनिष्ठ असल्यामुळें एकूण सुधारणा जितकी दिसावी तितकी दिसणार नाहीं आणि जितक्या उंचीला जीवनमानाची पातळी जावयाला पाहिजे त्या पातळीला ती जाणार नाहीं. आणि म्हणून हें अगदीं उघड आहे, कीं या योजनेला चालना देण्यासाठीं, कार्यान्वित करण्यासाठीं जास्तींत जास्त त्रास आणि ताण सामान्य माणसांना सहन करावा लागणार आहे. त्याला जास्ती कर द्यावे लागतील आणि जास्त शिल्लकहि टाकावी लागेल.

### दुसरा मार्गच नाहीं !

अगदींच स्वतंत्र आणि वेगळ्या दृष्टीकोनांतून ही योजना अभ्यासली तर असें दिसून येईल कीं, सामान्य माणसाची खर्च करण्याची शक्ति या योजनेमुळें वाढणार नाहीं किंवा त्याचें उत्पन्नहि त्याच्या सर्व गरजा भागविण्याइतकें वाढणार नाहीं. तरीसुद्धां त्याला या योजनेच्या कार्याला सहकार्य द्यावयाला पाहिजे. कारण जर तसें त्यानें केलें नाहीं तर उत्पादनशक्ति वाढणार नाहीं, आर्थिक क्षेत्रांत सुधारणा होणार नाहीं आणि त्याच्या मुलाबाळांना उज्ज्वल भविष्यकाल दिसणार नाहीं. ह्या गोष्टी तर खऱ्याच आहेत, परंतु त्यापेक्षाहि महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं, या मार्गाखेरीज दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें आपल्या नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशाला तो स्थिरता प्राप्त करून देऊं शकणार नाहीं.

देशांतील बहुजनसमाज हा सामान्य माणसांचा बनलेला असतो आणि म्हणून देशांतील एकूण उत्पन्नांत जी वाढ होईल ती या सामान्य माणसांच्या पदरांत पडते. वैयक्तिक दृष्ट्या ही उत्पन्नांतील वाढ कुचकामी वाटेल. परंतु एकूण त्याची गोळाबेरीज पाहतां ती डोळ्यांत भरण्यासारखी असेल. आणि या रकमेचा निश्चित असा आराखडा तयार केल्याखेरीज योजनेला चालना मिळणें कठीण आहे; आणि आपल्या समाजाची अर्थव्यवस्थाच अशी आहे, कीं सामान्य माणसाचें दैव उजळावयाचें असेल तर सामान्य माणसांनाच जास्त कष्ट घ्यावे लागणार आहेत.

वैयक्तिक उत्पन्नांतील विषमता या देशांत जेवढी आहे, तेवढी इतर कोणत्याहि देशांत नाहीं. परंतु या देशांत श्रीमंत माणसांचा आंकडा इतका कांहीं मोठा नाहीं, कीं त्यांच्या पुंजीच्या सामर्थ्यावर साऱ्या सुधारणा घडवून आणतां येतील. त्यासाठीं गरिबांची तुटपुंजी शिल्लक मदतीला घ्यावीच लागेल.

आणि म्हणून छोट्या बचतयोजना, आणि जीवनावश्यक अशा मूलभूत गोष्टींवरील अप्रत्यक्ष कर यांना एवढें महत्त्व दिलें गेलें आहे या योजनेंत; आणि म्हणूनच खर्चाला आळा घालण्याची एवढी धडपड चालू आहे.

### 'सामान्य' माणसाशीं निकटचा संबंध

थोडक्यांत म्हणजे, सामान्य भारतीय माणसाला आतां, आजच्या दिवसानंतर उद्यांचा दिवस उगवणार आहे हें विसरून जास्तींतजास्त कष्ट करायला पाहिजेत आणि त्याबद्दल त्याला जो मोबदला मिळेल तो त्याच्या गरजेपेक्षा कमी असेलच परंतु आज त्याला जो कांहीं त्याच्या कष्टाचा मोबदला मिळतो आहे त्यापेक्षाहि कमी असेल. परंतु उद्यांचा दिवस उगवणार नाहीं असें समजल्यानें तसें घडणार नाहीं. परंतु या देशांतील जनतेला एक समाधानकारक असें जीवनमान प्राप्त होईपर्यंत वर्षांनुवर्षे अखंडपणें प्रगति करण्यासाठीं श्रम घ्यावे लागणार आहेत आणि कोठल्याहि देशांतील प्रगति त्या देशांतील शिल्लकींतील रकम आणि निरनिराळ्या उद्योगधंद्यांत गुंतविलेलें भांडवल यांच्यांत वाढ झाल्याशिवाय होत नाहीं आणि म्हणून भारतांतील सामान्य माणसानें आज त्याला जें कांहीं उत्पन्न मिळतें आहे त्यांपैकी कांहीं भविष्यकाळाकरितां बाजूला टाकलें नाहीं तर या देशांत अपेक्षित तितकी प्रगति दिसणार नाहीं; आणि म्हणून प्रयत्नाच्या बाजूनेहि ही योजना लोकांचीच आहे.

तेव्हां वरील विवेचनावरून ही द्वितीय पंचवार्षिक योजना भारतांतील सामान्य माणसाशीं किती निकटपणें संबंधित आहे हें कळून आलें असेल. ही योजना सामान्य माणसांचेंच कल्याण करणार आहे. परंतु ती त्याला नुसते श्रम करावयाला सांगत नाहीं तर त्या श्रमाचा लगेच मोबदला मागूं नकोस असें सांगतें आहे. ती त्याला श्रम करण्यासाठीं एक आदर्श पुढें ठेवीत आहे, एक आश्चर्यकारक ध्येय त्याच्यापुढें उभें करीत आहे. समाजवादी समाजरचना ती त्याच्यापुढें मांडतें आहे कीं ज्या समाजरचनेंत प्रत्येकाला पुढें येण्याची सारखीच संधि मिळेल, जिथें उत्पन्न आणि संपत्ति यांतील विषमता कमी असेल, जिथें बेकारी नसेल, दारिद्र्य नसेल आणि सामाजिक आणि आर्थिक बाबतींत सर्वत्र न्याय भरलेला असेल.

मला अशी खात्री आहे कीं, एकदां या सामान्य भारतीयाला ही योजना आपल्यासाठीं आणि आपल्या पोराबाळांसाठीं आहे हें कळलें, कीं तो कोणत्याहि प्रकारचा त्याग करायला आणि कष्ट उपसायला तयार होईल, आणि ही योजना यशस्वी करेल. आतां फक्त या योजनेच्या योजकांनीं या सामान्य भारतीयांच्या शंकाकुशंका दूर करून, पुन्हां एकदां योजनेची नीट मांडणी करून, त्यांना पटविलें पाहिजे, कीं ही योजना त्यांच्यासाठींच आहे, सामान्य भारतीय माणसांसाठींच आहे.

—" टाइम्स ऑफ इंडिया "

# दी बृहन्महाराष्ट्र
## शुगर सिंडिकेट लि., पुणें २

परी राया रंका पाड धरूं । नेणती सानेयां थोरां कडसणी करूं ।
एकसरें आनंदाचे आवारु । होत जगा ॥
जैसी कमळकळिका जालेपणें । हृदयींचिया मकरंदाते राखो नेणे ।
दे राया रंका पारणें । आमोदाचें ॥ (श्री ज्ञानेश्वर महाराज)

महाराष्ट्रांतील जनतेचें साहाय्य व सहकार्य
आणि
कै. चंद्रशेखर गोविंद आगाशे यांचे अविरत परिश्रम
यामुळेंच

## सिंडिकेटचा कारखाना यशस्वी झाला आहे

नवा हंगाम विजयादशमीच्या शुभदिनीं चालू झाला
शुभ्र दाणेदार साखर तयार होऊं लागली
चालू वर्षी दीड लाखांवर साखर पोतीं तयार होतील

### साखरेच्या उत्पादन-वाढीचा तक्ता

| हंगाम | तयार साखर पोतीं |
|---|---|
| १९५४–५५ | १,३०,००० |
| १९५५–५६ | १,४८,००० |
| १९५६–५७ [अंदाजें] | १,६०,००० |

१९५४–५५ वर्षाची १० टक्के नफ्याचीं डिव्हिडंड वॉरंट्स
रजिस्टर्ड भागीदारांकडे रवाना झालीं.

## मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात

| मुदत | १ वर्ष | ३ वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| व्याजाचा दर | ६ टक्के | ७ टक्के | ७½ टक्के |

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना
ही दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें जावो !

९८० सदाशिव पेठ,
लक्ष्मी पथ, पुणें २

जगन्नाथमहाराज पंडित
अध्यक्ष

# भारताच्या आर्थिक योजनांचें गुणदोष विवेचन

## इंटरनॅशनल बँकेच्या सूचना व अर्थमंत्र्यांचें स्पष्टीकरण

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेबद्दल जागतिक बँकेनें केलेल्या सूचनांकडे अगर टीकेकडे दुर्लक्ष करून चालण्यासारखें नाहीं. ह्या सूचनांचा विचार करतांना भारताचें विशिष्ट स्थानहि लक्षांत घेतलें पाहिजे. पूर्वेकडील अविकसित देशांत भारत हाच एक असा देश आहे कीं, मोठ्या प्रमाणावर औद्योगिक विकास करण्यास लागणारी नैसर्गिक साधनसामुग्री त्याच्याजवळ आहे. कारभारविषयक स्थैर्यहि भारताजवळ आहे. शिवाय, विकासाचें साध्य गांठण्यासाठी लोकशाही मार्गाचा अवलंब करण्याचें भारतानें ठरविलेलें आहे. ह्या गोष्टी लक्षांत घेतां भारताच्या औद्योगिक विकासाला केवळ राष्ट्रीयच महत्त्व आहे असें म्हणतां येणार नाहीं. आणि म्हणूनच जागतिक बँकेनें व्यक्त केलेले विचार महत्त्वाचे आहेत.

दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणारा पैसा देशांतच उभा करतां येईल किंवा नाहीं ह्याविषयीं शंका व्यक्त करण्यांत येत असली तरी परदेशी हुंडणावळीचा प्रश्न अधिक बिकट व गुंतागुंतीचा आहे ह्याबद्दल वाद नाहीं. भारताच्या पौंडी गंगाजळीमधून मिळणारी व इतर ठिकाणांहून मिळणारी परदेशी हुंडणावळ जमेस धरून नियोजन समितीनें असा हिशोब केला आहे कीं, भारताला ६३० कोटी रुपये अथवा १३४ कोटी डॉलर्स इतकी रक्कम कमी पडेल. ह्या तुटीपैकीं किती तूट जागतिक बँक भरून काढूं शकेल हा खरा मुद्दा आहे. पण बँकेनें ह्या बाबतींत आपणांवर आगाऊ बंधन घालून घेण्याचें स्पष्ट शब्दांत नाकारलेलें आहे. ह्याचा अर्थ, बँक भारताला कर्ज न देण्याची धमकी देत आहे असें करण्याचें कारण नाहीं. ज्या कार्यासाठी बँक कर्ज देईल त्याच कार्यासाठी तें वापरलें जातें किंवा नाहीं हें पाहण्याचें आणि ऋणको देश अवलंबीत असलेल्या आर्थिक धोरणामुळें कर्ज परत करण्याची त्याची पात्रता कमी होत नाहीं हें पहाण्याचें बँकेचें कर्तव्यच आहे. राजकीय सिद्धांताशीं बँकेला कांहींच कर्तव्य नाहीं असें म्हणतां येण्यासारखें आहे. बँकेकडून कर्ज मिळविण्याविषयीं भारत उत्सुक आहे हें तर उघडच आहे. गेल्या कांहीं महिन्यांत भारतानें पोलाद व यंत्रसामुग्री ह्यांची आयात करण्यासाठी परदेशीय हुंडणावळीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केलेला आहे. म्हणून भारताची गरज वाढली आहे हेंहि खरें पण बँकेकडून किती मदतीची अपेक्षा करावी हें ठरवितांना बँकेजवळील कर्जाऊ देण्यासारख्या रकमेचाहि विचार झाला पाहिजे. सध्यां बँकेजवळ अशी मोकळी रक्कम सुमारें ५० कोटी डॉलर्स आहे. पुढील कांहीं वर्षांत बँकेजवळ अधिक पैसा येईल असें गृहीत धरलें तरी भारताच्या १३४ कोटी डॉलर्सच्या तुटीपैकीं ३३.५ कोटी डॉलर्सपेक्षा अधिक रक्कम बँकेकडून मिळण्याची अपेक्षा करणें वाजवी होणार नाहीं. ही मदत मिळाली तरीसुद्धां भारताला १०० कोटी डॉलर्स हुंडणावळीची तूट दुसऱ्या मार्गांनीं भरून काढावी लागेल. त्यासाठीं निर्यात वाढविणें, इतर देशांकडून कर्जें मिळविणें, परदेशीय भांडवल आयात करणें, इत्यादी मार्गांचा अवलंब करावा लागेल. ह्या मार्गांचा शक्य तितका अवलंब करण्याचा विचार करण्याचें आश्वासन श्री कृष्णम्माचारी ह्यांनीं दिलेलेंच आहे.

ह्या विषयासंबंधीं लिहितांना लंडनमधील 'इकॉनॉमिस्ट' म्हणतो कीं, जागतिक बँकेनें भारतानें कोणतें आर्थिक धोरण स्वीकारावें हें हक्क म्हणून सांगण्याचा प्रयत्न केला असता, तर त्याविरुद्ध टीका करणें रास्त झालें असतें. असें करणें बँकेच्या सनदेच्या बाहेरचें झालें असतें. जागतिक बँक ही संस्था सरकारांनीं स्थापन केलेली आणि कर देणाऱ्या लोकांच्या पैशांनीं उभारलेली आहे. सर्वच समाजवादी आर्थिक उपायांना तात्त्विक सिद्धांतांचा आधार घेऊन विरोध करणें अशा संस्थेला सोपें जाणार नाहीं. बँकेनें कम्युनिस्ट मतप्रणालीच्या युगोस्लाव्हियाला कर्ज दिलेलें आहे. मार्शल टिटो ह्यांच्या कम्युनिस्ट धोरणाचा एवढा मोठा घास गिळल्यावर भारताच्या मऊ समाजवादी धोरणाचा घोट गिळण्यास खळखळ करणें मूर्खपणाचें दिसेल. तथापि मि. ब्लॅक हे खाजगी उद्योगधंद्यांचें श्रेष्ठत्व पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते असें म्हणतां येणार नाहीं. चालू वर्षाच्या आरंभीं बँकेतर्फे प्रतिनिधी मंडळानें भारताचा दौरा केला होता; त्या मंडळानें व्यक्त केलेल्या मतांचा पाठपुरावा तें करीत होते. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत अमुक एक रक्कम कर्ज म्हणून देण्याचें बंधन घालून घ्यावयास बँक तयार नाहीं. अशा प्रकारचें बंधन बँकेनें घालून घेतलें असतें तर ती गोष्ट बँकेच्या नेहमींच्या व्यवहार करण्याच्या पद्धतीच्या बाहेरची ठरली असती.


देना बँक

आपल्या १,००,००० खातेदार यांस
दिवाळीची शुभेच्छा आणि
नूतन वर्षाचे अभिनंदन
सादर करीत आहे

देवकरण नानजी बँकिंग कं. लि.
हेड ऑफिस : मुंबई आणि ६२ शाखा

प्रवीणचंद्र व्ही. गांधी मॅनेजिंग डिरेक्टर

यंदाची दीपावलि बँकेच्या भागीदारांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना सुखाची जावो !

## दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना सन १९४० ] जमखंडी [ शाखा:— बनहट्टी

ता. ३०-६-१९५६ रोजीचे आंकडे

| | |
|---|---|
| भाग-भांडवल (वसूल झालेलें) | रु. २,०१,२५५ |
| गंगाजळी ( सर्व प्रकारचे कायम निधि) | रु. २,३८,८५६ |
| ठेवी ( सर्व प्रकारच्या ) | रु. १७,११,३१३ |
| ठेवींवरील व्याजाचे दर | १ ते ४॥ टक्के |
| भांडवलावर नफावांटणीचा दर | ५ ते ६। टक्के |

★ मध्यवस्तींत स्वतःच्या मालकीची इमारत.
★ सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्कृष्ट सोय.
★ प्रमुख विमाकंपन्यांचीं हप्तेवसुलीचीं खातीं.
★ एकोप्यानें व आपुलकीनें काम करणारे डायरेक्टर्स.
★ अनुभवी व शिक्षित नोकरवर्ग.
★ ऑडिट वर्ग 'अ'.

—सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

श्री. म. अथणी, चेअरमन. — म. द. खाडिलकर, मॅनेजर.

## दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० ] [ शेड्यूल्ड बँक

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

**शाखा :** १ संकेश्वर, २ होसूर (बेळगांव), ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ टिळकवाडी (बेळगांव), २३ सावंतवाडी, २४ बार्शी. शिवाय बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्यावत् पद्धतीचा 'सेफ डिपॉझिट व्हाल्ट' सुरू आहे.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | रु. २,६२,००० |
| ठेवी | रु. १,१८,११,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,३०,९६,००० |

— संचालक मंडळ —

श्री. व्ही. व्ही. सराफ (अध्यक्ष), श्री. सि. म. मुत्तूर, (उपाध्यक्ष), श्री. गो. ल गजेंद्रगडकर, श्री. म. गो. हेरेकर, श्री. लिं. वि. देशपांडे, श्री. ना. शा. शिराळी, श्री. भि. बा. पोतदार, श्री. जि. बा. कलघटगी, व श्री. अ. रा. नाईक, कार्यकारी संचालक.

ह. सि. कुलकर्णी,
कार्यवाह

## श्री लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

फलटण, (जि. उत्तर सातारा)

( स्थापना १-२-१९२६ )

| | | |
|---|---|---|
| भांडवल : | भागांचें अधिकृत | रु. २,००,००० |
| | „ खपलेलें | रु. १,२०,८०० |
| | „ वसूल | रु. १,१६,२४० |
| फंड : | रिझर्व्ह फंड | रु. १,०९,१४१ |
| | इमारत फंड | रु. ५९,००० |
| | इतर फंड | रु. ४६.८०० |
| ठेवी : | ... ... ... ... | रु. १६,७४,९६२ |

चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात.

सध्यांचे ठेवींचे दर खालीलप्रमाणें:—

(१) चालू ठेवींवर ½% (२) सेव्हिंग्ज ठेवींवर १½%

(३) मुदत ठेवींवर १ ते ५ वर्षांस २½ ते ४%

**व्यवहार :** मुख्यतः सहकारी पेढ्यांना कर्जाऊ रकमा पुरविल्या जातात. बँकांचे इतर सर्व प्रकारचे व्यवहार होतात.

चौकशी समक्ष अगर पत्रद्वारें.

★ हो दीपावली सर्वांना उत्कर्षदायी होवो. ★

श्री. ह. तळवलकर, A. C. R. A., मॅनेजर. — मु. रा. भोईटे, B. A., LL. B., चेअरमन.

बँकेच्या भागीदारांना, खातेदारांना व हितचिंतकांना नूतन वर्ष सुखाचें जावो !

## दि बँक ऑफ कराड लि.

**हेड ऑफिस : कराड**

शाखा : सातारा व इसलामपूर

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. २,१८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ७१,४०० |
| एकूण ठेवी | रु. २२,००,००० |

श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे, चेअरमन
श्री. नारायण बाळाजी बुधकर, वकील, व्हा. चेअरमन

मुदत ठेवी वरील व्याजाचे दर
१ वर्ष ३¼% २ वर्षे ३½% ३ वर्षे ४%

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

कराड १६-१०-५६ — म. वि. खंडकर, मॅनेजर.

# इंटरनॅशनल बॅंकेचे अध्यक्ष, श्री. ब्लॅक ह्यांचें अर्थमंत्र्यांना पत्र

तुमच्या सरकारच्या विनंतीवरून बॅंकेतर्फे एक आर्थिक प्रतिनिधिमंडळ भारताला भेट देऊन गेलें. ह्या मंडळाचा अहवाल आतां बॅंकेला मिळाला असून त्यासंबंधींचें आमचें सर्वसामान्य मत कळविण्यासाठीं हें पत्र लिहीत आहे.

गेल्या पांच वर्षांत भारतानें आर्थिक क्षेत्रांत जी भरीव कामगिरी केली आहे तीबद्दल बॅंकेला फार कौतुक वाटतें. पुढील पंचवार्षिक कार्यक्रमांत प्रगतीच्या योजनांचा जो आराखडा तुमच्या सरकारनें तयार केला आहे, त्याबद्दलहि आमचा ग्रह अनुकूल झाला आहे. पण ह्याचबरोबर हेंहि सांगितलें पाहिजे कीं, विकासाच्या योजनांची कांहीं अंगें आणि त्या अंमलांत आणण्याचे मार्ग ह्याविषयीं भारताला काळजी वाटावी अशी परिस्थिति आहे.

भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकास करण्याच्या, विशेषतः औद्योगिक विकास करण्याच्या कार्यांत देशी व परदेशी खाजगी मालकीच्या संस्थांना सर्व प्रकारचें उत्तेजन देणें भारताच्या हिताचें आहे, अशी माझी खात्री आहे. आर्थिक क्षेत्रांत भारतीय सरकारचें स्थान महत्त्वाचें आहे ह्याची मला जाणीव आहे. तरीसुद्धां माझा असा ग्रह झाला आहे कीं, खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांची आर्थिक विकासाला मदत करण्याची कुवत भारतांत बहुधा वाजवीपेक्षा कमी लेखली जात आहे; आणि त्यांच्या व्यवहारावर जरूर नसणारीं बंधनें घातलीं जात आहेत. भारतांत भांडवलाचा तुटवडा आहे. त्याचप्रमाणें कारभार हाकणाऱ्या बुद्धिमान् लोकांचीहि वाण आहे. अशा परिस्थितींत खाजगी आणि सार्वजनिक मालकीच्या उद्योगधंद्यांच्या कार्याची वांटणी अशा तऱ्हेनें झाली पाहिजे कीं जिच्या योगानें दोन्ही विभागांना आर्थिक विकासाच्या कार्यांत अधिकांत अधिक परिणामकारी भर घालतां यावी. ह्या बाबतींत केवळ तात्त्विक दृष्ट्या विचार होतां कामा नये.

गेल्या एप्रिलमध्यें औद्योगिक धोरणासंबंधी जो ठराव करण्यांत आला त्यांत ह्या प्रश्नाकडे केवळ तात्त्विक दृष्टीनें पहाण्याची वृत्ति दिसून येते. ह्या ठरावांत बऱ्याच उद्योगधंद्यांची जबाबदारी सरकारनें आपल्याशिरावर घेतलेली आहे. उदाहरणार्थ, खनिज तेल, कोळसा व इतर खनिजें. मला असें वाटतें कीं ह्या ठरावाची काटेकोर अंमलबजावणी करण्यांत आली तर सार्वजनिक मालकीच्या विभागावर आणखी भारी ओझें लादलें जाईल आणि ह्या महत्त्वाच्या क्षेत्रांतील विकासाचा वेग कमी होईल. सध्यांच ह्या विभागांवरील आर्थिक व कारभारविषयक ताण वाजवीपेक्षा अधिक आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सार्वजनिक मालकीच्या विभागावर जी जबाबदारी टाकण्यांत आली आहे ती त्या काळांत पार पाडणें कठीण आहे असें बॅंकेचें मत आहे. द्रव्यविषयक मर्यादांचा विचार बाजूला ठेवला तरीसुद्धां ह्या विभागांतील योजना पूर्ण करण्यास वेळ लागेल. कारण मोठ्या प्रमाणावर औद्योगिक उभारणी करण्यासाठी जो अनुभवी व शिक्षित तांत्रिक नोकरवर्ग लागतो त्याची भारतांत वाण आहे. म्हणून परदेशीय खाजगी मालकीच्या संस्थांचें तांत्रिक सहकार्य मिळविणें आणि त्यांचा आर्थिक पाठिंबा मिळविणें ह्या गोष्टी अधिकच महत्त्वाच्या होऊन बसतात. ह्या बाबतींत परदेशी कंपन्यांचें साह्य घेण्यासाठीं जी व्यवस्था करण्यांत आली आहे तिचें बॅंक स्वागत करते. पण परदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीसाठीं अधिक फलदायी उपाय योजण्यांत येतील अशी आशा बॅंक करीत आहे.

गेल्या पांच वर्षांत आर्थिक स्थैर्य टिकवून धरण्यांत आणि सार्वजनिक द्रव्यविषयक व्यवहार हाताळण्यांत जें कौशल्य दाखविण्यांत आलें आहे, त्याबद्दल बॅंकेचा अनूकूल ग्रह झाला आहे. कार्याची गति झपाट्यानें वाढत असतां देशाच्या आर्थिक तोलावर काकदृष्टि ठेवण्याचें महत्त्व ह्या बाबतींतल्या अधिकारी व्यक्ती ओळखून आहेत अशी माझी खात्री आहे. एकूण मागणींत अनिर्बंध वाढ होऊं दिली तर विकासाच्या कार्यक्रमाला धोका पोंचेल हें जाणून योग्य ते तांतडीचे उपाय योजण्यांत येतील ह्याविषयींहि शंका नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत तूट भरून काढण्यासाठीं जी रक्कम नोटांच्या रूपानें उभारण्यांत येणार आहे ती किंमतींत भरमसाठ वाढ न होतां शोषून घेणें भारतीय अर्थव्यवस्थेच्या शक्तीच्या बाहेर असण्याचा धोका आहे. म्हणून नव्या योजनावर होणाऱ्या खर्चांवर सतत व काळजीपूर्वक मर्यादा असणें बॅंकेला जरूर वाटतें. हा खर्च करतांना हाताशीं असणाऱ्या पैशाचा विचार केला पाहिजे.

बाहेरून मिळणाऱ्या पैशासंबंधीं बॅंकेचें मत असें आहे कीं दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत परदेशांतून पैसा मिळविण्यावर अधिक जोर देण्यांत यावा. औद्योगीकरण जसजसें वाटचाल करूं लागेल त्या त्या प्रमाणांत औद्योगिक माल, पेट्रोल व इतर भांडवली माल ह्यांची मागणी वाढत जाईल. अशा परिस्थितींत परदेशीय कर्जाची व मदतीची गरज जर उत्तरोत्तर कमींत कमी करत जावयाची असेल, तर ह्याचवेळीं निर्यातींत वाढ करण्यांत आली पाहिजे. तेव्हां भारतांतून निर्यात करण्यांत येणाऱ्या चहा, ताग व सुती कापड ह्या वस्तूंची निर्यात वाढविण्यांत आली पाहिजे. त्याशिवाय पक्का माल व प्राथमिक माल ह्यांची निर्यातहि करण्यांत आली पाहिजे. पण अशा प्रकारच्या कांहीं कांहीं मालाच्या बाबतींत भारतीय सरकारचें धोरण निर्यातीवर बंधनें घालण्याचें दिसतें. उदाहरणार्थ, सुती कापड व वनस्पति तेल. आगामी काळ भरीव विकास घडविण्याचा असल्यामुळें ह्या काळांत परदेशीय हुंडणावळींवरील मागणीचें दडपण तीव्र असेल तेव्हां आपल्या धोरणाचा सरकार फेरविचार करील अशी आशा बॅंकेला वाटत आहे.

येत्या पांच वर्षांत परदेशीय कर्जांत बरीच वाढ झाली तरी ती सोसण्याची ताकद भारतीय अर्थव्यवस्था उत्पन्न करूं शकेल असा बॅंकेचा विश्वास आहे. तथापि दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत भारताला अमुक इतकें कर्ज मिळेल अशी ग्वाही देणें मात्र बॅंकेला शक्य होणार नाहीं. भारतीय सरकार जीं धोरणें स्वीकारील व वेळोवेळीं जी आर्थिक परिस्थिती असेल, त्यांचा विचार करूनच बॅंकेला भारताला द्यावयाच्या कर्जाच्या रकमेचा व गतीचा विचार करावा लागेल. बॅंकेव्यतिरिक्त इतर ठिकाणांहून भारतानें परदेशीय कर्जें काढलीं असतील तर त्यांचा भारताच्या परदेशीय हुंडणावळीच्या हिशोबावर कशा प्रकारचा व किती परिणाम होतो ह्या गोष्टीचाहि बॅंकेला विचार करावा लागेल. उलटपक्षीं, हुंडणावळीविषयक कायम स्वरूपाचीं ओझीं लादून न घेतां भारताला परदेशांचें आर्थिक साह्य कितपत मिळतें ह्याचाहि अनुकूल विचार बॅंक करील.

भारताच्या आर्थिक विकासाच्या कार्यांत वाहतुकीच्या साधनांचा तुटवडा ही धोक्याची मेख आहे. दुसऱ्या कार्यक्रमांत रेल्वेजची वाढ करण्यासाठीं बरीच रक्कम गुंतविण्यांत येणार आहे ही गोष्ट खरी. पण देशांतील भांडवलाचा तुटवडा लक्षांत घेतां रेल्वेजची कार्यक्षमता सुधारण्याकडे आणि रस्त्यावरील व किनाऱ्यावरील वहातुकीकडे

प्रथम लक्ष पुरविण्यांत यावें. रस्त्यावरील व किनाऱ्यावरील वहातूक ह्यांना उत्तेजन देण्यांत आल्यास हा प्रश्न बराच सोपा होईल. दुसऱ्या कार्यक्रमाला मदत म्हणून बँकेकडून जें कर्ज मिळूं शकेल त्यांत वहातुकीच्या साधनांचा विकास करणाऱ्या कर्जाला अग्रस्थान द्यावें असें मला वाटतें. तुमच्या सरकारच्या सांगण्यावरून अमेरिकन रेल्वेजच्या कांहीं तंत्रज्ञांनीं भारतीय रेल्वे-वहातुकीचा अभ्यास केलेला आहेच. तेव्हां ह्या क्षेत्रांतील योजनांचा तपशीलवार विचार करण्यापूर्वी भारतीय सरकार आणि बँक ह्यांच्या दरम्यान सर्वसाधारण चर्चा झाली तर बरें असें मी सुचवितों.

## अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांचें उत्तर

आमच्या धोरणाबद्दल व कार्यक्रमाबद्दल कुणीहि सूचना केल्या अगर टीका केली तर आम्ही तिचें स्वागतच करतों. त्यांतहि ही टीका अगर ह्या सूचना बँकेसारख्या अनुभवी संस्थेकडून सदिच्छापूर्वक करण्यांत आलेल्या असतांना तर त्यांचा योग्य तो मान राखणें योग्यच होईल, आणि तसा तो राखला जाईलहि.

भारताच्या आर्थिक स्थैर्याबद्दल आपण व्यक्त केलेले विचार मी लक्षांत घेतले आहेत. ह्या बाबतींत भारताचें धोरण काळजी उत्पन्न करण्यासारखें आहे अशी शंका वाटण्याचें कारण मला दिसत नाहीं. चलनवृद्धीच्या धोक्याची जाणीव आम्हांला आहे. तो टाळण्यासाठी पूर्वीप्रमाणेंच भविष्यकालींहि निकराचे प्रयत्न करण्याचें आम्ही ठरविलें आहे. कांहीं दिवसांपूर्वी कापडावरील अबकारी कर आम्ही बराच वाढविल्याचें आपल्या लक्षांत असेलच. आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी लोकांच्या गरजेच्या वस्तूंवरील कर वाढविल्याचें, विशेषतः सार्वत्रिक निवडणुकी जवळ आलेल्या असतांना वाढविल्याचें, एखादें तरी उदाहरण लोकशाही सरकारच्या कारभारांत सांपडेल किंवा नाहीं ह्याविषयीं मी साशंक आहे.

तथापि, मला एका मुद्यावर विशेष भर द्यावासा वाटतो. भारताच्या सध्यांच्या परिस्थितींत आर्थिक स्थैर्यापेक्षाहि सामाजिक स्थैर्याला अधिक महत्त्व आहे आणि तें स्थैर्य प्रगतीच्या गतीवर अवलंबून आहे. संघटनात्मक व कारभारविषयक अडथळे दूर करण्यांत आले, तर विकासाच्या द्रुतगतीला सगळ्यांत मोठी अडचण देशांत उपलब्ध होणाऱ्या पैशाच्या टंचाईची नसून परदेशीय हुंडणावळीच्या टंचाईचीच आहे, असें मला दिसत आहे. ही गोष्ट खाजगी व सार्वजनिक मालकीच्या दोन्ही विभागांना लागूं आहे. म्हणून परदेशांतील पैसा मिळवून देण्याच्या कामीं बँक जें महत्त्वाचें कार्य करण्याची अपेक्षा करते, त्याबद्दल मला आनंद वाटतो.

परदेशीय हुंडणावळीच्या प्रश्नासंबंधीं व्यक्तिशः मला आणि भारतीय सरकारला चिंता वाटून राहिलेली आहे. आमच्या कार्यक्रमांतील योजनांची टप्प्यानें अंमलबजावणी करण्याचें आम्हीं ठरवीत आहोंत. ज्या योजना अंमलांत आणल्यानें हुंडणावळींत बचत होईल अगर ती अधिक मिळण्यासारखी असेल अशांना अग्रस्थान देण्यांत येत आहे. कार्यपद्धतीमुळें अगर धोरणामुळें आमच्या निर्यातींत वाढ करणें अवघड होत असेल तर त्यांची फेरतपासणी करण्यांत येत आहे; आतांपर्यंत ज्या मालाची निर्यात मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत नव्हती त्या मालाला परदेशीय बाजारपेठा मिळवून देण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत; आणि खाजगी मालकीचें परदेशी भांडवल भारतांत गुंतविण्याच्या मार्गांतील अडचणींचाहि आम्हीं साकल्यानें विचार करीत आहों.

खाजगी मालकीचे उद्योगधंदे व सार्वजनिक मालकीचे उद्योगधंदे ह्यांच्याबद्दल आपलीं मतें तंतोतंत जुळणारीं नाहींत ह्याची मला जाणीव आहे. पण सार्वजनिक वादविवादांत ह्यासंबंधींचे आपले मतभेद जितके मोठे वाटतात तितके मोठे ते खरोखर नाहींत. एखादा उद्योगधंदा कार्यक्षम रीतीनें चालवितां येण्यासाठी खाजगी नफ्याचें प्रलोभनच काय तें परिणामकारक असतें अशी आमची खात्री झालेली नाहीं; किंवा खाजगी मालकीचा उद्योगधंदा सरकारच्या मालकीच्या उद्योगधंद्यापेक्षा मूलतःच कार्यक्षम असतो असाहि आमचा विश्वास नाहीं. उलट सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांचा आम्हांला जो थोडा अनुभव आला आहे त्यावरून आम्हाला असें वाटतें कीं खाजगी उद्योगधंद्यांपेक्षा ते पुष्कळदां अधिक कार्यक्षम असूं शकतात. भारतीय सरकारनें मंजूर केलेला औद्योगिक धोरणाविषयींचा ठराव म्हणजे कांहीं कधींहि न बदलणारा ठाम तात्त्विक सिद्धांत नव्हे. भारतांत ह्या ठरावाचा अर्थ असा केला जात नाहीं. उलट, भारतामधील खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना खूप मोठें उत्तेजन अलीकडील काळांत ह्या ठरावानेंच मिळालेलें आहे. हे उद्योगधंदे ज्या उत्साहानें व आत्मविश्वासानें वाढत आहेत, त्यावरून हेंच सिद्ध होत आहे.

वाहतुकीचा प्रश्न, विशेषतः रेल्वे वाहतुकीचा प्रश्न, तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें बराच महत्त्वाचा आहे. तथापि ह्या विषयासंबंधीं अमेरिकन तज्ज्ञांनीं केलेला अहवाल प्राथमिक स्वरूपाचा आहे. संपूर्ण अहवाल हातीं आल्यावरच रेल्वे-बोर्डाला व सरकारला ह्यासंबंधीं काय करावयाचें तें ठरवितां येईल. त्यावेळीं ह्यासंबंधीं बँकेशीं विचारविनिमय करणें उपयुक्त होईल असें मला वाटतें. तरीसुद्धां ह्या प्रश्नाची सर्वसाधारण चर्चा होईपर्यंत रेल्वेजना लागणाऱ्या सामानसुमानाच्या आर्थिक बाजूसंबंधीं विचारविनिमय पुढें ढकलणें इष्ट होईल असें मला वाटत नाहीं. भारतीय रेल्वेजना मुख्यतः एंजिनें, वाहतुकीचे डबे व डब्यांचे भाग आणि इतर कांहीं साधनांची आवश्यकता आहे. रेल्वेजनीं जितकी सामुग्री आयात करण्याचें योजलें आहे तितकी मिळाली आणि कार्यक्षमता वाढली तरीसुद्धां वाहतुकींत होणारी वाढ समाधानकारक रीतीनें हाताळणें अवघड जाईल ह्याविषयीं एकमत झालेलें आहे. अमेरिकन तज्ज्ञ पुढें ज्या शिफारसी करतील अगर करण्याचा संभव आहे त्यांच्यामुळें भारतीय रेल्वेजना लागणाऱ्या आयातीच्या कार्यक्रमांत पुढील तीन वर्षे तरी फरक पडणार नाहीं अशी माझी माहिती आहे. तेव्हां मागण्या नोंदविल्या जाणें जर जरूरीचें असेल तर त्यांच्याबद्दलची आर्थिक तरतूदहि करणें अगत्याचें आहे. ह्या मागण्याप्रमाणें होणाऱ्या आयातीबद्दल बँक आपलें कार्य पार पाडेल अशी आशा आम्हांस वाटत आहे. म्हणून ज्या रेल्वेविषयक मालाबद्दल परदेशांत मागण्या नोंदणें जरूरीचें आहे तेवढ्या मालाबद्दलच्या आयातीबद्दल बँकेनें आपलें धोरण निश्चित करावें अशी माझी सूचना आहे.

भारताला देण्याच्या कर्जाबद्दल अमुक एका रकमेचें बंधन घालून घेण्याविषयीं तुमच्या अडचणी मला समजतात. तथापि रकमेच्या आंकड्यांविषयीं आणि मदतीच्या टप्प्यांविषयीं कांहीं अंदाज करतां येईल असा विश्वास मला वाटतो.

# भारत सरकारची कर्जविषयक परिस्थिति

## पंचवार्षिक योजनेच्या खर्चाची तरतूद

येत्या कांहीं वर्षांत सरकारला जादा कर्जांचे द्वारां किती रकम उभारतां येईल ह्याचा अंदाज केला, तर पूर्वीपेक्षा जास्त कर्जें मिळूं शकतील, असें आढळेल. पण १९५६–५७ ते १९६०–६१ ह्या मुदतींत सरकारला ४३० कोटी रुपयांची परतफेड करावयाची आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. म्हणजे, दरसाल सुमारें ८५ कोटी रुपये केवळ कर्जफेडीसाठीं लागतील.

दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, उत्पन्नांत वाढ झाली तरी ती मुख्यतः कमी प्राप्तीच्या लोकांच्याच वांट्यास येईल. म्हणजे, त्यांतून बचत होऊन सरकारला मोठीं कर्जें मिळण्यास कठीणच, नव्हे अशक्यच, होणार. तुटीच्या अर्थव्यवस्थेमुळें चलनांत जी वाढ होईल, त्यांतून पैसाउभारणीस मदत होईल, हें खरें आहे; पण, किंमती स्थिर रहातील ही पंचवार्षिक योजने-मागील गृहीत गोष्ट प्रत्यक्षांत उतरली नाहीं, तर कर्जें व कर-उभारणी ह्या दोहींसहि बाध आल्याविना रहाणार नाहीं. म्हणून, १२०० कोटी रुपयांच्या उभारणीचें लक्ष गांठणें सोपें नाहीं.

### भारत सरकारचें सार्वजनिक कर्ज

( आकडे कोटी रुपयांचे )

३१ मार्च रोजीं

| | १९३९ | १९४८ | १९५६ | १९५७ |
|---|---|---|---|---|
| | | | दुरुस्त अंदाज | अंदाज |
| **अंतर्गत** | | | | |
| रुपी लोन्स | ४३८ | १५१७ | १५१० | १९१० |
| ट्रेझरी बिलें, इ. | ४६ | ९९ | ५९५ | ९५१ |
| इतर तरतीं कर्जें | — | १३४ | २१३ | २१३ |
| मुदत संपलेलीं कर्जें | १ | १२ | ११ | ११ |
| **परदेशी** | | | | |
| स्टर्लिंग कर्जें | ३९६ | ६ | १ | १ |
| युद्धाला मदत | २१ | २१ | २१ | २१ |
| रेल्वे अन्युइटीजचें भांडवल | ४८ | २० | २ | १ |
| डॉलर कर्जें | — | — | ११८ | १४५ |
| रशियाचें कर्ज | — | — | — | ९ |
| एकूण | ९५० | १८०९ | २४७१ | २९६१ |

मार्च, १९३९ अखेर मध्यवर्ती सरकारचें कर्ज ९५० कोटी रुपये होतें, तें मार्च, १९४८ अखेर १८०९ कोटी रुपये, आणि मार्च, १९५६ अखेर २४७१ कोटी रुपये झालें. मार्च, १९५७ अखेर तें २९६१ कोटी रुपयांपर्यंत वाढेल, असा अंदाज आहे. महायुद्धानंतर, भारत सरकारचें देणें हें आतां बहुतेक सर्व भारतांतच फेडावयाचें आहे; १९३८–३९ मधील दोन तृतीयांश कर्ज लंडनमध्यें उभारलेलें व फेडावयाचें होतें. १९३८–३९ मध्यें, लंडनमधील कर्जांवर १६.६ कोटी रुपये व्याज द्यावें लागलें; आतां परदेशीय कर्जांवर व्याजापोटीं सुमारें ३ कोटी रुपये द्यावे लागतात. डॉलरमधील ११८ कोटी रुपयांचें कर्ज, ही युद्धोत्तर काळांतील नवी घटना आहे. रिझर्व्ह बँकेला विकलेल्या ट्रेझरी बिलांचें प्रमाण खूपच वाढलें आहे. १९४६ मध्यें त्यांची रकम ४६ कोटी रुपये होती, ती आतां ५९५ कोटी रुपयांवर गेली आहे.

### ट्रेझरी बिलांनीं १२०० कोटी रु. ची तरतूद

तात्कालिक गरजा भागविण्यासाठीं ट्रेझरी बिलांचे द्वारां कर्जें उभारणें अत्यंत सोयीचें असतें. बँकांना त्यांत पैसे गुंतविण्यास कांहींच हरकत वाटत नाहीं; कारण त्यांतील पैसा तरता असतो आणि धोका नसतो. सरकारलाहि जरूरीपुरताच पैसा घेतां येतो आणि इतर कर्जांपेक्षा ट्रेझरी बिलांवर व्याजाचा दर कमी पडतो.

भारतांत डिसेंबर १९४९ पर्यंत ट्रेझरी बिलांची टेंडर्सद्वारां विक्री नेहमीं होत असे. मार्च, १९४८ अखेर त्यांतील जनतेची गुंतवणूक १६.५ कोटि रुपये होती. मध्यें ही विक्री बंद ठेवण्यांत आली होती. मार्च १९५६ अखेर त्या बिलांत जनतेचे फक्त १२ कोटि रुपये गुंतलेले होते. जनतेची म्हणजे मुख्यतः शेड्यूल्ड बँका व एक्सचेंज बँका ह्यांचीच ही गुंतवणूक होती. एकूण ट्रेझरी बिलांत (१) जनतेला विकलेलीं ट्रेझरी बिलें, (२) राज्यसरकारें, निमसरकारी संस्था, इत्यादींच्या नांवावरील ट्रेझरी बिलें व (३) रिझर्व्ह बँकेला दिलेलीं ॲड-हॉक ट्रेझरी बिलें ह्यांचा समावेश होतो. मार्च, १९५६ अखेरच्या एकूण ट्रेझरी बिलांपैकीं ४८७ कोटि रुपयांचीं बिलें रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यांत दाखल होतीं. म्हणजे, सरकारी उत्पन्नापेक्षा जास्त झालेल्या खर्चासाठीं सरकारी शिल्लक वाढविण्याकरितां तीं बिलें काढण्यांत आलीं होतीं. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत अशा रीतीनें १२०० कोटि रुपयांच्या चलनी नोटा रिझर्व्ह बँकेकडून मिळविण्यांत येणार आहेत.

### अल्प बचतींचें वाढतें महत्त्व

युद्धकाळापूर्वी आणि युद्धकाळांतहि अल्प बचतींमार्फत सरकारला फारसा पैसा मिळाला नाहीं. १९३८–३९ च्या आधींच्या सहा वर्षांत अखंड हिंदुस्थानच्या सरकारला दरसाल सुमारें ७ कोटि नवे रुपये ह्या मार्गें मिळाले; १९३९–४० ते १९४७–४८ ह्या काळांतील वार्षिक सगसरी १३ कोटि रुपये होती. त्यानंतरच्या तीन वर्षांत ती सरासरी वाढून ३० कोटि रुपये झाली, आणि पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत तर ती ४७ कोटि रुपयांवर गेली. खालील तक्त्यांत लहान बचतीचे द्वारां मिळालेल्या निवळ रकमेचा तपशील दिला आहे :—

### लहान बचतीचे द्वारां जमा रकम

( आंकडे कोटि रुपयांचे )

| वर्ष | जमा रकम | वर्ष | जमा रकम |
|---|---|---|---|
| १९४८–४९ | २९.३७ | १९५२–५३ | ४०.०५ |
| १९४३–५० | २६.०३ | १९५३–५४ | ३७.९० |
| १९५०–५१ | ३३.४३ | १९५४–५५ | ५५.१९ |
| १९५१–५२ | ३८.५४ | १९५५–५६ | ६२.५० |

१९५१–५२ ते १९५५–५६ ह्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत लहान बचतीचे द्वारां सरकारला २३५ कोटि रु. चें

कर्ज मिळालें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे काळांत ह्याच पद्धतीनें ५०० कोटि रु. मिळतील अशी अपेक्षा धरण्यांत आली आहे. लोकांना ह्यांत पैसे गुंतविणें सोयीस्कर वाटतें; कारण बाजारभावाचा त्यांवर परिणाम होत नाहीं आणि व्याजहि बरें पडतें. आजवर ज्यांचे पैसे सरकारकडे येत नसत, त्यांचे पैसे सरकारला मिळूं लागले आहेत आणि व्याजाच्या बाबतींतहि त्यांत सरकारची सोय होते. त्यामुळें, अल्प बचतींचें महत्त्व ह्यापुढें अधिकाधिक वाढत जाण्याचा रंग दिसतो.

—श्री. वा. काळे

( पॅरेमाउंट उद्योग व्यापार–वार्षिक )

### भारत सरकारचीं व्याज द्यावीं लागणारीं कर्जें
( आंकडे कोटी रुपयांचे )

| | १९३८–३९ | १९५०–५१ | १९५१–५२ | १९५२–५३ | १९५३–५४ | १९५४–५५ | १९५५–५६ | १९५६–५७ बजेट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **भारतांत** | | | | | | | | |
| १. कर्जें | ४३८ | १,४३९ | १,४०२ | १,४०४ | १,३६६ | १,४७५ | १,५१० | १,६१० |
| २. ट्रेझरी बिलें, इ. | ४६ | ३६५ | २३३ | ३१५ | ३३५ | ४७२ | ५९५ | ९५१ |
| ३. लहान बचती | १४२ | ३२६ | ३७३ | ४१८ | ४५५ | ५०५ | ५७४ | ६४४ |
| ४. घसारा व गंगाजळी फंड | २७ | १५६ | १७१ | १७० | १७२ | १७४ | १८७ | १९२ |
| ५. इतर | ८४ | २०७ | १९३ | १८९ | १५६ | १९१ | १८८ | २०७ |
| ६. एकूण ( भारतांतील ) | ७३७ | २,४९३ | २,४७२ | २,४३६ | २,४८४ | २,८१७ | ३,०५४ | ३,६०४ |
| **इंग्लंडमधील** | | | | | | | | |
| ७. कर्जें | ३९७ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ |
| ८. इतर | ७२ | ३५ | ३३ | २९ | २८ | २६ | २२ | २१ |
| ९. एकूण | ४६९ | ३६ | ३४ | ३० | २९ | २७ | २३ | २२ |
| १०. डॉलर कर्जें | — | २५ | ११२ | ११४ | ११२ | ११२ | ११८ | १४५ |
| ११. रशियाकडून कर्जें | — | — | — | — | — | — | — | ९ |
| १२. एकूण | १,२०६ | २,५५४ | २,६१८ | २,६४० | २,६२५ | २,९५६ | ३,१९५ | ३,७८० |

### भारत सरकारचीं व्याज सुटणारी जिंदगी
( आंकडे कोटी रुपयांचे )

| | १९३८–३९ | १९५०–५१ | १९५१–५२ | १९५२–५३ | १९५३–५४ | १९५४–५५ | १९५५–५६ | १९५६–५७ बजेट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. रेल्वेजना भांडवल | ७२५ | ८१४ | ८३४ | ८६४ | ८७५ | ९०२ | ९७४ | १,०८७ |
| २. इतर व्यापारी खात्यांना भांडवल | २८ | ९० | ११३ | ८१ | ८८ | ११५ | ११२ | १२६ |
| ३. व्यापारी उपक्रमांत गुंतवणूक | — | — | — | — | २७ | ४१ | ५६ | १३५ |
| ४. राज्यसरकारांना व इतर कर्जें | १४४ | २१७ | २८४ | ३७८ | ४८३ | ७३४ | ९५९ | १,२८७ |
| ५. बर्मा व पाकिस्तानकडून येणें | — | ३४८ | ३४८ | ३४८ | ३४८ | ३०० | ३०० | ३०० |
| ६. ब्रिटिश सरकारकडे डिपॉझिट | — | ११ | ८ | ६ | ४ | ३ | २ | १ |
| ७. स्टर्लिंग पेन्शन्सच्या वर्षासनांची खरेदी | — | २०१ | १९४ | १८६ | १७८ | १७१ | ६५ | ६० |
| ८. एकूण बाबी ( व्याज देणाऱ्या ) | ८९७ | १,६८१ | १,७८१ | १,८६३ | २,००४ | २,२६६ | २,४६८ | २,९९६ |
| **इतर बाबी** | | | | | | | | |
| ९. ट्रेझरी खातीं रोख व रोखे | ३० | १४२ | १९९ | १३६ | ७१ | ६५ | ५० | ५१ |
| १०. कर्जाऊ रकमेपेक्षा ( व्याज न देणारी ) कमी पडणारी रक्कम | २७९ | ७३१ | ६३८ | ६४१ | ५५० | ६२५ | ६७७ | ७३३ |
| ११. एकूण | १,२०६ | २,५५४ | २,६१८ | २,६४० | २,६२५ | २,९५६ | ३,१९५ | ३,७८० |

तमाम दंतरोगांवर

☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

# दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सहकारी लक्ष्यें

दि ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह युनियनच्या विद्यमानें यंदा देशभर ३ नोव्हेंबर १९५६ पासून एक सहकारी सप्ताह पाळण्यांत येणार आहे. ३ नोव्हेंबर हा अखिल भारतीय सहकारी दिन म्हणून साजरा करण्यांत येईल. ग्रामीण, तसेंच शहरी भागांत सहकारी चळवळीच्या विकासाकरितां योग्य असें वातावरण निर्माण करणें, हा सदर सप्ताह साजरा करण्यामागील हेतु आहे.

मसुरी येथें भरलेल्या राज्य सहकारी मंत्र्यांच्या परिषदेंत हा सप्ताह पाळण्याचा निर्णय घेण्यांत आला. या सप्ताहास सहकारी चळवळीच्या कार्यकर्त्यांबरोबरच मध्यवर्ती, तसेंच राज्य सरकारांचेंहि संपूर्ण सहकार्य मिळेल.

ग्रामीण पत पाहणी समितीच्या शिफारशी विचारांत घेऊन निरनिराळ्या राज्य सरकारांच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनांत सहकारी विकास योजनांचा समावेश करण्यांत आला आहे.

या शिफारशींनुसार राज्य सरकारांनीं सदर योजनांसाठीं आर्थिक मदत देणें आवश्यक आहे. सदर योजनांत शेतकी कर्जव्यवस्था पुनर्रचना, सहकारी बाजारपेठ, गुदामें यांचा विकास, राज्य सहकारी खात्यांच्या नोकरवर्गांत वाढ आणि सहकारी शिक्षण व प्रशिक्षण इ. योजनांचा समावेश होतो.

शेतकऱ्यास आवश्यक तें पैशांचें पाठबळ मिळून अधिक मोठ्या प्रमाणावर कर्ज मिळावें हा शेतकी कर्जव्यवस्था पुनर्रचनेमागील हेतु आहे.

सहकारी चळवळ बलशाली करण्याच्या दृष्टीनें यंदा अनेक उपाययोजना करण्यांत आल्या आहेत. या योजनांत सहकारी कार्यकर्त्यांचे शिक्षण आणि सहकारी संस्थांच्या सध्यांच्या व भावी सदस्यांचें तसेंच पदाधिकाऱ्यांचें उजळणी शिक्षण इ. चा समावेश होतो.

सदर योजनेनुसार बिहार ( २ ), सौराष्ट्र ( २ ), मध्यभारत व दिल्ली ( प्रत्येकीं १ ) या राज्यांत एकूण ६ फिरत्या प्रशिक्षण तुकड्या स्थापण्यांत आल्या आहेत. सौराष्ट्र येथील केंद्रांत ४७ चिटणिसांचें, दिल्ली केंद्रांत ३८ चिटणिसांचें, तसेंच कार्यकारी समित्यांच्या सदस्यांचें व सहकारी संस्थांच्या सदस्यांचें शिक्षण पूर्ण झालें आहे. मध्यभारत राज्यांतील सहकारी संस्थांचें ५४ पदाधिकारी शिक्षण घेत आहेत. इतर केंद्रांवराहि अशाच प्रकारें शिक्षण चालूं आहे.

३० जून, १९५५ अखेर देशांतील सहकारी संस्थांची संख्या २,१९,२८८ असून सदस्यसंख्या १,६०,२०,६८१ आणि त्यांचें खेळतें भांडवल ३९० कोटी रु. वर होतें.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सहकारी कर्जव्यवस्था, बाजारपेठ, प्रक्रिया, गुदामें आणि सांठे याबाबतचीं लक्ष्यें अशीं आहेतः—

**कर्जव्यवस्था :**

| | |
|---|---|
| प्रत्येकीं १५ ते २० खेडीं व्यापणाऱ्या मोठ्या आकाराच्या सहकारी संस्थांची संख्या | १०,४०० |
| अल्प मुदतीच्या कर्जासाठीं लक्ष्य | १५० कोटी रु. |
| मध्यम ” ” ” | ५० ” ” |
| दीर्घ ” ” ” | २५ ” ” |

**बाजारपेठ आणि प्रक्रिया :**

| | |
|---|---|
| स्थापण्यांत यावयाच्या प्राथमिक बाजारपेठ संस्थांची संख्या | १,८०० |
| सहकारी साखर संस्था | ३५ |
| सहकारी सरकी काढण्याचे कारखाने | ४८ |
| इतर सहकारी प्रक्रिया संस्था | ११८ |

**गुदामें वा सांठे :**

| | |
|---|---|
| मध्यवर्ती व राज्य कार्पोरेशनच्चीं गुदामें | ३५० |
| बाजारपेठ संस्थांचीं गुदामें | १,५०० |
| मोठ्या संस्थांचीं गुदामें | ४,८०० |

हा कार्यक्रम पार पाडतांना प्रत्येक खेड्यांतील प्रत्येक कुटुंब किमानपक्षीं एका तरी सहकारी संस्थेचें सदस्य होईल आणि हीं कुटुंबें कर्ज देण्यास पात्र ठरतील या गोष्टीकडे खास लक्ष देण्यांत येत आहे.

सहकारी शेतीचा विचार करतां मसुरी येथील परिषदेंत असें सुचविण्यांत आलें आहे कीं, प्रत्येक राष्ट्रीय विस्तार गटांत एक सहकारी शेत संस्था स्थापन व्हावी. अनुकूल परिस्थिति असलेल्या अशा गटांत १९५६–५७ मध्यें सुमारें ५०० संस्था स्थापण्याचा प्रयत्न व्हावा, असेंहि सदर परिषदेनें सुचविलें आहे.




[ स्थापना १९२१ ]

गरगट्टी अँड सन्स

शहापूर–बेळगांव

धोबी, फॅमिली व शिंपी

पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे ग्राहकांस हें वर्ष सुखाचें जावो !

# धी बँक ऑफ सिटिझन्स लिमिटेड

मुख्य कचेरी—१५१४ मारुती गल्ली, बेळगांव

( स्थापना १९३७ )

*सुरक्षितपणा, सचोटी व सेवा या त्रयींवर अधिष्ठित असलेली*

बेळगांव, धारवाड, कारवार आणि विजापूर या जिल्ह्यांतील प्रमुख शहरीं बँकेच्या शाखा असून सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करणारी

**मुंबई-कर्नाटकांतील एक प्रमुख बँक**

मुंबई व इतर ठिकाणांहून रेलवे रिसिटस् वसुली-साठी पाठविणेची सोय आहे.

**जी. डी. सराफ**
चेअरमन

************************************

आमचे हितचिंतकांना ही दिवाळी भाग्याची जावो !

# दि मिरज स्टेट बँक, लिमिटेड, मिरज

( स्थापना १९२९ )

शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | २५ लाख रुपये |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | १२ लाख रुपये |
| वसूल भांडवल | ६ लाख रुपये |
| रिझर्व्ह फंड | ६ लाख रुपये |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

शाखा : पंढरपूर, कुर्डूवाडी, बार्शी, करमाळा, लक्ष्मेश्वर व सांगली.

ही दिवाळी व नवें वर्ष आमचे खातेदार, भागीदार व हितचिंतक ह्यांना उत्कर्षाचें जावो.

श्री. एन. पी. कानिटकर, चेअरमन. | के. डी. शिराळकर, मॅनेजर.

मुंबई राज्यांतील एक आदर्श अर्बन सहकारी बँक

# दि भुसावळ पीपल्स को. बँक लि.

स्टेशन रोड, भुसावळ. ( पू. खा. )

फो. नं. ३६ ] स्थापना १९२५ [ पोस्ट बॉक्स नं. ३

३०-९-१९५६ चे आकडे

| | |
|---|---|
| भांडवल | रु. २,००,००० |
| खपलेलें | रु. १,६८,१५० |
| रिझर्व्ह फंड | रु. १,११,६४६ |
| इतर रिझर्व्हज् | रु. १,६८,९०१ |
| ठेवी ( सर्व प्रकारच्या ) | रु. २६,१७,११७ |
| खेळतें भांडवल | रु. ३४,११,४४७ |

*—डायरेक्टर मंडळ व अधिकारी—*

श्री. रामकृष्ण सोनजी पाटील, चेअरमन.
श्री. भीमभाई वसनजी नायक, व्हाइस चेअरमन.
श्री. सदाशिव दामोदर नाईक
श्री. निवृत्ति रामचंद्र फालक
श्री. देवराव तोताराम चौधरी
श्री. हरी सदाशिव खरे
श्री. प्रभाकर सेनू महाजन
श्री. जिनाभाई जी. देसाई, मॅनेजर
श्री. रतनजी एन. देसाई, आसि. मॅनेजर

★ सभासद व बिगर-सभासद ह्यांचेकडून बँक करंट, सेव्हिंग्ज आणि मुदती ठेवी सोइस्कर व्याजाच्या दरानें स्वीकारते. कर्जदारांना रिबेट, हें बँकेचें खास वैशिष्ट्य आहे. मेंबर्स प्रॉव्हिडंट फंड ह्या नांवाची बचत योजना अंमलांत आहे. बँक सभासदांना वैद्यकीय मदतीची व्यवस्था करते. शेअर्स, रोखे, विमा पॉलिसी, शेतीचा व औद्योगिक माल, सोन्या-चांदीचे दागिने, ह्यांचे तारणावर बँक सभासदांना कर्ज देते.

**सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.**

# दि पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

स्थापना वर्ष ] बँक लि. [ १९३५

पेण, जि. कुलाबा

( सहकारी कायद्यान्वयें स्थापन झालेली )

| | |
|---|---|
| भागांची संकलित मर्यादा | रु. ५०,००० |
| खपलेल्या भागांची रक्कम | रु. ४६,००० |
| रिझर्व फंड | रु. ३१,६९३ |
| खेळतें भांडवल | रु. ३,९६,८५० |

********************
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
********************

ना. य. नेने, चेअरमन.

व्ही. व्ही. कोठारी, मॅनेजिंग डायरेक्टर.

# कारखानदारीचे कांहीं प्रश्न

लेखक :—श्री. विवेक परदेशी

पारतंत्र्यांत असतांना परकीय राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणावर देशांतील साऱ्या दुःसह स्थितीचें खापर फुटत असे. कारखाने कां चालत नाहींत ? ते किफायतशीर कां होत नाहींत ? भांडवल कां मिळत नाहीं ? उत्पादनतंत्रांत सुधारणा कां होत नाहीं ? कामगारांना योग्य मेहनताना आणि सुखसोयी कां देतां येत नाहींत ? — या साऱ्यांचें उत्तर एकच : परकीय राजसत्ता, हें असे.

युद्धकाळांत परिस्थिति पालटली. कारखाने तेजींत आले. सर्वत्र पैसाच पैसा झाला. रंकाचा राव झाला. हें युद्ध आपलें नव्हे अशी मनोधारणा असल्यानें ध्येयवाद असा राहिला नाहीं. ज्यानें त्यानें आपल्याकडे पैसा किती आणि कसा येतो इकडे लक्ष केंद्रित केलें. ज्यांना जें शक्य होतें तें त्यांनीं केलें. त्यांत सारेच होते. हा होता, तो नव्हता, असें कांहीं नव्हतें. त्याग, देशप्रेम, विसरल्यासारखें झालें. पैसा मिळवला म्हणूनहि कांहीं कोणाचे विशेष आक्षेप नव्हते. तो कोठें आणि कसा खर्च झाला याकडे कळत-नकळत अनेकांचें लक्ष होतें. अनेकांनीं पाहिलें, ऐकलें, उपभोगलें. मिळालेल्या अमाप पैशांपैकीं कांहीं थोडा कारखान्यांच्या वाढीला आणि उत्पादनकार्याला लागला. बाकीचा सारा इतरत्र गेला. वैयक्तिक मिळकती वाढल्या. श्रीमंतीचा दिमाख वाढला. समाजांत विषमता नव्या तेजानें तळपूं लागली. जुनीं मूल्यें जाऊन भलतीं मूल्यें आलीं. लक्ष्मीचे हे विलास पाहून विचारवंतांनाहि उबग आला. देशांत समाजवादी विचारसरणी वाढीला लागली. त्याविना तरणोपाय नाहीं, अशी भावना सर्वत्र पसरली.

आणि स्वातंत्र्य मिळालें. देशी धंद्यांना उत्तेजन देण्याचें सरकारी धोरण सुस्पष्ट होत गेलें. सर्वच स्वतंत्र राष्ट्रें आपल्या उद्योगधंद्यांना उपकारक असें धोरण आंखतात. त्याचा परिणाम असा होत आहे कीं, परदेशी मालाची अनिर्बंध स्पर्धा थांबून स्वराज्यकाळांत देशी धंद्यांना प्रोत्साहन मिळाल्यामुळें ते स्थिरावले असून भरभराटीला येत आहेत.

## कारखानदारीचें बदलतें स्वरूप

स्वातंत्र्योत्तर काळांत कारखानदारीचें स्वरूप पार पालटून गेलें असून अगदीं नवीन असे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

देश स्वतंत्र झाला म्हणजे तेथील आपली बाजारपेठ कायम राखण्याकरितां त्या देशांतच परदेशी कंपन्या आपले कारखाने घालतात. भरपूर भांडवल, उत्पादनतंत्र साधलेलें, पत मोठी, माल नामवंत असल्यानें असे कारखाने तावडतोब यशस्वी होतात.

कांहीं धंद्यांत परदेशी कारखानदार स्वतःची स्वतंत्र कंपनी न काढतां देशी कंपन्यांशीं तांत्रिक मदतीचे करार करतात व जरूर तर भांडवलांत भागीदारी करतात. देशांतील प्रथितयश श्रीमंत कारखानदार किंवा मोठे धंदेवाईक हेच अशा सामायिक कारखानदारींत असतात. गेल्या कांहीं वर्षांत जे नवीन कारखाने सुरू झाले त्यांत असे भांडवलदार असल्याचें दिसून येतें.

देशांत आतां सहकारी कारखानदारीहि रूढ होत आहे. त्यांत सरकारचा भाग मोठा, सहकाराचा भाग कमी असला, तरी असें कांहीं तरी प्रयत्न केल्याखेरीज सहकारी वृत्तीची जोपासना आणि वाढ कशी होणार ? देशाची आजची स्थिति आणि मनोधारणा लक्षांत घेऊन प्रा. धनंजयराव गाडगीळांसारखे विचारवंत या प्रकारच्या कारखानदारीला प्रोत्साहन देत आहेत.

सरकार स्वतः कारखानदारींत पडत आहे. सरकारी पद्धतीच्या कामांतील गुणदोषांची चर्चा करण्याची वेळ आतां राहिलेली नाहीं. सरकार केव्हां काय हातीं घेतें, एवढेंच तूर्त पहात रहावयाचें आहे.

## नियोजन आणि लहान कारखाने

राष्ट्रीय नियोजन आलें म्हणजे प्रचंड खर्च आणि उत्पादन आलें. म्हणजे मोठे भांडवलदार (सरकार असो वा खाजगी पुंजीपति असोत) आणि मोठाले कारखाने आणि यांत्रिक उत्पादन आलें. त्याबरोबर सरकारी नियंत्रण आलें. म्हणजे आंकडेवारी, अहवाल, निवेदनें आलीं. कागदी पसारा वाढला, भेटीगांठींचीं चक्रें सुरू झालीं. सरकारी यंत्रणेकडून आपलीं कामें करून घ्यावयाचीं हीं लहान खाजगी कारखानदारीला सहज झेपणारी गोष्ट नाहीं.

पूर्वीं कारखान्याकरितां भांडवल मागतांना व देतांना देशकार्याचा अंश असे. आतां सरकारी कारखान्यांपासूनचे सारेच देशी. अशा स्थितींत लहान खाजगी कारखान्यांना भांडवल मिळवणें अधिकाधिक कठिण होणें सहाजीकच वाटतें. सरकारच्या प्रेरणेनें कारखान्यांना कर्ज देणाऱ्या कांहीं संस्था नव्यानेंच सुरू झाल्या आहेत. त्या तारणावर कर्जें देतात आणि त्यावरील व्याज पहिल्या दिवसापासून घेतात, या साऱ्या गोष्टी कितीक कारखान्यांना पेलणाऱ्या आहेत ?

देशी कारखानदारीनें स्वराज्याच्या चळवळीच्या दिवसांत मूळ धरलें, युद्धकाळांत प्रगति केली. कारखानदार स्वदेशीप्रेमी, त्यांतले तरुण राष्ट्रीय शिक्षणानें भारावलेले, जनतेनें परदेशी मालावर बहिष्कार टाकला, स्वदेशी माल वापरण्याच्या शपथा घेतल्या. देशाभिमानानें फुललेलें तें वातावरण आज नाहीं. कारखानदारी हा आतां केवळ धंदा आहे; जनता गुणानें चांगला, किंमतीनें स्वस्त माल पसंत करते. याचा अर्थ फायद्यांत चालणाऱ्या कारखान्याला जनतेचें सक्रिय साहाय्य राहील; सहानुभूति राहील; गुणानें उत्तम, किंमतीनें स्वस्त माल काढणाऱ्या कारखान्याचा माल खपेल. स्वदेशी म्हणून कांहींतरी, ओबडधोबड मालाला भरमसाट किंमत देण्यास जनता आतां तयार नाहीं.

आजचें वातावरण नोकरीचें आहे. शिक्षण नोकरीचें आहे. नोकऱ्या थोड्या पण नोकरी मागणारे पुष्कळ असल्यानें त्या बाजारांत गुणांखेरीज इतर गोष्टींना विशेष महत्त्व चढलें तर नवल नाहीं. या साऱ्यांचा परिणाम असा होत आहे कीं, गुणांचें चीज होत नाहीं अशी विफलता पसरत आहे.

## व्यवस्थापक मंडळी

कारखान्यांतील लहानमोठ्या व्यवस्था पाहणाऱ्या मंडळींना दुहेरी आणि दुटप्पी जीवनाचा अनुभव येत आहे. त्यांच्याबद्दल मालकमंडळींची अपेक्षा अशी कीं त्यांनीं मालकांच्या अडचणी, त्यांचीं धोरणें कामगारांना समजावून सांगावीत. तेच मधले दुवे. उलट, मजुरांना वाटतें, "ते आमच्यासारखेच पोटार्थी. त्यांना पगार जास्त मिळतो एवढाच काय तो आमच्या-त्यांच्यांत फरक. आमच्या

कामाला त्यांनीं मान्यता द्यावी, त्यांत कटकटी काढूं नयेत. फार त्रास दिल्यास काय तें पाहून घेऊं! मालकांचे हे हस्तक, आमच्या श्रमावर आपली पोळी भाजून घेतात." व्यवस्थापक मंडळी अनुभवतात, विचार करतात, तो असा: "मालक स्वतःला पाहिजे तसें करतात. तेव्हां कांहीं आपल्याला विचारीत नाहींत. सांगितलें तरी मानत नाहींत. स्वतःच्या हिताला धक्का बसत नसला म्हणजे कोठेंहि कांहींहि मान्य करून मोठेपणा मिळवण्याचा प्रयत्न करतील. योग्यायोग्यतेचा विचार करणार नाहींत. आमच्या मताला किंमत देत नाहींत. अडचणींच्या वेळीं आम्हीं त्यांचे; इतर वेळीं आमची आठवणहि नसते. तसें पाहिलें तर कामगारांचें म्हणणें तत्त्वतः बरोबरच आहे. कांहीं वेळां मात्र अतिप्रसंग करतात. एकंदर काम न करण्याकडे प्रवृत्ति. पगारवाढ मात्र पाहिजे. असें कसें चालेल? किती दिवस चालेल? पण आपल्याला काय करावयाचें या साऱ्या गोष्टींशीं? मालक आणि मजूर दोघेहि सारखेच. स्वतःच्या स्वार्थापुरते आम्हांला विचारणार, त्यांच्या मनाप्रमाणें झालें नाहीं कीं आमच्यावरच घसरणार. आपल्याला दिवस काढावयाचे आहेत. वाढती महागाई, वाढती मालकशाही, वाढती कामगारशाही, हें कांहींच पटत नसलें तरी सर्वांशीं मिळतें घेऊनच राहूं या. अमेरिकेंतील कारखानदारी घ्या; रशियांतील कारखानदारी घ्या. तेथें व्यवस्थापक मंडळींना किती महत्त्व देतात तें पहा. आपल्याकडेहि तशी वेळ कालांतरानें येईल, आमचें महत्त्व मान्यता पावेल आणि आजची अगतिक स्थिति नाहींशी होईल, अशी आशा करूं या.

### कामगार

वाढत्या कारखानदारीबरोबर कामगार-प्रश्नांचें महत्त्व वाढणें क्रमप्राप्तच ठरतें. युद्धकाळांत आणि नंतर किमान वेतन, पगार-वाढ, बोनस, नोकरीची शाश्वति, इत्यादि बाबतींत कामगार-संघटनांनीं स्पृहणीय यश मिळविलें. कारखानदारींतला प्रमुख घटक, असा कामगारांचा गौरवपर उल्लेख आतां करण्यांत येतो. टाटानगर, कलकत्त्याची ॲल्युमिनिअम कंपनी, कोइंबतूरच्या कापड गिरण्या यांनीं कामगारांशीं पांच वर्षांपर्यंतचे करार केले असून त्या मुदतींत ना संप, ना टाळेबंदी, अशांसारख्या व्यवस्था आहेत. नवयुगाची जाणीव यावरून येईल; सतत औद्योगिक तंट्यांनीं संत्रस्त झालेल्या कारखानदारीला दिलासा मिळेल.



संस्था म्हटली म्हणजे कांहींना कांहीं कार्य आलेंच. काम नसलें तर कांहींतरी करून तें काढलें पाहिजे. सतत कार्य नसेल तर संस्था चालणार नाहीं. कामगारांच्या हक्काकरितां झगडणाऱ्या संस्थांना विधायक कार्य देऊन कामगार-जीवनांत त्यांची उपयुक्तता वाढवितां येणें शक्य आहे कां? कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांचें सरासरी उत्पन्न शेतकी कामकऱ्यांपेक्षा किंवा दर माणशीं राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा पुष्कळच अधिक आहे. ही विषमता फार काळ टिकूं शकणार नाहीं. औद्योगिक कार्यक्षमता वाढून कारखानदारीचा माल स्वस्त झाला पाहिजे; नाहींतर इतरांचें उत्पन्न वाढून कारखानदारीचा माल घेण्याची त्यांची खरेदी-शक्ति तरी वाढली पाहिजे. तसेंहि जर झालें नाहीं तर कारखान्यांत माल पडून राहून साठे होऊं लागतील, मग उत्पादन तोडण्यांत येईल, मग बेकारी! बहुसंख्य मंडळींना कामकरी जीवन नवीन आहे. नवीन शिस्त, कामाची आवड, कार्यक्षमता, सहकार्य, हक्कांची आणि कर्तव्याची जाणीव उत्पन्न करण्याचें कार्य नाजूक आणि कठीणहि आहे. आज नाहींतर उद्यां, या गोष्टींत औद्योगिक जीवनाशीं संबंध असलेल्या मंडळींना अधिक आस्थेनें लक्ष घालावेंच लागेल.

### काळाचें आव्हान

आजचा जमाना लोकशाहीचा आहे, संमिश्र आर्थिक व्यवस्थेचा आहे, समाजवादी जीवनाचा आहे. त्यांत पुंजीपतींचें भांडवल, बुद्धिजीवींची बुद्धि आणि श्रमजीवींचे श्रम राष्ट्रकारणीं लावण्याचे प्रयत्न होत आहेत. जर्मनीचें जाज्वल्य देशप्रेम आमच्यांत नाहीं. इंग्लंडला औद्योगिक प्रगति करण्यास मिळालेला अवसर आम्हांला नाहीं. रशियाची एकतंत्री राज्यपद्धति आमचेकडे नाहीं. आमचा मार्ग स्वतंत्र आहे. अखेरीस ता मार्ग मोठ्या कारखानदारीचा आहे असें दिसतें, मग ती कारखानदारी सरकारी असो वा खाजगी असो. लहान आणि मध्यम कारखानदारीपुढें भांडवलाचे, उत्पादनक्षमतेचे, असे अनेक प्रश्न आहेत. त्याबरोबरच कामगारांचाहि प्रश्न आहे. कांहींच नसल्यापेक्षा अर्धी भाकरी बरी हें खरें; पण ती मिळूं लागल्यावर सबंध भाकरी असावी, निदान दोन तरी असाव्यात, असें वाटणें सहाजिक आहे, मनुष्यस्वभावाला धरूनच आहे. शेजारच्या कारखान्यांतल्या कामगाराला जास्त पगार मिळतो; आपल्यालाहि तेवढा पगार कां मिळूं नये? कामगार-संस्थांच्या सतत मागण्या वाढत्या पगाराच्या असतात, त्या पुऱ्या झाल्या नाहींत तर कामगार असुखी होतात. हातीं असलेलें कामहि बिघडूं लागतें, आणि कारखान्याला नुकसान लागूं लागल्यावर तर कारखानदार व कामगार या दोघांच्याहि असुखांत भरच पडत जाते. अशा स्थितींत कारखाना किती दिवस चालणार? देशांत भयानक बेकारी आहे. तिचा परिणाम कामगारवेतनावर होतच राहणार हें खरें असलें तरी ठरलेल्या वेतनश्रेणींवर त्याचा परिणाम सहजी होत नाहीं असेंहि आहेच.

महाराष्ट्रांत तंत्रज्ञांनीं लहान प्रमाणावर कारखाने सुरू करून आपल्या कष्टानें, बुद्धीनें, अविश्रांत मेहनत करून ते तगवले, वाढवले, मोठे केले. गेल्या दहा वर्षांत नांव घेण्यासारखा एकहि नवीन कारखाना सुरू झाला नाहीं; बुडाले मात्र अनेक. वैयक्तिक गुणदोषांबरोबरच बदललेली परिस्थितीहि या घटनांना कारणीभूत असली पाहिजे. नवमहाराष्ट्रांत कारखानदारी टिकविण्याकरितां व वाढविण्याकरितां नवयुगांतील नवविचारांचा मागोवा घेऊनच नवप्रयत्न व्हावयास पाहिजेत हें उघड आहे.


खर्चांत बचत करा व पैसा शिलकींत टाका

# सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. | ७,६२,००० |
| रिझर्व्ह | रु. | ७,१३,००० |
| ठेवी | रु. | १,५७,००,००० |



शाखा: फोर्ट, दादर, माहिम, पुणें, बेळगांव.

स्थापना १९१८



ही दिवाळी व नवें वर्ष बँकेच्या सर्व खातेदारांस, भागीदारांस व इतर संबंधीयांस सुखाचें व भरभराटीचें जावो.

# दी बँक ऑफ औंध लि.

(स्थापना : १९३८)

हेड ऑफिसः—१११-११२, सदाशिव पेठ, सातारा.

शाखाः—औंध, भवानीनगर व ओगलेवाडी.

| | | | |
|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | ... | रु. ३,४१,००० |
| वसूल भांडवल | ... | ... | रु. १,७०,५०० |
| रिझर्व्हस् | ... | ... | रु. ९१,००० |

—: संचालक मंडळ :—

श्री. नरहर गंगाधर जोशी, बी. ए., एलएल्. बी., वकील, सातारा.

श्री. बाळकृष्ण गणेश चांदोरकर, बी. ए., एलएल्. बी., वकील, सातारा.

डॉ. माधव दत्तात्रय बोकील, एल्. सी. पी. अँड एस्. डी. ओ. एम्. एस्. (बॉंबे),

श्री. रघुनाथ दिनकर माजगांवकर, व्यापारी, सातारा.

श्री. बाळकृष्ण रामचंद्र वर्तक, व्यापारी व कमिशन एजंट, पुणें.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

मुदतठेवी खालील व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात

१ वर्ष—३ टक्के, ३ वर्षें—३॥ टक्के, ५ वर्षें—४ टक्के, ७ वर्षें—४॥ टक्के व १० वर्षें—५ टक्के.

मुंबई, पुणें, अहमदाबाद, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, अहमदनगर, भिवंडी, नागपूर, हुबळी, कोपरगांव, कऱ्हाड, वगैरे प्रमुख ठिकाणांवर माफक दरांत ड्राफ्ट दिले जातात.

विशेष माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

बा. वा. घमंडे, C. A. I. I. B. मॅनेजर.

न. गं. जोशी, B. A., LL. B. चेअरमन.



माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

## बिन-सरकारी कंपन्यांना नव्या भांडवल उभारणीची परवानगी

### जानेवारी, १९४८ ते जून, १९५६ अखेर प्रत्येकीं १ कोटी रु. वरचे मंजूर केलेले अर्ज

| कंपनी | रक्कम (कोटी रु.) | प्रकार | वर्ष | तपशील |
|---|---|---|---|---|
| रॅलीज ( इंडिया ) | ३·०० | ऑर्डि. व प्रेफरन्स | १९४८ | २२५ लक्ष रु. ऑ., ७५ लक्ष रु. ६% करपात्र प्रे. |
| एअर इंडिया इंटरनॅशनल | २·०० | ऑर्डि. | » | सरकारनें ९८ लक्ष रु. चे भाग घेतले. |
| फर्टिलायझर्स अॅण्ड केमिकल्स, त्रावणकोर | २·०० | » | » | |
| अहमदाबाद इलेक्ट्रिक | १·५० | » | » | |
| बॅंक ऑफ इंडिया | १·०० | » | » | |
| सिंधा स्टीम नॅव्हिगेशन | ५·०० | डिबेंचर | » | ४½% करपात्र १९६३ |
| मॅकनील बॅरी | २·५० | ऑ. व प्रे. | १९४९ | १५० लक्ष रु. ऑ., १०० लक्ष रु. ५½% करपात्र प्रे. |
| नेपा मिल्स | १·४० | ऑ. | » | |
| नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन | १·६८ | ऑ. व प्रे. | » | ८०·५ लक्ष रु. ऑ., ८७·५ लक्ष रु. ५% करपात्र प्रे. |
| टाटा पॉवर | १·०० | डिबेंचर | १९५० | ४% करपात्र १९६५–७० |
| नॅशनल मशिनरी मॅन्युफॅक्चरर्स | २·५० | ऑ. व प्रे. | १९५० | १५० लक्ष रु. ऑ., १०० लक्ष रु. ५% करपात्र प्रे. |
| ईस्टर्न शिपिंग | २·०० | ऑ. | » | |
| अहमदाबाद इलेक्ट्रिसिटी | २·५० | ऑ. व डिबेंचर | » | १७५ लक्ष रु. ऑ., ७५ लक्ष रु. ४½% करपात्र डिबेंचर १९६० |
| टाटा लोकोमोटिव्ह | २·५० | » | » | १०० लक्ष रु. ऑ., १५० लक्ष रु. ५% करपात्र डिबेंचर्स १९६०-६५ |
| इंडियन आयर्न | १·५० | प्रे. | » | ५% करमाफ |
| कलकत्ता इलेक्ट्रिसिटी | २·६६ | डिबेंचर | » | ५% करपात्र १९७० |
| डनलॉप रबर | १·३० | » | » | ५% करपात्र १९६१–७१ |
| बॅंक ऑफ इंडिया | १·०० | ऑ. | १९५१ | |
| ईस्टर्न शिपिंग | १·०० | » | » | |
| ओरिएंट पेपर | १·०० | डिबेंचर | » | ५½% करपात्र १९६१ |
| अहमदाबाद इलेक्ट्रिसिटी | १·७५ | ऑ. | १९५२ | |
| बकिंगहॅम अॅंड कर्नाटिक | १·०० | डिबेंचर | » | ५% करपात्र १९६७–७२ |
| टाटा हैड्रो, टाटा पॉवर, आंध्र व्हॅली | ३·०० | ऑ. | १९५३ | प्रत्येकीं १·०० कोटी रु. |
| स्टॅंडर्ड व्हॅक्यूम रिफाइनरी | ४·०० | डिबेंचर | » | ५½% करपात्र १९६४–६८ |
| अहमदाबाद इलेक्ट्रिसिटी | २·५० | ऑ., डिबेंचर | १९५४ | १,७५ लक्ष रु. ऑ., ७५ लक्ष रु. ४½% करपात्र डिबेंचर, १९६० |
| टाटा लोकोमोटिव्ह | १·२० | ऑ. | » | |
| इंपीरिअल टोबॅको | १·०० | ऑ. | १९५४ | |
| इंडियन केबल | १·०० | डिबेंचर | » | ५% करपात्र १९६४-६९ |
| बर्मा शेल | ८·०० | » | » | ५½% » १९६५-६९ |
| इं· क्रेडिट अॅंड इ. कॉर्पोरेशन ऑफ इंडिया | १·५० | ऑ. | १९५५ | ५ कोटी रु. भांडवल विक्रीस काढलें (२ कोटि रु. बॅंका व विमा कं., १·५ कोटि रु. इंग्लंड व अमेरिका) |
| शिरपूर पेपर | १·०४ | » | » | |
| वेस्ट कोस्ट पेपर | १·६० | ऑ. प्रे. | » | १ कोटी रु. ऑ., ६० लक्ष रु. ६% करमाफ प्रे. |
| जयाजीराव कॉटन | १·०० | प्रे. | » | ५½% करमाफ १९६५ |
| रोहटस इंडस्ट्रीज् | १·१४ | ऑ. | » | |
| धांगध्रा केमिकल | १·०३ | ऑ. प्रे. | » | ४३ लक्ष रु. ऑ., ६० लक्ष रु. ६% करमाफ प्रे. |
| दिल्ली क्लॉथ अॅंड जनरल मिल्स | १·०० | डिबेंचर | » | ५½% करमाफ १९६२–६६ |
| नॅशनल रेयॉन कॉर्पोरेशन | १·५० | » | » | ५½% करपात्र १९६५–७० |
| काल्टेक्स ऑइल | २·०० | » | » | ५½% करपात्र १९६६–७० |
| हिंदुस्थान मोटर्स | ५·०० | प्रे. | १९५६ | ६% कन्व्हर्टिबल करमाफ प्रे. |
| केसोराम कॉटन | १·०० | » | » | ५½% करमाफ |
| टाटा लोकोमोटिव्ह | १·५० | डिबेंचर | » | ५% करपात्र १९६०–६५ |
| टाटा आयर्न अॅंड स्टील | ९·६४ | ऑ. | » | ७५ रु. च्या शेअरवर ३० रु. प्रीमिअम ने भांडवलाची मागणी. |

# कापड गिरणीची आंतून पहाणी

## कार्यक्षम संघटनेचीं सुसूत्र चक्रें

लेखकः—श्री. ग. कृ. चितळे, बी. कॉम्.

गेल्या वर्षीचे "अर्थाचे" दिवाळी अंकांत कापड गिरण्यांच्या शंभर वर्षांचे प्रगतीचा आढावा घेतला. या वर्षी गिरणीची आंतली थोडी माहिती देत आहे.

आपल्या देशांत सुरवातीला चीनला सुताचा पुरवठा करण्यासाठी व हातमागाला सूत पुरविण्याकरतां सूत कातण्याच्या गिरण्या निघाल्या. पुढें चीनचा आपला सुताचा व्यापार आपल्या हातून गेला. गिरणी मालकांना कापड विणण्याशिवाय मार्ग राहिला नाहीं, अशी आहे कापड गिरणीची सुरवात. कांहीं थोड्या गिरण्या सध्या फक्त सूत काढतात. इतर देशांत कांहीं गिरण्या नुसतें सूत काढतात व तें कापड विणणाऱ्या गिरण्यांना विकतात, व कांहीं कापड गिरण्या कोरें कापड, कापड धुणाऱ्या कंपन्यांना विकतात. आपलेकडे असे स्वतंत्र एकेक भाग तयार करणाऱ्या गिरण्या नसून, सर्व संस्कार एकच गिरणी करते. गेल्या लढाईनंतर पश्चिमेकडील देशांप्रमाणें कांहीं थोडे व्यापारी कोरें कापड व सूत घेऊन तें, "डाइंग ब्लिचिंग" कंपन्यांकडून धुवून किंवा रंगवून विकतात. दुसरे महायुद्धानंतर आपले राष्ट्रीय सरकारनें गिरण्यांची पहाणी केली. जिला "बॅलन्सड गिरणी" म्हणतां येईल तींत जेवढें कापड विणण्याचे साचे असतील त्यांना पुरेल येवढें सूत तयार करण्यास लागेल इतकी सूत-यंत्रसामुग्री असली पाहिजे. जेथें कमी होती, त्या गिरण्यांनीं जरूर तेवढीं यंत्रें बसवावीं अशी सवड देण्याची व्यवस्था होऊं लागली.

जगांत कापड व सूत तयार करणाऱ्या देशांत आपला साधारणपणें तिसरा नंबर लागतो, व कापड काढण्यांत दुसरा. अशा महत्त्वाचा उद्योग करणाऱ्या गिरणींत काय चालतें तें पहावयाची उत्कंठा आमचे एका मित्राचेमुळें पुरविली गेली. त्यांचे ओळखीनें आम्हीं एका गिरणींत प्रवेश मिळण्याची तजवीज केली व त्याप्रमाणें त्या गिरणीचे दरवाज्यावर पोंचलों. प्रथम दरवाज्यांत रखवालदारानें आमचें कार्ड मागून घेतलें व तें नोंद कारकुनास दाखविलें. त्यास आगाऊ सूचना असलेमुळें, त्यानें त्याच्या व्हिजिटर्स बुकमध्यें आमचें नांवाची नोंद करून, कार्ड मॅनेजरकडे पाठविलें. त्यांनीं एका ऑफिसरला बोलावून आम्हांस गिरणी दाखविण्यास सांगून, "परत जातांना पांच मिनिटें भेटा" असें सांगितलें. आमचे बरोबर दिलेले ऑफिसर मोठे गोड बोलणारे निघाले; परंतु त्यांनीं "खास" माहिती, उत्पादनाचे आंकडे, यंत्रागणिक कामगार, भाव, वगैरे गोष्टी व गिरणींतील खात्या-खात्यांतील रेकॉर्डबुकें वगैरे मात्र पाहूं दिलें नाहीं. तथापि, इतर पुष्कळ गोष्टी त्यांनीं खुलासेवार सांगितल्या. सुरवातीला त्यांनीं आम्हांस "क्लोदिंग इंडियाज् मिलियन्स्" ही यंत्रांचीं चित्रें व माहिती देणारी पुस्तिका दिली व ती चाळींत असतांना त्यांनीं थोडी प्रास्ताविक माहिती सांगितली. ते म्हणाले :—

पांच मिनिटांत मी थोडी प्रास्ताविक माहिती देतों. आपण पुस्तिका चाळींत असतांना कानावर घालतों म्हणजे पुढें गिरणी पाहतांना कांहीं गोष्टी सहज ध्यानांत येतील.

मुंबईसारख्या दाट वस्तीच्या शहरांत जागा मुबलक नसल्यामुळें अगदीं जरूरीपुरती गोडाऊन्स बांधतां येतात, व गिरणी दोन-तीन मजल्यांची बांधावी लागते. बाहेर गांवांतून, गिरण्या साधारणपणें कापूस पिकतो त्या भागांत बांधतात, व सर्व खातीं एका शेजारीं एकास एक जोडून असतात. त्यांना कंपाउंडमध्यें पुष्कळ गोडाऊन्स बांधतां येतात, प्लॅटफॉर्म बांधून सीझनमध्यें कापूस सुटा व गांठींत सांठवितां येतो. मुंबईसारख्या शहरीं सुटा—बोरें भरलेला कापूस आणतां येत नाहीं. बाहेरगांवीं असा सुटा कापूस कापसाचे हंगामांत भरपूर वापरतां येतो. यांत कापसाची गांठ बांधण्याचा खर्च वांचतो.

आपलेकडील जुन्या गिरण्यांतील यंत्रसामुग्री आमूलाग्र बदलण्याची जरूरी आहे, व तशी सुरवातहि झाली. लढाईपूर्वीच्यापेक्षा सध्यांचे यंत्रांची किंमत पांचपट तरी झाली आहे, त्यामुळें नवीं यंत्रें बसविणें फारच खर्चाचें आहे; पण नाइलाज आहे. यंत्रें बदललींच पाहिजेत. तरच जगाचे चढाओढींत आम्हीं तग धरूं. पूर्वी आमचेकडे कोरें कापड खेडोंपाडींच नाहीं तर तालुक्यांचे गांवांत वापरीत. आतां जनतेच्या आवडीनिवडी पार बदलत चालल्या. धुवट तलम कापड खेडोंपाडींहि वापरण्यांत येतें, त्यामुळें पूर्वीचें जाडेभरडें कापड विणण्याचे व त्यासाठीं जाडें (कोअर्स) सूत कातण्याचे साचे आम्हांस हळूहळू काढून टाकून, निदान ३०–४० नंबरचें सूत व त्यापासून कापड तयार करण्याची यंत्रसामुग्री आणावी लागत आहे. पूर्वी जाडेभरडें कपड्यासाठीं १४–१८ नंबरचें सूत काढत व साधें कोरें कापड एकदम बाजारांत जाई. आतां आम्हांस चांगलें कापड, धुवून, कांहीं उत्तम छटांत रंगवून, प्रिंटिंग व मर्सराइज करून, जनतेला आवडेल अशा तऱ्हेचें काढावें लागतें. त्यासाठी उत्तम तऱ्हेचीं अद्ययावत यंत्रें आणावीं लागतात, जनतेच्या आवडीनिवडीचा अभ्यास करावा लागतो; त्याचप्रमाणें कामगारांसाठीं अनेक सुखसोई करावयास कायद्यानें भाग पडतें. त्यासाठी आतां माझ्यासारखे लेबर वेल्फेअर ऑफिसर्स नेमून, नवीन परिस्थितींत खर्चाची वाढ झाली तिचा पुरेपूर मोबदला काढावा लागतो.

यावेळपर्यंत आम्हीं ती पुस्तिका चाळली होती. ती घेऊन आमचे वाटाडे, (यांना आतां आपण श्री. वाटाडे म्हणूं) यांचेबरोबर आम्हीं कापूस गोडाऊनपासून सुरवात केली. थोड्या जागेंत काठोकांठ गासड्या लावलेल्या, त्यावर कापसाची जात दाखविणारे बोर्ड लावलेले. त्या गांठी चढविण्याची थापी मारण्याची क्रिया पाहून गंमत वाटली. पुढें कापसाच्या गांठी फोडून कापूस सुटा करणारे यंत्राचे खोलींत आम्हीं गेलों. एका मशीन मागें रांगेनें २०–२५ गांठी मांडल्या होत्या. त्यावरील पट्ट्या काढून एका सरकरणाऱ्या लाकडी पट्ट्या लावलेल्या पट्ट्यावर दोन कामगार त्यांना उचलतां येईल एवढा कापूस निरनिराळ्या गांठींतून काढून टाकीत होते. यंत्राला एक कांचेची खिडकी होती तींतून आम्हीं पाहिलें तों तो कापूस एकाद्या धबधब्यांत खालीं पाणी उसळतें व पुन्हां पुन्हां चढतें–पडतें तसा खालींवर फेकला जाऊन सुटा होत होता व त्यांतील पत्ती, कचरा, बीं,

वगैरे तळाला चाळणीखाली पडत होतें. कांहीं मिनिटांनंतर तो बराच साफ झालेला व मोकळा मोकळा असा त्या यंत्राचे पुढें पडत होता. दुसरे दोन मजूर तो समोरचे मोठाले गाळ्यांत भरत होते. त्या गाळ्यावर १०, १४, १८, २४, ३० अशा पाट्या होत्या. त्यापैकी एकांत थराथरानें टाकीत होते. तेथें तो साधारण २४ तास राहील असें श्री. वाटाडे म्हणाले. गाळ्यावरील नंबराबद्दल विचारतां, आम्हांस त्यांनीं सांगितलें कीं, कापसांत निरनिराळ्या लांबीच्या जाती असतात. ५/८", ३/४", १ ३/८" वगैरे. त्यापासून निरनिराळ्या नंबराचें सूत काढतात. त्यासाठीं तो कापूस निरनिराळ्या गाळ्यांत सांठवून मग पुढें तो निरनिराळ्या वेळीं व निरनिराळ्या मशीनवर आणतात. त्यावेळीं त्यांनीं असेंहि सांगितलें कीं अद्ययावत पद्धतींत, एका बाजूस गांठींतील कापूस घालवयाचा व यंत्रांचे रांगेंत निरनिराळ्या यंत्रांतून आपोआप सरकत तो शेवटच्या यंत्रावर लॅप ( वळकटी ) होऊन बाहेर येतो. आमचेकडे जुन्या यंत्रसामुग्रीमुळें हातानें मधेमधे निरनिराळ्या मशीनमध्यें कापूस टाकावा लागतो. त्यामुळें मजुरी वाढते, व त्यांनीं हलगर्जीपणा केल्यास नुकसान होतें. हें सर्व नव्या पद्धतींत टाळतां येतें.

दुसऱ्या खोलींत आम्हांस नेतांना श्री. वाटाडे म्हणाले कीं आतां मिक्सिंग रूममधून, ब्लोरूममध्यें आलों. मिक्सिंग रूममधील यंत्रांत बराच कचरा निघाला, तरी जो राहिला तो ब्लोरूममध्यें निघेल व कापूस पुष्कळ साफ करून त्याच्या वळकट्या ( लॅप्स ) तयार होतात तीं हीं यंत्रें. सर्व वळकट्या एका ठराविक वजनाच्या निघतील अशी योजना. तथापि त्यापेक्षा हलक्याभारी निघतील, त्या परत यंत्रावर टाकतात. या यंत्राचें क्रियेंत पुष्कळ कचरा निघतो, फार आंखूड तंतू गळतात व कापसाचे तंतू शेजारी-शेजारी एकापुढें एक आणले जातात.

श्री. वाटाडे म्हणाले, यापुढील यंत्र "कार्ड" हें फार गुंतागुंतीचे व समजण्यास कठीण. या यंत्राचे "वागण्यावर" सुताची पुढील प्रत ठरते. आश्चर्य वाटेल तुम्हांला, पहा या मागच्या बाजूस लॅप ठेवलेला व पुढच्या बाजूस त्याचे वेळूंत ( स्लायव्हर ) रूपांतर होत आहे. मध्यंतरीं कापूस पिंजला जात आहे. राहिलेले लहान लहान तंतू, घाण, कचरा, पत्ती, वगैरे चाळणीखालीं गळून जात आहे व पांढरा व स्वच्छ कापूस, वेळू होऊन एका डब्यांत वाटोळा वाटोळा डबा फिरतो त्यामुळें वाटोळा थर होऊन भरला जात आहे. येथें प्रत्येक वेळूला थोडा पीळ बसत आहे, व तंतू एका शेजारी व एकापुढें एक असें जमून वेळूरूपांत आपणांस दिसत आहेत. येथून पुढें सूत कातण्याची क्रिया. टकळीचें, चरख्याचें तत्त्व; पण इंग्रजींत "मास प्रॉडक्शन" म्हणतात, तें उत्पादन करण्यासाठीं निरनिराळे संस्कार हळु हळु देत देत, तेंच तत्त्व, हीं पुढील यंत्रें आचरीत आहेत.

'कार्ड' नंतर कार्डयंत्रापुढील वेळूचे डबे पुढील यंत्रावर एकापुढें एक मांडून कांहीं डब्यांतील वेळू एका वेळूंत गुंडाळून यंत्रापुढील डब्यांत सांठविले जात आहेत. असें दोनतीनदां होऊन शेवटचे यंत्रावरील वेळू एका नव्या यंत्रावर आणले जात आहेत. मात्र या यंत्रापुढील डब्यांतील वेळूला बराच पीळ बसून ते एका मोठ्या बांबूवर ( स्लबिंग बॉबिन ) गुंडाळले जात आहेत. वेळूचीं यंत्रें ड्रॉइंगफ्रेम ( ड्रॉ=ओढणें ) या तत्त्वावर वेळूंतून ओढ देऊन तंतू शेजारीशेजारी व एकापुढें एक असे किंचित् पीळ घेत, ओढले जातात. यापुढील स्लबिंग, इंटर, रोव्हिंग व शेवटचें स्पिनिंग हीं चार यंत्रें एकाच तत्त्वावर काम देतात. तंतू एकापुढें एक आणून थोडा थोडा पीळ देत देत, शेवटच्या "स्पिनिंग फ्रेम"वर सर्व पूर्वसंस्कार पुरे होऊन, पुढील वापरासाठीं कापसाचें सूत तयार होतें. सुतास कांहीं मर्यादेपर्यंत पीळ द्यावा लागतो. निरनिराळ्या उपयोगासाठीं निरनिराळ्या प्रमाणांत पीळ असतो. कापडाच्या उभ्या धाग्यांतील पिळापेक्षा आडव्या धाग्यांत कमी पीळ असतो.

नवीन नवीन सुधारणा सारख्या होत आहेत व खर्चांत बचत करण्याच्या युक्त्या सांपडत आहेत, "हायड्राफ्टिंग ट्री" एक अशी युक्ति. तिचा उपयोग करून वरील चार यंत्रांतील दोन किंवा एक तरी यंत्र सहज कमी करतां येतें. त्यामुळें जागेची, भांडवलाची, स्टोअर्स व रिपेअर्सची, पॉवरची व मजुरीची बचत होते. शिवाय सुताची प्रत सुधारते. या चार यंत्रांत, मागीलपेक्षा पुढील यंत्रांत, सुताचा घेर कमी होत जातो, जास्त पीळ भरला जातो, कच्चे दुवे गाळले जातात, वगैरे संस्कार होत असतात. सूत गुंडाळलें जातें. त्या बांबूची ( बॉबिनची ) उंची व घेर मागीलपेक्षा पुढील यंत्रावर कमी कमी होत असतात, हें आमच्या चटकन् ध्यान्यांत आलें. श्री वाटाडे म्हणाले, त्याला कारण सुताचा घेर कमी कमी होत जातो हें आहे. त्याचप्रमाणें उभ्या धाग्यास लागणारे सुताचे बॉबिनपेक्षा आडव्या धाग्यास लागणारें सूत गुंडाळलें जातें तें बॉबिनहि निराळें दिसतें.

येथपर्यंत झालें सूतकताई खातें ( स्पिनिंग ). येथून पुढें सूत कुठें जातें, तें श्री. वाटाडे ऑफिसरनी सांगितलें. कापड गिरणी असलेमुळें, मुख्य भाग कापड विणण्यासाठीं, उभे धागे ( वार्प ) आडवे धागे ( वेफ्ट ) म्हणून वापरला जातो. कांहीं कापडांत रंगीत सूत लागतें, कांहींत धुवट लागतें व कांहीं सरकारी हुकुमाप्रमाणें हातमागासाठीं. या तीनसाठीं लागणारें सूत रहाटखात्यांत लगडी करण्यासाठीं जातें.

निरनिराळ्या खात्यांतून निरनिराळ्या जातीचे कामगार आम्हांस दिसले. त्यास ऐतिहासिक कारणें आहेत असें समजलें. कापसाच्या गांठी तोलून सांठवणें व त्या मिक्सिंग रूममध्यें आणून, त्या फोडून त्याचा सुटा कापूस करणें यासाठीं, मजबूत बांध्याचे सशक्त असे घाटी कामगार दिसले. पुढें ब्लोरूम व कार्ड यामध्यें भय्ये लोक आढळून आले. त्यापुढील खात्यांत मराठे लोक आढळले. मराठे लोकांत थोड्या स्त्रियाहि दिसल्या. पण पुढें रहाट खात्यांत ( रीलिंगमध्यें ) सर्व स्त्रियाच. आम्हीं विचारले, रात्रीं तर स्त्रिया कामावर ठेवतां येत नाहींत. मग रात्रपाळींत कोण कामें करतात. श्री. वाटाडे म्हणाले, अहो रात्रींचे पाळींत पुरुष काम करतात पण तें दिवस पाळींत कधीं ( साधारणपणें ) यावयाचे नाहींत. या रहाट खात्यांत सूत बॉबिनवरून काढून त्याच्या लगडी तयार होतात, व मग रंग खातें, धोबी खातें व हातमागाकडे जाणारें सूत, पॅकिंग खात्यांत जातें. मागें सूत चीनला जाई, आतां देशांतच हातमागासाठीं सरकारी वांटपाप्रमाणें निरनिराळ्या हातमाग सहकारी संस्थांना द्यावें लागते. थोडेसें परदेशींहि जातें.

या खात्यांतून मग आम्हांस वीव्हिंग भागांत नेलें. प्रथम वाइंडिंग खातें. रीलिंगप्रमाणेंच येथें फक्त स्त्रियाच भरलेल्या होत्या. रात्रपाळींत पुरुष काम करतात असें कळलें. वाईंडिंगमध्यें निरनिराळे प्रकार दिसले. ग्रे, कलर, चीज, वगैरे गंमत दिसत होती. या खात्यांत, रीलिंगप्रमाणें पॉवर फार कमी लागते त्यामुळें खडखडाट, लांबच लांब पट्टे, वगैरे दिसले नाहींत, पण त्या यंत्रांचे घणघणाट आवाजाची उणीव स्त्रियांच्या मोठ्यानें गडबड-बड...

। क्वचित् हमरीतुमरीवरील बोलणी यांनीं भरून काढली होती. तंबाखू वगैरेंचा बार भरण्यांत कांहीं जणी चूर होत्या.

यापुढें वार्पिंग "व्ही" चे आकाराचे दोन स्टँड; त्यावर पट्टया, पट्टयावर वार्पिंग बॉबीन ( डमरूचे आकाराचे ) अशा एकेका स्टँडवर दोन दोनशें बॉबीन. त्या प्रत्येकाचें सूत एका फणीवर आणलेलें, व तें सर्व बॉबीन लष्करी शिस्तीनें फिरत, व सूत फणीवरून एका मोठ्या ड्रमवरून पुढें येऊन एका लोखंडी बीमवर गुंडाळलें जात होतें. फोटो घेण्याजोगें दृश्य; व गंमत ही कीं त्या ४००–५०० धाग्यांपैकी एक धागा तुटला तरी मशीन आपोआप बंद पडे. त्या यंत्रावरील कामगार तो तुटलेला धागा जोडी व यंत्र पुन्हां सुरू !

त्यानंतर मात्र, पुढच्या खात्यांतून लवकर पळ काढावासा वाटलें. कारण जिकडे तिकडे वाफच वाफ व गरम वातावरण. या खात्यांत सुतावर कांजी चढविण्याचें काम चाललें होतें. वाफेनें एका टाकींत कांजी उकळत होती. साइझिंग यंत्रामागें पुष्कळ रोल एकामागें एक लावलेले होते, त्यावरील सूत या कांजीचें टाकींतून पुढें आणून दोन तांब्याचे पुरुष–पुरुष उंचीचे पोकळ ड्रमवर वाफेने सुकवून दुसऱ्या एका बीमवर गुंडाळलें जात होतें. केवढा प्रचंड कारभार. कांजी निरनिराळ्या प्रमाणांत सुतावर चढवितात असें श्री. वाटाडे म्हणाले. धुवट व रंगीत कापडासाठीं सूत विणतांना टिकावी एवढ्यापुरतीच कांजी सुतावर चढवितात. कोऱ्या मांजर-पाटावर ( जेव्हां कांजी स्वस्त पडत असे व वजनावर कोरा कपडा विकीत असत त्यावेळीं १०० टक्कयांपर्यंतहि कांजी चढवीत. दुसऱ्या महायुद्धांत "कांजी व कांजी चढविणें" यावरहि नियंत्रण होतें. आतां कांजी फार महाग पडते व जरूरीपेक्षा जास्त वापरीत नाहींत. ) कांहीं मूलभूत रसायनें, चरबी व कांजीचें साहित्य ( पीठ ) वापरून कांजी तयार करतां येईल. पण पुष्कळ व्यापारी हेच पदार्थ निरनिराळ्या "खास" नांवावर, पेटन्ट औषधाप्रमाणें, ओळखीचे आधारावर खपवितात व लक्षाधीशहि होतात. सरकारी "स्टॅन्डर्ड" कमिटी, वेळ होईल त्यावेळीं, यास आळा घालील असें वाटतें.

या खात्यांतून पुढें केव्हां सरकूं असें होत होतें. काम करणाऱ्यांना या खात्यांत काम करणें ही एक सजाच आहे असें आम्हांला वाटलें. उघडे कामगार, घामाच्या सारख्या धारा. आमच्या दृष्टींतील सहानुभूति त्या कामगारांना दिसली कीं काय कोण जाणे; त्यांपैकी एकजणानें पोटाकडे बोट दाखविलें. पोटासाठी एवढा त्रास सोसतात. परमेश्वर लवकरच या खात्यांत सुधारणा करून कामगारांचे हाल कमी करो, अशी आम्हीं मनांतले मनांत परमेश्वराची प्रार्थनाहि केली.

पुढें "ड्रॉइंग–इन" खातें. येथें कौशल्य व अनुभव यांची सांगड दिसली. मराठींत ते लोक, "वही", "वहांखातें" असें म्हणत होतें. एका उंच स्टँडवर मधें बीम साइझिंग खात्यांतून आणून अडकवितात. त्यामागें व पुढें एकेक कामगार फण्यांतून एकजण सूत आकड्यानें पुढें देत होता व दुसराजण तें ओढून घेत होता. यास, "ड्राईंग–इन" म्हणतात. मराठींत भरण भरणें म्हणू. येथें कापडाचें डिझाइन व किनारीचें डिझाइन यांचा पाया भरला जातो. सूत बरोबर ठरलेल्या फण्यांतून ओढून घेण्यांत चूक झाल्यास पुढें साच्यावर ( लूमवर ) कापड विणतांना दोष उत्पन्न होतात. म्हणून या खात्याचें काम फार महत्त्वाचें समजलें जातें. डिझाइन कसें भरावयाचें हें ग्राफपेपरवर दाखविलेलें दिसलें. असें फण्या भरून बीम–रोल तयार झाले म्हणजे ते मग लूमशेड-मध्यें नेण्यांत येतात व साच्यावर चढवितात. साच्यावर निरनिराळें कापड विणण्यासाठीं निरनिराळीं यंत्रें बसवून प्लेन, ड्रिल, ट्विल, डॉबी, ड्रॉपबॉक्स, डॉबी ड्रॉपबॉक्स, वगैरे प्रकार असतात असें कळलें. त्यावर कापड विणतांना निरनिराळी वीण व डिझाइन्स तयार होतांना पाहून गंमत वाटली पण शटलचा खडखटाट, पट्टयांची सरकण्याची क्रिया, वगैरेंमुळें जिकडे तिकडे गडबड. त्यांत भरीला धूळ ( कांजी कापड विणतांना उडते व पडते ) यामुळें चित्त थोडें व्यग्र होतें. व एवढें कशासाठी ? शरिरावर इष्ट–अनिष्ट परिणाम, चित्तावर, मनावर दाब त्या सर्वांचा आयुष्यावर, संततीवर परिणाम काय होत असतील याबद्दल विचार सटकून गेला. असें कांहींतरी आमचे विचार चालले असावेत असें ताडून श्री. वाटाडे म्हणाले, अहो दोन पिढ्या काम करताहेत. २५–३० वर्षें काम केलेलें कितीतरी अनुभवी हुषार साचेवाले आहेत. कदाचित् बाहेरच्या खुल्या वातावरणांत त्यांना जास्त आयुष्य लाभेल. पण संवयीनें सर्व अंगवळणी पडतें. कापूस साफ करणारे भय्ये तोंडावर फडकें बांधून धूळ व कचरा नाकावाटें, तोंडावाटें पोटांत जाणार नाहीं अशी व्यवस्था करतात व चणे, गूळकांदा खातात. त्यानें सर्व अनिष्ट परिणाम नाहींसे होतात अशी त्यांची समजूत. लूमशेडमधून त्यांनीं जकॉर्डशेडमध्यें नेलें, येथें थोडेसेच साचे होते व एकेकजण एक साचा चालवीत होता, साच्याचेवरती जाड कागदांत भोकें पाडलेले पट्टे सरकत होते व खालीं कापडावर पशु, पक्षी, फुलें, वेल, वगैरे अनंत डिझाइन्स विणलीं जात होतीं. मुख्य लूमशेडमधील साच्यांच्या विणण्याच्या गतीपेक्षा, येथील कापड फार मंदगतीनें विणलें जात होतें. पण येथील दृश्य पाहून समाधान व आश्चर्यहि वाटलें. तें पाहून, श्री. वाटाडे म्हणाले, "पुढचे एका खोलींत गॅसचे ज्योतमधून कापड सरकावितात तें दाखवून खूपच आश्चर्यचकीत करतो तुम्हांला" आम्हीं म्हटलें "चला तर." पण त्यापूर्वी त्यांनीं धोबीघाट व रंगखातें दाखविलें.

— नवीन माल आणि योग्य किंमत. लुगडीं, पातळें व मिलचें कापड —
— यांकरितां —
शाहाडे-आठवले प्रायव्हेट लि., दादर
शाहाडे बिल्डिंग; एन्. सी. केळकर रोड, दादर, मुंबई २८
:: टेलिफोन ६०५५४ ::

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः–भोर, जि. पुणें.

शाखाः–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. वृ. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी
श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.



# बँक ऑफ पूना लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

—मुख्य कचेरी : ४९५ रविवार, पुणें २.—

—शाखा—

( १ ) ३६१ सदाशिव, पुणें.
( २ ) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
( ३ ) सोलापूर. ( ४ ) सांगली.

—ःव्याजाचे दरः—

चालू ठेव–अर्धा टक्का. सेव्हिंग्ज–दोन टक्के.

२ महिन्यांच्यापुढें मुदतीच्या ठेवीवर तीन टक्के व्याज.

★ सांगली शाखा व मुख्य ऑफिसमध्यें मूल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याकरितां अल्प भाड्यानें लॉकर मिळतील.



# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) ... | रु. ५०,००,००० |

—यच्चयावत् बँकिंग–व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन
श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा,
बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.



स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोंणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३१–३–५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,२८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,११,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–१२–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १–०–० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०–८–० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

येथेंहि साइझिंग खात्याप्रमाणें जिकडे तिकडे वाफ,उकळते पाण्याची व रंगाचे पाण्याची टाकी. पंचा गुंडाळलेले कामगार, रंगीत सुताचे व कापडाचे ढीग, धुवट, अर्धवट धुवट सूत व कापड जिकडे तिकडे पडलेलें. गटारांतून रंगी किंवा पांढरें पाणी वाहातांना पाहून थोडा मजा वाटली. पुढें कापडावर निरनिराळे संस्कार करून कापडाला निरनिराळे " फील " आणलेलें पाहून शास्त्राचे प्रगती-बद्दल कौतुक वाटलें. येथेंहि फार वेळ उभे रहावेना. तेव्हां मधाचें गॅसचें मशीन दाखवा असें म्हटलें. धोबीघाटाला जोडून एका खोलींत एका मशीनवर एका लांब नळींतून पुष्कळ गॅसच्या ज्योती पेटलेल्या होत्या व त्यांतून धुवट कापड वेगानें सरकत होतें. पण पेटत-जळत नव्हतें. फार बारिक तंतू मात्र गळून जातात व कापडास एक तऱ्हेची सफाई व मऊपणा येतो व हाताला कापड एका विशिष्ट " फील " चें लागतें, हें मात्र खरें. शोधक व कल्पक काय काय करतो, याचे आश्चर्य वाटलें. त्यांचे शेजारी एक स्टँटरिंग मशीन होतें. ३०-४० फूट लांब असे फिरते रुंद जाड पट्टे, त्यावर ' क्लिप्स ' म्हणजे पकडी- चिमटी. सुरवातीला दोन पट्ट्यांतील अंतर २५ इंच तर त्याचे शेवटीं २६ इंच. या चिमटींत कापड देत व तें हळूहळू ताणत जाऊन शेवटचे चिमटींत २६ इंच होई. तांत्रिक फायदे-तोटे पाहण्यास वेळ नव्हता. पण शोध म्हणून गंमत वाटली. एकदां असें ताणलेलें कापड पुढें धुतांना आटत असावें.

मग आम्हीं लूमशेडच्या बाजूचे एका भव्य व जिकडे तिकडे कापडाचे ढीग, घड्यांच्या थाप्या असलेल्या अशा फार मोठ्या हॉलमध्यें आलों. एका टोकाला लूमशेडमधून कपडा येत होता, तो एका घड्याळावर वजन केला जात होता. सॉर्टर्स (निवडणारे) त्याचे निरनिराळे ढीग करीत होते. कांहीं कोरें कापड धोबी घाटाकडे किंवा रंगखात्याकडे नेत होते; कांहीं घडी करण्याचे यंत्राकडे. मध्यंतरीं मोठाले मेजावर कापड तपासणीस विणतांना झालेले दोष तपासत होते व चिंध्या घालून खुणा करून ठेवीत होते, कांहीं कापड कॅलेंडर व फिनिशिंगचे यंत्राकडे नेलें जात होतें. कॅलेंडर व फिनिशिंग यंत्रें हीं एका दृष्टीनें इस्त्रीचीं यंत्रें. पुष्कळ जड रोलर, एकावर एक किंवा एकापुढें एक फिरत असतात व त्यामधून कापड सरकत असतें व कापड शिरतें त्या स्थितीपेक्षा त्यांतून निघाल्यावर अगदीं निराळे स्थितींत आपणांस दिसतें. कांहींवर एका बाजूस चकाकी आलेली असते. कांहीं कापड टणक झालेलें दिसलें. हें सर्व कापड मग घड्या घालणारे यंत्रावर जात होतें व हीं यंत्रें कापडाच्या घड्या घालीत होतें. त्यावेळींहि कापडाची तपासणी चालू आहे असें दिसलें. विशेषतः रुंदी मोजत आहेत असें आमच्या लक्षांत आलें. श्री वाटाडे म्हणाले, २६ इंची कापड विकलें असेल तर २६, २५॥। किंवा २६। इंच तरी असलेंच पाहिजे. गड्ड्यांतील जास्त भाग २६ इंची पाहिजे. कस्टमचे कायद्याप्रमाणें आम्हांस " लांबी-रुंदी " च्या मर्यादा पाळाव्या लागतात. कांहींजण डोळयांना भिंगं लावून धाग मोजतांना दिसले. त्याबद्दल श्री. वाटाडे म्हणाले कीं कापड पर-देशीं विकतांना, एका इंचांत किंवा पाव इंचांत आडवे-उभे धागे किती असले पाहिजेत हें करारांत बहुधा लिहिलेलें असतें व तेवढें आम्हीं संभाळलें पाहिजे. आतां देशी व्यापारीहि कांहीं कांहीं करारांत आडवे-उभे धागे किती असलेच पाहिजे हें ठरवूं लागले आहेत.

या खात्यांतील कामगार जरा स्वच्छ, चांगला पोषाख केलेले व सुशिक्षित, हुषार, चुणचुणीत दिसले. कापडांच्या जातीप्रमाणें ढीग रचलेले. त्यावर कॉंट्रॅक्टप्रमाणें छाप व पॅकिंग. कांहीं कापड साधें घडींत, कांहीं रोलफोर्ड, कांहीं सिलफन कागदांत तर कांहीं कागदाच्या पेटींत, भरणें बांधणें चालू होतें. कांहीं कापड तांबड्या शाईत तर कांहीं निळ्या शाईत. काळें कापड पांढऱ्या शाईत स्टँपिंग यंत्रावर छापत होतें. पुष्कळसे कारकून कापड, छपाई, लेबलें व इतर गोष्टी कसून तपासीत होते. नंतर आम्हीं बेलिंग खात्यांत शिरलों. येथें गांठी बांधण्याचें व खोके भरण्याचें काम चालू होतें. तेथेंहि दोन कारकून कांहीं ठराविक ताके मोजून, वजन करून, इन्स्ट्रक्शन बुकाप्रमाणें छपाई, डिझाइन्स, रंग, लेबलें पुन्हां तपासून, पॅकिंग स्लिप तयार करून बेलिंग प्रेसवर बेलिंग क्लार्ककडे देत होते व तो पुन्हां शक्य त्या गोष्टी तपासून गांठी बांधत होता किंवा केसेस-पेट्या भरीत होता. निरनिराळ्या बाजारपेठेसाठी निरनि-राळें ' पॅकिंग स्टँपिंग '. परदेशांत जाणारे कापडासाठी निराळेंच पॅकिंग, शिवाय सरकारी नियंत्रणेंहि याबाबत संभाळावीं लागतात असें कळलें. मग गोडाऊन कीपर आलेला दिसला. त्यानें गांठी व खोकें ( केसेस ), ह्या वरील छापलेला मजकूर तपासून तो माल आपल्या गोडाऊनमध्यें नेण्याची तजवीज केली.

मुंबईतील सर्व गिरण्या आतां विजेवर चालतात त्यामुळें मोठाली ऑईल किंवा स्टीम एंजिनें फक्त बाहेरगांवीं दिसतात. त्याचप्रमाणें मुंबईत अनेक इंजिनिअरिंग वर्कशॉप्स् असल्यामुळें, व मुंबईत मशिनरी आणणारे व्यापाऱ्यांकडे यंत्रांचे सुटे भाग नेहमीं मिळत असल्यामुळें, मुंबईतील गिरण्यांची " वर्कशॉपस् " लहान असतात व यंत्रांचे सुटे भागहि साठवून ठेवावे लागत नाहींत. बाहेर गांवचे गिरण्यांना मोठाली वर्क शॉपस ठेवून शिवाय कास्टिंगसाठी फाऊंडरी ठेवावी लागते. वेळ थोडा असल्यामुळें, साइझिंग-ब्लीचींगसाठी लागणारी स्टीम (वाफ) कोठें तयार होते, कोठें कशी नेली जाते वगैरे व विजेच्या मोठाल्या मोटारी पहाण्याचे आम्ही रद्द केले. त्याचप्रमाणें सरकारी कायद्या-नुसार कांहीं मर्यादेपर्यंत खात्याखात्यांतील हवा थंड वा गरम ठेवावी लागते त्यासंबंधीची यंत्रें पहाणें आम्हांस वगळावें लागलें.


चितळे बन्धू—

दूध, दुधपदार्थ व मिठाई

यासाठीं प्रसिद्ध.

डेक्कन जिमखाना पुणे ४

SANDOW BRAND (Regd.)

PURE GHEE

Supplied Throughout India
FOR THE LAST 80 YEARS

*BUY SANDOW BRAND PURE GHEE*
FOR HEALTH AND VITALITY

*Poona Agent* : M. G. KULKARNI,
786 Sadashiv, Phadtare Chowk,
POONA 2.

किंतीतरी कापूस दररोज वापरला जातो, त्याचें सूत व कापड कितीतरी पौंड व वार तयार होतें. तें कसें, कां, कोणासाठी तयार करतात व ते कसें, कोठें, केव्हां खपवितात वगैरेबद्दल आमची जिज्ञासा. श्री. वाटाडे म्हणाले, मॅनेजर आपणास हवी ती माहिती देऊन तृप्त करतील. नंतर गोडाऊन पाहून, आम्हीं श्री. वाटाडे यांचे ऑफिसमध्यें आलों. लेबर ऑफिसर, वेल्फेअर ऑफिसर, लेबर वेल्फेअर क्रेच, कँटिन, वगैरे गोष्टींस दुसऱ्या महायुद्धानंतर जोरानें चालना मिळाली. ह्यापूर्वी एकेक गिरणी सोईसोईनें या गोष्टी करीत असे. परंतु १९४८ नंतर या गोष्टी कायद्यानेंच कराव्या लागतात. आतां त्यास प्राव्हिडंड फंड, पेन्शन, ग्रॅच्युइटी, वैद्यकीय मदत, हक्काची रजा, वगैरेंची जोड मिळाली. औद्योगिक कलह कायदे झाले. बोनससाठी आपसांत करार झाले व झगडे, संप टळले. या सर्व कामासाठी आतां वेल्फेअर ऑफिसर्स नेमले गेले व त्यांचें एक स्वतंत्र खातेंच गिरण्यांतून स्थापावें लागलें. ही एक संतोष वाटावी अशी घटना या ८-१० वर्षांत घडून आली. वर्क्स-कमिट्या स्थापन झाल्या व त्यावर कामगारांचे प्रतिनिधी हक्कानें बसून, आपल्या अडी अडचणींची दाद लावून घेऊं शकतात व हळुहळु मालकां-बद्दलची असूया, द्वेष पालटूं लागला आहे, असें आम्हीं ऐकलें. तें खरें आहे, असें कळलें. एवढेंच नव्हे, तर आणखी कांहीं दिवसांनीं कामगारांचे प्रतिनिधी, डायरेक्टर बोर्डावर किंवा डायरेक्टरांचे कमिट्यांवर नेमलें जाण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. मालकांचा व मजुरांचा दृष्टिकोन आतां पुष्कळच बदलला आहे, असें कळलें; व मजूर आपल्या धंद्यांत वांटेकरी आहेत हें मालकांना पटूं लागलें आहे. आपण भरपूर, पुरेपूर काम करून मजुरीचा संपूर्ण मोबदला दिला पाहिजे, कामाचा दर्जा व उत्पादन वाढविलें पाहिजे, व कारखान्याचें हित तें आपलें हित, हें मजुरांना पटूं लागलें आहे. यापुढें मालक-मजूर-संबंध सुधारून उद्योगधंद्यांना " आंतून " त्रास होणार नाहीं अशी आशा उत्पन्न झाल्याचें दिसून येते. आम्ही श्री. वाटाडे यांचा निरोप घेऊन मॅनेजरचे ऑफिसमध्यें आलों. ते आमची वाट पहात होते.

आमची कल्पना होती कीं, एवढ्या प्रचंड कारखान्याचे मॅनेजर म्हणजे मोठ्या सरकारी ऑफिसराप्रमाणें, किंवा एखाद्या अहंमन्य सरदार-नबाबाप्रमाणें फार थोडे बोलणारे, आंतल्या गांठीचे, बडेजावासाठी, मानासाठी हपापलेले असे बडे गृहस्थ असतील. आम्हांला पहातांच ते उभे राहिले. नमस्कार--चमत्कार कुशल विचारणें झालें व आम्हांला आदरपूर्वक बसण्यास त्यांनीं सांगितल्यामुळें आम्हांस मोकळेपणा वाटला.

त्यांचें ऑफिस फार चांगलें रीतीनें सजविलें होतें. एका बाजूस एका मोठ्या टेबलावर कापडाचे, सुताचे नमुने होते; एक जपानी



कॅटलॉग होता. दुसऱ्या लहान टेबलावर गिरणीच्या उत्पादनाबद्दलचीं सुमारें पंधरावीस दररोज पहाण्याचीं बुकें होतीं. शिवाय एका ट्रेमध्यें सद्यांचे कागद-रिपोर्ट होते. समोर एका कपाटांत गिरणीसंबंधीं पुस्तकें, तर दुसऱ्या कपाटांत रिपोर्ट होते. टेबलावर दोन टेलिफोन, खात्याखात्यांना फोन करण्याची व्यवस्था, वगैरे ' अपटुडेट " मांडणी होती.

आमची भीड चेपली होती व जरा मोकळेपणा वाटूं लागला होता; तरीपण आम्हीं भीतभीत म्हणालों, "आपला वेळ कामाचा. पांच मिनिटांत आम्हांस कापूस खरेदी, कापड विक्री व गिरणी चालविण्याची कला याबद्दल चार शब्द सांगावे. आम्हीं गिरणीचे अंतरंग पाहून आलों आहोंत.

ते जरा हंसून म्हणाले, " तुम्ही घड्याळाचे काटे, तबकडी पाहिलीत. पण त्याचे आंतील चक्रें-स्प्रिंग नाहीं पाहिलीत. तुम्ही पाहिलें तें खरें म्हणावयाचें म्हणजे बाहिरंग. गिरणीचें खरें अंतरंग म्हणजे आमचे मॅनेजिंग एजन्ट, कापूस खरेदी करणारे व कापड-सूत विकणारे, पैसा पुरविणारे सावकार, बँकर व सरकारी कायदे-नियंत्रण अंमलांत आणणारे अधिकारी हे होत. यांचेकडून आंतील यंत्रें फिरतात, बाहेरून तीं दिसत नाहींत. येथें आम्ही हुकुमाचे ताबेदार. हुकूम येईल त्याप्रमाणें ते अंमलांत आणावयाचे. अर्थात आमचा मान राखला जातो. अनुभवाचा, ज्ञानाचा फायदा वरील सर्वजण उठवितात, पण या सर्व यंत्रांची गुरुकिल्ली किंवा स्प्रिंग, आमचे धनी मॅनेजिंग एजन्ट होत.

लौकिक दृष्ट्या, बोर्ड ( डायरेक्टरांचे ) हे मालक. पण मॅनेजिंग एजन्ट त्यांपैकीं जास्त जागा अडवितात. नव्या कंपनी-कायद्यानें त्यांना दोनच जागा दिल्या. पण शेअर्स हातीं असल्यामुळें त्यांना बोर्ड आपले हाताखाली ठेवतां येईल, इतके डायरेक्टर्स बोर्डावर आणतां येतात. म्हणून मॅनेजिंग एजन्टस् हेच वास्तविक खरे मालक व्यवहारांत झालेले असतात. म्हणून कापूस खरेदी करण्याची पेढी, कापड सूत विकणारे कमिशन एजन्ट त्यांचेचपैकी किंवा त्यांचे स्नेह्यांपैकी, किंवा त्यांचे विश्वासास पात्र असे नेमले जातात. क्वचित् अशा खरेदी-विक्री करणाऱ्यांचे पेढींत मॅनेजिंग एजन्टसचा भागीदार म्हणून भाग असतो. त्यांचें खरेदीचें कमिशन व विक्रीचें कमिशन ठरलेलें असतें, त्याप्रमाणें त्यांची जोखीमहि. विमा उतरतात त्यांत, यंत्रें, यंत्रभाग स्टोअर्स वगैरे गिरण्याबरोबर व्यवहार करणाऱ्या कंपन्यांचा किंवा पेढ्यांचे मधेहि मॅनेजिंग एजन्टसचे हितसंबंध गुंतलेले असतात; व म्हणून किल्ली फिरविणेचें मुख्य काम मॅनेजिंग एजन्टसचे हातांत. आतां पुष्कळ युरोपियन मिलएजन्टस, त्याच-प्रमाणें खटाव, वाडिया, ठाकरसी, टाटा, प्रतापशेट, असे त्याच तोलाचे, व्यवहारदक्ष, कंपनीचे हिताचें संवर्धन करणारे मॅनेजिंग एजन्टसमुळें, मॅनेजिंग एजन्टसची पत व कीर्ति टिकून आहे, व वाढत आहे. स्वार्थी, अनुभव नाहीं असे मॅनेजिंग एजन्टस फार दिवस टिकून रहात नाहींत.

कापूस खरेदी मुंबईत होते, त्याचप्रमाणें हंगामांत निर-निराळ्या गांवांवर होते. साधारण योग्य वेळीं भरपूर कापूस खरेदी केला जातो. मोत्याची परीक्षा करण्यास जशी दृष्टि लागते, त्याचप्रकारची एक दृष्टि ( ही अभ्यासानें व अनुभवानें येते ) कापूस खरेदीला लागते. कापडविक्रीचेंहि शास्त्र आहे. अनुभव व अभ्यास याची त्या खात्यांतहि जरूरी असतेच. आमचे सरकार देशोदेशीं मिशन्स पाठवितें, त्या त्या देशांची आवडनिवड याचा अभ्यास करून नमुने आणवितें, त्यांचा व त्या माहितीचा गिरणीचें कापड परदेशी विकण्यास खूप फायदा होतो. शिवाय मध्यस्थ घाऊक, मोठी खरेदी करणारे व्यापारी वगैरेंचा, मालाची योग्य निपज करण्यासाठी फार उपयोग होतो. आपलेकडील देशांतल्या देशांत चालणाऱ्या व्यापाराची आतां नीट घडी बसल्यासारखी आहे. फरक काय होत जातो तो लोकांच्या आवडी-निवडीचा; पण तो कांहीं एकदम एका क्षणांत होत नाहीं. तो हळूहळू होत असतो व घाऊक व्यापारी लक्ष ठेवून, आम्हांस सूचना देत असतातच. "स्पेक्युलेशनला" यांत फार थोडा वाव असतो. स्टोअर्स, यंत्रें, वगैरेंशीं आमच्या अधिकारीवर्गाचा थोडा-फार संबंध येतो. पण आम्ही सांगितलेला माल, त्या प्रतीचा कोणाकडून आणावयाचा तें एजन्टस्चे मर्जीवर. पूर्वी मजुरांचा पुरवठा " जॉबर " करी, व त्यासाठी पैसे उकळणें ( मजुरांकडून ) सर्रास चाले. आतां लेबर वेल्फेअर ऑफिसर, सर्टिफिकिट पाहून, " सेंट्रल लेबर सप्लाय " करणाऱ्या सरकारी संस्थेकडून आलेल्यांचे मधून निवड करतो. मजूर ( आम्ही त्यांना कामगार, कारागीर म्हणतों ) वर्गासाठी पुष्कळ कायदे झाले आहेत. त्याप्रमाणें आम्हांला सर्व कायद्याचीं बंधनें कसोशीनें पाळावी लागतात. त्या कामांत आम्हांस मिल ओनर्सचे लेबर ऑफिसर श्री. आर. जी. गोखले, जे. पी., यांचें मार्गदर्शन असतें, व शिवाय कामगार संघ आमचे कामावर लक्ष ठेवतो व अडीअडणी, दोष, काय करावे, वगैरे बाबत आमच्याशीं बोलणीं करतोच. फॅक्टरी ॲक्ट, मॅटर्निटी बेनिफिट ॲक्ट, वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ॲक्ट, संपाबाबतचे वगैरे कायदे, त्याचप्रमाणें नवे विमा कायदे, प्रॉव्हिडंट फंड, वगैरे कायदे, यांचें योग्य पालन करण्यांत हयगय होऊं नये म्हणून आम्हांस स्वतंत्र खातें उभें करून योग्य दर्जाचे ऑफिसर नेमावे लागतात. यंत्रांवर, उत्पादनावर, कामाचे मालाचे दर्जावर देखरेख करण्यासाठी आतां पूर्वीप्रमाणें काका, मामा, भाऊ, भाचा, वगैरे न नेमतां, योग्य तांत्रिक शिक्षण घेतलेले व असिस्टंटपासून वाढत गेलेले अनुभवी ऑफिसर नेमण्याची प्रथा पडली आहे. येवढेंच नाहीं, विशाल दृष्टि यावी म्हणून चांगलें एजन्ट त्यांना स्वखर्चानें इंग्लंड, जपान वगैरे देशांत पाठवून, यांत्रिक शोध, गिरणी चालविण्याचे तंत्रांची प्रगति, मालक-मजूरसंबंधी होत असलेल्या सुधारणा, वगैरेंचा अभ्यास करण्याची संधि देतात.

मजुरांना तांत्रिक शिक्षण देऊन त्यांना जास्त कार्यक्षम करण्यासाठी सोशल सर्व्हिस लीग एक शाळा मुंबईत चालविते. उपक्रम स्तुत्य तर आहेच. पण कामगारवर्गाहि त्या शाळेचा उपयोग करून घेण्याकडे झपाट्यानें वळत आहे. त्याचप्रमाणें गिरणींत काम करणाऱ्या कारकुनवर्गासाठी एकादी शाळा काढून तिच्या अभ्यासक्रमांत पास होणाऱ्यास प्रथम नोकरी देण्याची व्यवस्था झाल्यास तो वर्ग जास्त कार्यक्षम होईल. आमचे ओळखीचे एका गिरणींतील अधिकाऱ्यानें, एजन्टसचे सल्ल्यानें दोन जास्त कारकून ठेवून, पुढें पाळीपाळीनें सर्व कारकुनांना निरनिराळ्या खात्यांतील कारकुनी काम शिकविलें व त्यामुळें त्या गिरणींत रेकॉर्ड-रिटर्न व तत्सम कामें पार पडण्यांत कधींहि दिरंगाई झाली नाहीं व ठराविक तारखेचे अगोदर एकाद-दुसरा दिवस ते कागदपत्र, आकडे, स्टेटमेंट तयार असत. पुष्कळ गिरणीचे व्यवस्थापक इकडे दुर्लक्ष करतात.

शेवटीं आमची शेंडी सावकाराचे हातीं कशी तें पहा. गिरणीसाठी लागणारा कापूस हंगामांतच खरेदी केल्यास स्वच्छ, स्वस्त व चांगल्या प्रतीचा मिळतो. त्याचप्रमाणें कापड विक्रीहि कांहीं कांहीं आठवडे असते व निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळे

" सीझन " असतात. उदाहरणार्थ, दुर्गापूजेच्या अगोदर आमचा माल कलकत्त्यांत गोडाऊनमध्यें भरपूर साठवला पाहिजे. त्यावेळीं धोतरें व इतर कापड खपून जातें. तसा माल तीनचार महिने बांधून तयार ठेवावा लागतो, त्यासाठी पैसा गुंततो. मंदीचे वेळीं तर पैशाचें भरपूर पाठबळ लागतें. पूर्वी तीन-चार टक्क्याचे व्याजावर लाखों रुपये जनता " डिपॉझिट्स् " म्हणून गिरणी एजन्टाकडे ठेवी. परंतु मध्यंतरींचे दोन मंदीचे तडाक्यांत गिरण्या व कारखाने बुडाल्यापासून, ठेवी थोड्याच मिळतात. आतां बँकांकडे कर्ज काढावें लागतें व त्यांचा व्याजाचा दर सिक्युरिटी, मॉर्टगेज, वगैरे भानगडी पुष्कळ. तथापि बँकांशिवाय तरणोपाय नसतो. ज्यांना या, ना त्या रस्त्यानें पैशाचें म्हणजे खेळत्या भांडवलाचें पाठबळ नसतें त्यांचे हाल विचारूं नका. महिन्याचे १० तारखेला मजूर, कारकून, ऑफिसर्स, यांचे पगार करावे लागतात. कापूस, स्टोअर्स, वगैरेंचे पैसे द्यावे लागतात. त्या सर्वांची, कापड घेणाराकडून पैसे येतील त्यांतून तोंडमिळवणी करावयाची. मंदींत कापडवाले भराभर माल घेऊन जात नाहींत व त्यामुळें पैशाची चणचण वाटते.

आम्हीं त्यांच्या या सुंदर मांडणीबद्दल आभार मानले. वरून पाहिलें त्यापेक्षा ही " स्प्रिंग " जास्त माहिती देणारी वाटली. या सर्व गोष्टींवर अनेक विचार सुचले, त्याचें टिपण पुढें केव्हां तरी करावें असें वाटलें, व आपला [illegible] लागला, कांहीं तरी नवी माहिती पदरांत पडली, यामुळें समाधान वाटलें. निघण्यापूर्वीं आम्हीं पुन्हां एकदां त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

आतांच प्रस्तुत लेखकाला एका गिरणीचे हिशोब ( ताळेबंद व नफातोटा पत्रक ) मिळाले. त्यांतील कांहीं आंकडे आपणांस सांगतों. त्यावरून खेळतें भांडवल भरपूर हातीं असण्याचें महत्त्व समजून येईल.

गिरणीची मालमत्ता १८० लाखांची. त्यासमोर भांडवल व डिबेंचर्स, ९० लाख व रिझर्व फंड एका कोटीचें. देणी, स्टोअर्स, पगार, वगैरे ४० लाख. येणीं व अगोदर भरलेले १२ लाख. म्हणजे सुमारें ३० लाख देण्याचे पोटीं राहिलें. स्टॉक्स्, कापड, सूत, कापूस स्टोअर्स वगैरे ६५ लाख. म्हणजे सुमारें ३५ लाखांची तरतूद. बँकेकडून घेतले ३० लाख. या ३० लाखांवर खेळते व्यवहार. अर्थात सुमारें दोन कोटींची मालमत्ता असलेल्या कारखान्यास जरूर तेव्हां बँका ५० लाखांपर्यंत पैसा पुरवितील. या गिरणीचा कापूस वापर एका कोटीवर व कापड विक्री सुमारें तीन कोटींवर. मजुरी व स्टोअर्स, तेल, वीज व इतर खर्च दीड कोटीवर म्हणजे महिना १४ लाख, पैकी मजुरांना महिना सरासरी आठ लाख बोनस धरून द्यावें लागलें असें दिसतें. एवढ्या मोठ्या व्यवहारास पत श्रेष्ठ असेल, तरच भागतें.


**चालू दीपावली व नवें वर्ष**

सर्व भारतीयांना सुखाचें आणि भरभराटीचें जावो !

# वामन गणेश हरचेकर

प्रायव्हेट लिमिटेड.

**चांदी, सोनें, मोती आणि जवाहिरांचे व्यापारी.**

एन. सी. केळकर रोड, दादर, मुंबई नं. २८

टे. नं. ६०४२८

मोटार अपघातापासून सर्वोत्कृष्ट संरक्षण

म्हणजेच

# दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कंपनी लि. बेळगांव

दीपावलीनिमित्त आमचे विमेदार, प्रतिनिधी व हितचिंतक यांस शुभेच्छा !!!

# * दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २ ☆ मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ☆ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०५०८ )

| अध्यक्ष | | उपाध्यक्ष |
|---|---|---|
| श्री. ग. रा. साठे | अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,००० | श्री. वा. ग. बापट |
| | जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३३,१३५ | |
| | खेळतें भांडवल ... ... रु. ६२,००,००० | |

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १॥ टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, ( बी. ए., (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी. ) [illegible]

# सहकारी संस्थांची कुचंबणा आणि कर्जें थकविणारांची सोय

## मुंबई सहकारी कायद्यांत दुरुस्तीची आवश्यकता

(लेखक :—श्री. द. दि. चितळे,)

आपल्या पुढाऱ्यांनीं ठरविलेलें सहकारी संघ राज्याचें ध्येय शक्य तितकें लवकर गांठावयाचें असल्यास भारतांतील सर्व-सामान्य नागरिकांचें जीवन सहकारमय व्हावयास पाहिजे; त्यांचे सर्व आर्थिक कारभार सहकारी पद्धतीनें चालले पाहिजेत. आपल्या देशांत गेलीं ५०–५५ वर्षें याबाबतचे थोडेफार प्रयत्न होत आलेले आहेत. तथापि, भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या विषयाकडे मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं विशेष लक्ष पुरविलें आहे असें दिसून येतें. खेड्यापाड्यांतील जनतेस आपापले व्यवसाय चालविण्यासाठी लागणारें भांडवल हल्लीं त्यांना कोठून, किती प्रमाणांत, कोणत्या व्याजानें व कोणत्या अटीवर मिळत आहे याबाबत चौकशी करून सदर भांडवल त्यांना वेळच्या वेळीं, पुरेसें व शक्य तितक्या कमी व्याजानें कसें उपलब्ध करून देतां येईल यासंबंधीं शिफारशी करण्यासाठी एक समिति रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें नेमली होती. त्या समितीनें यासंबंधीं जरूर ती माहिती मिळवून याबाबतच्या आपल्या शिफारशी सादर केल्या असून त्या कार्यवाहींत आणण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. एवढेंच नव्हे, तर त्यांपैकीं कांहीं मुख्य मुख्य सूचना व शिफारशी आतां अमलांतहि आणल्या गेल्या असून इतर सूचनाहि हळूहळू स्वीकारण्यांत येतील व त्यांची अंमल-बजावणीहि यथाक्रम होईल असें स्पष्ट दिसत आहे.

या समितीनें ज्या वेगवेगळ्या सूचना केल्या आहेत त्यांचा मुख्य उद्देश असा दिसतो कीं खेड्यांतील शेतकरी व लहान–मोठे कारागीर यांचे आर्थिक व्यवहार शक्यतों सहकारी संस्थांमार्फत चालावेत; त्यांना दैनंदिन जीवनासाठी तसेंच त्यांच्या व्यवसायासाठी लागणाऱ्या वस्तूंचा व कच्च्या मालाचा पुरवठा त्यांना सहकारी संस्थांमार्फत व्हावा; त्यांनीं उत्पन्न केलेल्या मालाची विक्रीहि सहकारी पद्धतीनें व सहकारी संस्थांमार्फतच होत जावी. थोडक्यांत, त्यांचें आर्थिक जीवन सहकारमय व्हावें. खेड्यापाड्यां-तून तसेंच लहानमोठ्या शहरांतून त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक सहकारी संस्था स्थापन करण्यांत याव्यात. या संस्थांना खाजगी सावकार, व्यापारी व त्यांच्या संस्था, यांचेबरोबर स्पर्धा करतां यावी व त्या कार्यक्षम व्हाव्यात यासाठी मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं या वेगवेगळ्या सहकारी संस्थांत कांहीं काल तरी भागीदारी पत्करून त्यांना इतर प्रकारचें प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष साहाय्य द्यावें.

वरील उद्देश साध्य होण्यासाठी वेगवेगळ्या प्रांतांत अमलांत असलेल्या सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांमध्यें एकसूत्रता आणण्याचे दृष्टीनें तसेंच त्या कायद्यांत दिसून येणाऱ्या उणीवा भरून काढण्याचे दृष्टीनें योग्य त्या शिफारशी करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एक समिति नेमली असून हल्लीं तिचें काम सुरू झाल्याचें कळतें. मुंबई प्रांतांत अमलांत असलेल्या कायद्यांत जी एक मोठी उणीव असल्याचें अलिकडे दिसून येतें ती सदर समितीचे नजरेस यावी या हेतूनें आम्हीं ती पुढें देत आहों. व आमची अशी आशा आहे कीं, सदर समिति या बाबत योग्य तो विचार करून आपल्या अवश्य त्या शिफारशी जबाबदार सरकारांकडे रवाना करील.

शेतकऱ्यांस व लहानमोठ्या कारागिरांस लागणाऱ्या जरूर त्या भांडवलाचा पुरवठा वेळच्या वेळीं झाल्यास त्यांची उत्पादन-शक्ति वाढेल व मग त्यांचें जीवन व राहाणी स्वाभाविकच सुधारेल यांत दुमत असण्याचें कारणच नाहीं. मात्र त्यांना देण्यांत येणारीं कर्जें त्यांनीं उत्पादन कामींच खर्च केलीं पाहिजेत व त्यापासून त्यांना येणाऱ्या उत्पन्नांतून त्यांनीं तीं वेळच्या वेळीं कबूल केल्याप्रमाणें परत फेडलीं पाहिजेत. परंतु तशीं तीं त्यांनीं परत न फेडल्यास तीं त्यांच्याकडून शक्य तितक्या लवकर सक्तीनें वसूल करून मिळतील यासाठी जरूर ती तजवीज आपल्या प्रांतांतील सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांत केलेली आहे. अशी वसुली झटपट व्हावी म्हणून याबाबतचे दावे नेहमींच्या कोर्टांत न चालतां ते लवादपद्धतीनें चालावेत अशी मुद्दाम तजवीज सदर कायद्यांत केलेली आहे. एवढेंच नव्हे तर या लवाद निवाड्यांची बजावणीहि नेहमींच्या कोर्टाऐवजीं मुलकी अम्मलदारामार्फत करण्याचीही तरतूद सदर कायद्यांत केलेली आहे. या लवाद निवाड्यांत ठेवविलेल्या रकमा थकलेल्या शेतसाऱ्याप्रमाणें तडकाफडकीं वसूल केल्या जाव्यात अशीहि तजवीज या कायद्यांत आहे. एवढ्या सर्व तजविजी असल्यावर सहकारी संस्थांचें आपल्या सभासदांकडील थकलेलें कर्ज वसूल होण्यास कोणताहि विलंब होण्याचें कारण नाहीं, असें कोणासहि वाटण्याचा संभव आहे. परंतु वस्तुस्थिति मात्र याहून अगदींच वेगळी आहे. पूर्वी लवादापुढें चाललेल्या दाव्यांचे निकालावर फक्त सरकारकडे अपील करतां येत असे व हीं अपिलें सरकार-कडून अत्यंत थोड्या मुदतींत निकालीं काढलीं जात असत. परंतु यावर अशी तक्रार करण्यांत येऊं लागली कीं हीं अपिलें सरकार विशेष तपशीलवार चौकशी न करतां त्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरून आपल्या कचेरींतच निकालीं काढते व त्यामुळें योग्य तो न्याय मिळतोच असें नाहीं. ही तक्रार दूर करण्याचे दृष्टीनें सन १९३६ सालीं या कायद्यांत दुरुस्ती करण्यांत येऊन हीं अपिलें ऐकण्याचें काम एका स्वतंत्र न्यायदान मंडळाकडे सोंपविण्यांत आलें. कायद्यांत ही दुरुस्ती करतांना अशी अपेक्षा होती कीं हीं अपिलें ऐकण्याचें काम एका स्वतंत्र मंडळाकडे दिल्यामुळें या अपिलांचा निकाल पूर्वीपेक्षाहि अल्पावधींत होऊन सहकारी संस्थांना आपलीं थकलेलीं कर्जें ताबड-तोब वसूल होऊन यापुढें मिळतील. प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र आतां असें दिसून आलें कीं या न्यायदान मंडळामुळें सहकारी संस्थांची कुचंबणा होऊन कर्जें थकविणारांची विशेष सोय झाली आहे. ज्या सभासदांस आपलें कर्ज कित्येक वर्षांत वसूल केलें जाऊं नये असें वाटत असेल ते सभासद आपल्या सहकारी संस्थांच्या कार्यकर्त्यांना व चालकांना आतां निर्भीडपणें व उघड उघड

# दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पुणें

—स्थापना दि. १८ जानेवारी, १९०६—

कामाची वेळः—सकाळीं ९ ते ११-३० व सायंकाळीं ५-३० ते ७

शनिवारीं फक्त सकाळीं ९ ते ११-३०

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १,३०,२६० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | १,७३,१९१ |
| ठेवी | रु. | १५,३४,४३१ |
| खेळतें भांडवल | रु. | १८,९१,४८६ |

★ पन्नास वर्षे सतत भरीव व चोख कामगिरी असलेली.

★ मध्यमवर्गीयांची सोय पहाणारी व विश्वसनीय असलेली.

★ सतत ३५ वर्षे 'अ' वर्गात असलेली.

★ मध्य वसतींत प्रमुख ठिकाणीं स्वतःची इमारत असलेली.

★ सेफ कस्टडीची व्यवस्था असलेली.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

नियमांसंबंधीं बँकेंत चौकशी करावी.

य. श्री. शाळिग्राम, कार्यवाह.    द. ल. पारखी कार्याध्यक्ष.



सर्वांना हवी असलेली सहकारी बँक

३९ वर्षें व्यक्तिविकास व व्यापारवृद्धीसाठी सेवा व संरक्षण करणारी

व्यापारी-वर्गाची यशस्वी बँक

# दि डेक्कन मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँक लि॰

: मुख्य कचेरी : २१७ चर्नी रोड, मुंबई ४.

: शाखा : रानडे रोड, वेस्टर्न रेल्वेसमोर, दादर.

* मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजावर स्वीकारल्या जातात.

* मध्यमवर्गीयांची, व्यापारी, धंदेवाईक, वगैरेंची सहकार्यानें सेवा.

* बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.



महाराष्ट्रांतील सर्व सहकारी अर्बन बँकांत अग्रस्थानीं असलेली

# दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर

स्थापना : सन १९१० | हेड ऑफिसः अहमदनगर शहर

शाखाः—१ संगमनेर ( जि. नगर ) २ बेलापूर रोड–श्रीरामपूर ( जिल्हा नगर ) ३ वांबोरी ( जि. नगर. )

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| (२) वसूल भांडवल | रु. | ३,७५,९४० |
| (३) रिझर्व्ह फंड | रु. | २,९८,१८४ |
| (४) इतर फंड | रु. | ३,३०,३२५ |
| (५) चालू ठेवी | रु. | २६,८७,५७१ |
| (६) सेव्हिंग्ज ठेवी | रु. | ९,९३,७७१ |
| (७) मुदत ठेवी | रु. | १७,१७,८९१ |
| (८) अल्प मुदत ठेवी | रु. | ७,१३,४५१ |
| (९) खेळतें भांडवल | रु. | ७१,३६,८५८ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणांवर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदीविक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांकडे लिहा.

त्र्यं. वि. निसळ मॅनेजर    कृ. ज. जोशी जनरल मॅनेजर    मो. कुं. फिरोदिया चेअरमन



# दि बेळगांव डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

मुख्य कचेरी : १५० भांदूरगल्ली, बेळगांव

शाखा १२

प्रगतीचे आंकडे

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | २०,००,००० |
| खपलेलें शेअर भांडवल | रु. | १३,२०,००० |
| गंगाजळी व इतर ठेवी. | रु. | ८,२२,००० |
| एकूण ठेव रक्कम | रु | १,४४,००,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १,७१,००,००० |

या बँकेच्या सर्व कचेऱ्यांमध्यें चालती, सेव्हिंग्ज बँक, थ्रिफ्ट, रिकरिंग व एक महिन्यापासून दहा वर्षांपर्यंतच्या ठेवी स्वीकारल्या जातात. सर्व तऱ्हेचे बँकिंग व्यवहार केले जातात.

बैलहोंगल व बेळगांव बझार शाखांमध्यें मौल्यवान् वस्तूंच्या सुरक्षिततेसाठीं लॉकरची व्यवस्था आहे.

अधिक माहितीसाठीं बँकेच्या कचेऱ्यांमध्यें चवकशी करावी.

पी. बी. उगरगोळ, चेअरमन.

…अशी विनंती करूं लागले आहेत कीं, त्यांचेकडील थकलेली कर्जाची बाकी वसूल होऊन मिळण्यासाठी त्यांनीं त्या सभासदांवर लवाद दावे दाखल करावेत ! लवाद दाव्यांची आतां भीति वाटण्याऐवजीं तें त्यांना आतां संरक्षणच वाटूं लागलें आहे. असें होण्याचें कारण आमच्या दृष्टीनें हें आहे कीं लवाद निवाड्यांची बजावणी होण्यास सामान्य कोर्टीच्या हुकूमनाम्यांच्या बजावणीपेक्षा फारच जास्त वेळ लागतो. न्यायदान मंडळास पूर्वी फक्त अपिलेंच ऐकून तीं निकालीं काढण्याचा अधिकार होता व हीं अपिलें लवाद निवाड्याच्या तारखेपासून दोन महिन्यांचे आंतच त्या मंडळाकडे दाखल करावीं लागत असत. परंतु सन १९५४ सालीं या मंडळास आणखी जास्त अधिकार देण्यांत आले. त्यांना फेर चौकशीचें ( Revision ) तसेंच सदर मंडळानें पूर्वी दिलेल्या निकालांचे फेर विचार ( Review ) करण्याचे अधिकार आतां मिळाले आहेत. हे अधिकार सदर मंडळास जास्तींत जास्त किती दिवसांत त्याबाबतची मागणी आल्यास वापरतां येतील, यासंबंधी कायद्यांत कांहींहि बंधन घातलेलें नसल्यानें या अधिकाराचा उपयोग सदर मंडळ केव्हांहि करूं शकतें असें अनुभवास आलें आहे. यामुळें तर सहकारी संस्थांची फारच कुचंबणा होत आहे. या संस्थांनीं मिळविलेलें लवाद निवाडे हे एका विशिष्ट मुदतींत त्यावर अपील झालें नसल्यास अखेरचे समजले जाणें जरूर आहे. तसें न झाल्यास फारच केविलवाणी स्थिती निर्माण होइल. हल्ला या निवाड्यांची अशीच अनिश्चित परिस्थिति आहे. कारण या निवाड्यांची फेर चौकशी व्हावी अशी मागणी थकबाकीदारांनीं निवाड्यांच्या तारखेनंतर कित्येक वर्षांनीं केली, तरीहि ता न्यायदान मंडळाकडून मंजूर होते असें अनुभवास येतें. एवढेंच नव्हे तर अशी मागणी होण्यापूर्वीहि थकबाकीदारांकडून निवाड्यापोटीं व निवाड्यांत नमूद असलेल्या पद्धतीनें व अटीनुसार प्रत्यक्ष वसूल आला असला तरीहि जर या फेरचौकशीची मागणी न्यायदानमंडळानें मान्य केली व मूळ निवाड्यांत या मंडळानें कांहीं फेरफार केले तर त्या दुरुस्त हुकुमाची अम्मलबजावणी निवाड्यानंतर आलेल्या वसुलाबाबतहि केली जाते असेंहि अनुभवास येतें. ही परिस्थिति फारच चमत्कारिक व अयोग्य आहे. सबब मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांतील या उणिवा सत्वर दुरुस्त होणें फार जरूरीचें झालें आहे. आम्हीं वर दिलेलें वर्णन हें वस्तुस्थितिनिदर्शक नसून तें काल्पनिक असावें असें कांहीं वाचकांना वाटण्याचा संभव आहे. सबब त्यांचें समाधानाकरतां आमचेकडे या बाबत आलेल्या एका जबाबदार नागरी सहकारी बँकेच्या कार्याध्यक्षांच्या पत्रांतील जरूर तेवढा मजकूर याखालीं आमचे शब्दांत आम्हीं देत आहों:—

"सहकारी संस्थांची येणीं अल्प खर्चानें व सत्वर वसूल व्हावीं म्हणून सहकारी कायद्यांत लवादाची तरतूद केली आहे. त्याप्रमाणें थकबाकीदारावर दावे करून निवाडे मिळविले तरीहि प्रत्यक्ष वसूल येणें फार दुरापास्त होतें. न्यायदान मंडळाकडे अपील केलें असतां अल्प रकमेचे, कमी व्याजाचे व अनेक वर्षांचे, हप्ते मिळूं शकतात; शिवाय हें अपील मुदतींत करणेचें कारण नाहीं; तें केव्हांहि केलें तरी न्यायदानमंडळ तें स्वीकारतें; असा समज या मंडळानें केलेल्या कांहीं निर्णयावरून सभासदांमध्यें निर्माण झाल्याचें अनुभवास येतें."

"सदर बँकेनें एका कुळावर पांच वर्षांपूर्वी लवादनिवाडा मिळवून तो कलेक्टरसाहेब यांचेकडे बजावणीसाठी पाठविला. मामलेदार कचेरींत कांहींहि तजवीज न होतां तो दोन-तीन वर्षे पडून होता. पुढें बरेच तगादे केल्यावर व त्याबाबत जरूर तो पत्रव्यवहार झाल्यानंतर अखेरीस थकबाकीदारानें बँकेस तारण दिलेल्या मिळकतीचा लिलांव मुलकी खात्यानें करून तिची विक्रीहि केली व लिलावांत मिळकत खरेदी करणारास त्याबाबतचा दाखला ( Sale Certificate ) देण्यापर्यंतहि काम आलें असतां थकबाकीदारानें न्यायदान मंडळाकडे अर्ज करून दाद मागितली. या कामीं सदर मंडळानें बँकेस कांहींहि जाणीव न देतां, बँकेस याबाबतचें आपलें म्हणणें मांडण्यास संधि न देतां, व वस्तुस्थितीचें अवलोकन न करतां, सदर अर्जावरून लवाद निवाड्याच्या बजावणीचें कामकाज स्थगित करण्यांबद्दलचा हुकूम (Stay Order) सदर मंडळानें दिला. एका कुळास असा हुकूम इतक्या वर्षांनंतरहि मिळूं शकला ही गोष्ट नजरेस येतांच इतर दोनतीन कुळांनीं, त्यांचेवर बँकेनें मिळविलेल्या निवाड्यांची बजावणी होत असतांहि, असाच अर्ज केले व बजावणीचें काम स्थगित करून घेतलें व कांहीं कुळांना रकमेच्या परतफेडीसाठी सदर न्यायदान मंडळाकडून हप्तेहि मिळाले. असेंच अनिश्चितपण चालू राहिल्यास सहकारी संस्थांची हळूहळू वाढत चाललेली थकबाकी कमी न होतां ती दिवसेंदिवस जास्तच वाढत जाऊन संस्थेवर बिकट प्रसंग येण्यास वेळ लागणार नाहीं. अशा प्रकारें सहकारी संस्थांच्या थकबाकीचा वसुलीचा प्रश्न फारच गंभीर झाला आहे व त्याचा योग्य तो विचार सहकारी कार्यकर्त्यांनीं फार तांतडीनें करणें अगत्याचें झालें आहे."

या मजकुरावरून आम्हीं वर प्रदर्शित केलेली भीति ही काल्पनिक नसून वस्तुस्थितिनिदर्शक आहे हें दिसून येईल.

याबाबत आमच्या सूचना पुढील परिच्छेदांत आम्ही देत आहोंत त्यांचा विचार मुंबई सरकारनें तावडतोब करून सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांत जरूर त्या दुरुस्त्या कराव्या अशी आमची सदर सरकारला विनंती आहे. हिंदुस्थान सरकारनें या कामासाठीं नेमलेल्या समितीसहि आमची अशी सूचना आहे कीं अशीच परिस्थिति इतर प्रांतांत असल्यास अगर पुढें निर्माण होण्याची शक्यता असल्यास ती तशी राहूं नये अगर होऊं नयें यासाठी समितीनें योग्य त्या शिफारसी जबाबदार सरकारच्या माहितीसाठी व अम्मलबजावणीसाठी कराव्यात

या बाबतच्या आमच्या सूचना स्थूलमानानें खालीलप्रमाणें आहेत :—

( १ ) मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांत नमूद असलेलें न्यायदान मंडळ रद्द करण्यांत यावें व लवाद निवाड्यासंबंधीं एकाद्या पक्षकाराची तक्रार असल्यास त्यास त्यासंबंधीं लवादनिवाड्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आंत अपील करण्यास परवानगी असावी. मात्र लवादनिवाडा झाल्यावर असें अपील संबंधित इसमानें सदर मुदतींत दाखल केलें नसेल तर तो निवाडा अखेरचा म्हणून समजला जाऊन त्याची अंमलबजावणी होईल व त्यांत पुढें केव्हांहि व कोणासहि फेरफार करण्याचा अधिकार राहणार नाहीं. तसेंच, सरकारकडे अपील दाखल झाल्यास तें सत्वर निकालीं काढण्याचें सरकारचें धोरण असावें. यासाठी सदर कायद्यांत व त्या खालील कानूंत जरूर त्या तजविजी करण्यांत याव्यात.

( २ ) वर नमूद केलेली सूचना फारच क्रांतिकारक स्वरूपाची असल्यानें ती मान्य करणें अगदींच अशक्य आहे असें वाटत असेल तर निदान न्यायदान मंडळानें त्याचेकडे करण्यांत यावयाचे अपील अगर फेरचौकशीची मागणी किंवा फेरविचार करण्याचा अर्ज ज्या बाबींसंबंधी अपील अगर फेर चौकशी

# दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पुणें

—स्थापना दि. १८ जानेवारी, १९०६—

कामाची वेळः—सकाळीं ९ ते ११–३० व
सायंकाळीं ५–३० ते ७
शनिवारीं फक्त सकाळीं ९ ते ११-३०

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | १,३०,२६० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | १,७३,१९१ |
| ठेवी | रु. | १५,३४,४३१ |
| खेळतें भांडवल | रु. | १८,९१,४८६ |

★ पन्नास वर्षे सतत भरीव व चोख कामगिरी असलेली.
★ मध्यमवर्गीयांची सोय पहाणारी व विश्वसनीय असलेली.
★ सतत ३५ वर्षे 'अ' वर्गात असलेली.
★ मध्य वसतींत प्रमुख ठिकाणीं स्वतःची इमारत असलेली.
★ सेफ कस्टडीची व्यवस्था असलेली.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

नियमांसंबंधीं बँकेंत चौकशी करावी.

य. श्री. शालिग्राम, कार्यवाह.
द. ल. पारखी कार्याध्यक्ष.

---

सर्वांना हवी असलेली सहकारी बँक

३९ वर्षे व्यक्तिविकास व व्यापारवृद्धीसाठी सेवा व संरक्षण करणारी

व्यापारी-वर्गाची यशस्वी बँक

# दि डेक्कन मर्चंट्स् को-ऑपरेटिव्ह बँक लि०

: मुख्य कचेरी : ११७ चर्नी रोड, मुंबई ४.

: शाखा : रानडे रोड, वेस्टर्न रेल्वेसमोर दादर.

* मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजावर स्वीकारल्या जातात.

* मध्यमवर्गीयांची, व्यापारी, धंदेवाईक, वगैरेंची सहकार्यानें सेवा.

* बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

---

महाराष्ट्रांतील सर्व सहकारी अर्बन बँकांत अग्रस्थानीं असलेली

# दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर

स्थापनाः सन १९१० | हेड ऑफिसः अहमदनगर शहर

शाखाः—१ संगमनेर (जि. नगर) २ बेलापूर रोड–श्रीरामपूर (जिल्हा नगर) ३ वांबोरी (जि. नगर.)

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत व काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| (२) वसूल भांडवल | रु. | ३,७५,९४० |
| (३) रिझर्व्ह फंड | रु. | २,९८,१८४ |
| (४) इतर फंड | रु. | ३,३०,३२५ |
| (५) चालू ठेवी | रु. | २६,८७,५७१ |
| (६) सेव्हिंग्ज ठेवी | रु. | ९,९३,७७१ |
| (७) मुदत ठेवी | रु. | १७,१७,८९१ |
| (८) अल्प मुदत ठेवी | रु. | ७,१३,४५१ |
| (९) खेळतें भांडवल | रु. | ७१,३६,८५८ |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणांवर कर्जे दिलीं जातात. तसेंच चेक, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदीविक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठीं सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांकडे लिहा.

त्र्यं. वि. निसळ मॅनेजर — कृ. ज. जोशी जनरल मॅनेजर — मो. कुं. फिरोदिया चेअरमन.

---

# दि बेळगांव डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

मुख्य कचेरीः १५० भांदूरगल्ली, बेळगांव

शाखा १२

प्रगतीचे अंकडे

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | २०,००,००० |
| खपलेलें शेअर भांडवल | रु. | १३,३०,००० |
| गंगाजळी व इतर ठेवी | रु. | ८,१२,००० |
| एकूण ठेव रक्कम | रु. | १,४४,००,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १,७१,००,००० |

या बँकेच्या सर्व कचेऱ्यांमध्यें चालती, सेव्हिंग्ज बँक, थ्रिफ्ट, रिकरिंग व एक महिन्यापासून दहा वर्षापर्यंतच्या ठेवी स्वीकारल्या जातात. सर्व तऱ्हेचे बँकिंग व्यवहार केले जातात.

बैलहोंगल व बेळगांव बझार शाखांमध्यें मौल्यवान् वस्तूंच्या सुरक्षिततेसाठीं लॉकरची व्यवस्था आहे.

अधिक माहितीसाठीं बँकेच्या कचेऱ्यांमध्यें चवकशी करावी.

पी. बी. उगरगोळ, चेअरमन.

अशी विनंती करूं लागले आहेत कीं, त्यांचेकडील थकलेली कर्जांची बाकी वसूल होऊन मिळण्यासाठी त्यांनीं त्या सभासदांवर लवाद दावे दाखल करावेत ! लवाद दाव्यांची आतां भीति वाटण्याऐवजीं तें त्यांना आतां संरक्षणच वाटूं लागलें आहे. असें होण्याचें कारण आमच्या दृष्टीनें हें आहे कीं लवाद निवाड्यांची बजावणी होण्यास सामान्य कोर्टाच्या हुकूमनाम्यांच्या बजावणीपेक्षा फारच जास्त वेळ लागतो. न्यायदान मंडळास पूर्वी फक्त अपिलेंच ऐकून तीं निकालीं काढण्याचा अधिकार होता व हीं अपिलें लवाद निवाड्याच्या तारखेपासून दोन महिन्यांचे आंतच त्या मंडळाकडे दाखल करावीं लागत असत. परंतु सन १९५४ सालीं या मंडळास आणखी जास्त अधिकार देण्यांत आले. त्यांना फेर चौकशीचें ( Revision ) तसेंच सदर मंडळानें पूर्वी दिलेल्या निकालांचे फेर विचार ( Review ) करण्याचे अधिकार आतां मिळाले आहेत. हे अधिकार सदर मंडळास जास्तींत जास्त किती दिवसांत त्याबाबतची मागणी आल्यास वापरतां येतील, यासंबंधी कायद्यांत कांहींहि बंधन घालण्यांत आलेलें नसल्यानें या अधिकाराचा उपयोग सदर मंडळ केव्हांहि करूं शकतें असें अनुभवास आलें आहे. यामुळें तर सहकारी संस्थांची फारच कुचंबणा होत आहे. या संस्थांनीं मिळविलेले लवाद निवाडे हे एका विशिष्ट मुदतींत त्यावर अपील झालें नसल्यास अखेरचे समजले जाणें जरूर आहे. तसें न झाल्यास फारच केविलवाणी स्थिती निर्माण होइल. हल्ला या निवाड्यांची अशीच अनिश्चित परिस्थिति आहे. कारण या निवाड्यांची फेर चौकशी व्हावी अशी मागणी थकबाकीदारांनीं निवाड्यांच्या तारखेनंतर कित्येक वर्षांनीं केली, तरीहि ता न्यायदान मंडळाकडून मंजूर होते असें अनुभवास येतें. एवढेंच नव्हे तर अशी मागणी होण्यापूर्वीहि थकबाकीदारांकडून निवाड्यापोटीं व निवाड्यांत नमूद असलेल्या पद्धतीनें व अटीनुसार प्रत्यक्ष वसूल आला असला तरीहि जर या फेरचौकशीची मागणी न्यायदानमंडळानें मान्य केली व मूळ निवाड्यांत या मंडळानें कांहीं फेरफार केले तर त्या दुरुस्त हुकुमाची अम्मलबजावणी निवाड्यानंतर आलेल्या वसुलाबाबतहि केली जाते असेंहि अनुभवास येतें. ही परिस्थिति फारच चमत्कारिक व अयोग्य आहे. सबब मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांतील या उणिवा सत्वर दुरुस्त होणें फार जरूरीचें झालें आहे. आम्हीं वर दिलेलें वर्णन हें वस्तुस्थितिनिदर्शक नसून तें काल्पनिक असावें असें कांहीं वाचकांना वाटण्याचा संभव आहे. सबब त्यांचें समाधानाकरतां आमचेकडे या बाबत आलेल्या एका जबाबदार नागरी सहकारी बँकेच्या कार्याध्यक्षांच्या पत्रांतील जरूर तेवढा मजकूर याखालीं आमचे शब्दांत आम्हीं देत आहोंः—

" सहकारी संस्थांची येणीं अल्प खर्चानें व सत्वर वसूल व्हावीं म्हणून सहकारी कायद्यांत लवादाची तरतूद केली आहे. त्याप्रमाणे थकबाकीदारावर दावे करून निवाडे मिळविले तरीहि प्रत्यक्ष वसूल येणें फार दुरापास्त होतें. न्यायदान मंडळाकडे अपील केलें असतां अल्प रकमेचे, कमी व्याजाचे व अनेक वर्षांचे, हप्ते मिळूं शकतात; शिवाय हें अपील मुदतींत करणेचें कारण नाहीं; तें केव्हांहि केलें तरी न्यायदानमंडळ तें स्वीकारतें; असा समज या मंडळानें केलेल्या कांहीं निर्णयावरून सभासदांमध्यें निर्माण झाल्याचें अनुभवास येतें. "

" सदर बँकेनें एका कुळावर पांच वर्षांपूर्वी लवादनिवाडा मिळवून तो कलेक्टरसाहेब यांचेकडे बजावणीसाठी पाठविला. मामलेदार कचेरींत कांहींहि तजवीज न होतां तो दोन–तीन वर्षे पडून होता. पुढें बरेच तगादे केल्यावर व त्याबाबत जरूर तो पत्रव्यवहार झाल्यानंतर अखेरीस थकबाकीदारानें बँकेस तारण दिलेल्या मिळकतीचा लिलांव मुलकी खात्यानें करून तिची विक्रीहि केली व लिलावांत मिळकत खरेदी करणारास त्याबाबतचा दाखला ( Sale Certificate ) देण्यापर्यंतहि काम आलें असतां थकबाकीदारानें न्यायदान मंडळाकडे अर्ज करून दाद मागितली. या कामीं सदर मंडळानें बँकेस कांहींहि जाणीव न देतां, बँकेस याबाबतचें आपलें म्हणणें मांडण्यास संधि न देतां, व वस्तुस्थितीचें अवलोकन न करतां, सदर अर्जावरून लवाद निवाड्याच्या बजावणीचें कामकाज स्थगित करण्याबद्दलचा हुकूम (Stay Order) सदर मंडळानें दिला. एका कुळास असा हुकूम इतक्या वर्षांनंतरहि मिळूं शकला ही गोष्ट नजरेस येतांच इतर दोनतीन कुळांनीं, त्यांचेवर बँकेनें मिळविलेल्या निवाड्यांची बजावणी होत असतांहि, असेच अर्ज केले व बजावणीचें काम स्थगित करून घेतलें व कांहीं कुळांना रकमेच्या परतफेडीसाठी सदर न्यायदान मंडळाकडून हप्तेहि मिळाले. असेंच अनिबंधपणे चालू राहिल्यास सहकारी संस्थांची हळूहळू वाढत चाललेली थकबाकी कमी न होतां ती दिवसेंदिवस जास्तच वाढत जाऊन संस्थेवर बिकट प्रसंग येण्यास वेळ लागणार नाहीं. अशा प्रकारें सहकारी संस्थांच्या थकबाकीचा वसुलीचा प्रश्न फारच गंभीर झाला आहे व त्याचा योग्य तो विचार सहकारी कार्यकर्त्यांनीं फार तांतडीनें करणें अगत्याचें झालें आहे."

या मजकुरावरून आम्हीं वर प्रदर्शित केलेली भीति ही काल्पनिक नसून वस्तुस्थितिनिदर्शक आहे हें दिसून येईल.

याबाबत आमच्या सूचना पुढील परिच्छेदांत आम्ही देत आहोंत त्यांचा विचार मुंबई सरकारनें तावडतोब करून सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांत जरूर त्या दुरुस्त्या कराव्या अशी आमची सदर सरकारला विनंती आहे. हिंदुस्थान सरकारनें या कामासाठी नेमलेल्या समितीसहि आमची अशी सूचना आहे कीं अशीच परिस्थिति इतर प्रांतांत असल्यास अगर पुढें निर्माण होण्याची शक्यता असल्यास ती तशी राहूं नये अगर होऊं नये यासाठी समितीनें योग्य त्या शिफारसी जबाबदार सरकारच्या माहितीसाठी व अम्मलबजावणीसाठी कराव्यात

या बाबतच्या आमच्या सूचना स्थूलमानानें खालीलप्रमाणें आहेत :—

( १ ) मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांत नमूद असलेलें न्यायदान मंडळ रद्द करण्यांत यावें व लवाद निवाड्यासंबंधीं एकाद्या पक्षकाराची तक्रार असल्यास त्यास त्यासंबंधीं लवादनिवाड्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आंत अपील करण्यास परवानगी असावी. मात्र लवादनिवाडा झाल्यावर असें अपील संबंधित इसमानें सदर मुदतींत दाखल केलें नसेल तर तो निवाडा अखेरचा म्हणून समजला जाऊन त्याची अंमलबजावणी होईल व त्यांत पुढें केव्हांहि व कोणासहि फेरफार करण्याचा अधिकार राहणार नाहीं. तसेंच, सरकारकडे अपील दाखल झाल्यास तें सत्वर निकालीं काढण्याचें सरकारचें धोरण असावें. यासाठी सदर कायद्यांत व त्या खालील कानूंत जरूर त्या तजविजी करण्यांत याव्यात.

( २ ) वर नमूद केलेली सूचना फारच क्रांतिकारक स्वरूपाची असल्यानें ती मान्य करणें अगदींच अशक्य आहे असें वाटत असेल तर निदान न्यायदान मंडळानें त्यांचेकडे करण्यांत यावयाचे अपील अगर फेरचौकशीची मागणी किंवा फेरविचार करण्याचा अर्ज ज्या बाबींसंबंधीं अपील अगर फेर चौकशी

किंवा फेरविचार करावयाचा त्याच्या तारखेपासून तीस दिवसांचे आंत न्यायदान मंडळाकडे दाखल केला नसल्यास त्याचा विचार करण्याचा अधिकारच या मंडळास असणार नाहीं, अशी तरी तजवीज वरील कायद्यांत करण्यांत यावी.

( ३ ) लवाद निवाडा, किंवा त्यावर अपील झालें असल्यास त्या अपिलानंतर देण्यांत आलेला निकाल, हा अखेरचा असेल व त्यांत पुढें कोणासहि व केव्हांहि फेरफार करण्याचा अधिकार असणार नाहीं अशीहि तजवीज कायद्यांत स्पष्टपणें करण्यांत यावी.

( ४ ) लवाद निवाड्याची बजावणी आपल्या राज्यांत सामान्य कोर्टांकडून किंवा मुलकी खात्याचे अधिकाऱ्यामार्फत करतां येते त्याऐवजीं बजावणी करण्याचा हा अधिकार सहकारी खात्यांच्या अम्मलदाराकडे असावा व त्यांना ही बजावणी झटपट करतां येईल अशा तऱ्हेचे जरूर ते अधिका[र] देण्यांत यावेत व त्याबाबतची योग्य ती तजवीज वरील कायद्यांत करण्यांत यावी.

वरील प्रकारें मुंबई सहकारी कायद्यांतील उणिवा दूर केल्या गेल्यास आपल्या राज्यांतील शेतकरी, कारागीर, लहान लहान व्यापारी व उद्योगधंदे करणारे लोक, कामकरी, वगैरेंना वेळोवेळ[ीं] लागणाऱ्या योग्य त्या भांडवलाचा पुरवठा सहकारी संस्थांन[ा] सहजीं व कोणताहि धोका न वाटतां वेळचेवेळीं व सुलभतेन[ें] करतां येईल व मग ते आपले बहुतेक सर्व आर्थिक व्यवहार सहकारी पद्धतीनें करूं शकतील व त्यांचें जीवन सहकारमय होऊन आपल्या पुढाऱ्यांनीं ठरविलेलें सहकारी संघराज्याचें ध्येय आपणांस थोडक्याच कालावधींत साध्य करून घेतां येईल अशी आशा आहे.


## दि इसलामपूर अर्बन को-ऑ. बँक लिमिटेड

इसलामपूर ( जि. द. सातारा )

( स्थापना सन १९३५ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००० |
| वसूल भांडवल | रु. २५,९५० |
| खेळतें भांडवल | रु. १,७४,००० |

के. डी. बोरकर, सेक्रेटरी.

जी. एल. फडणीस, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.



## दी पैसाफंड शेतकी सहकारी बँक लिमिटेड

हुपरी ( जिल्हा कोल्हापूर )

| | |
|---|---|
| शेअर्स | रु. ५३,९३० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ११,३५३ |
| खेळतें भांडवल | रु. २,५६,१११ |

"सभासदांच्या शक्य तों सर्व प्रकारच्या अडचणी सहकार्यानें दूर करण्याचा प्रयत्न, हें ह्या बँकेचें एक वैशिष्ट्य आहे."

आ. बा. नाईक
मॅनेजिंग डायरेक्टर



यंदाची दिपवाळी आमचे हितचिंतकांना सुखाची जावो !

**********************************

## दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि.

कोल्हापूर.

( स्थापना सन १९३३ इ० )

| | |
|---|---|
| १) शेअर भांडवल उभारलेलें | रु. २,००,००० |
| २) शेअर भांडवल वसूल | रु. १,०३,८५० |
| ३) रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ९६,०५२ |
| ४) खेळतें भांडवल | रु. ३,५७,००० |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

आर. के. सरनाईक, अकौंटंट

डी. ए. शिंदे, प्रेसिडेंट



## कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

कोल्हापूर.

स्थापना सन :—१९३८

मुख्य कचेरी :—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर नं. १

फोन नं. ३४२

शाखा विस्तार :—१ हातकणंगलें २ जयसिंगपूर ३ मलकापूर ४ इचलकरंजी

प्रगतीचे आंकडे

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. ७,००,००० |
| वसूल शेअर भांडवल | रु. ३,५६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ७६,६०० |
| ठेवी | रु. २१,६०,००० |
| खेळतें भांडवल | रु. ३६,००,००० |

चालू, सेव्हिंग व मुदतबंद ठेवी आकर्षक व्याजानें स्वीकारल्या जातात.

चेकस्, हुंड्या, रेल्वे रिसिटस् वगैरे बिलें वसुलीचे व सर्व तऱ्हेचे अद्यावत् बँकिंगचे व्यवहार केले जातात.

धुंडिराज गणेश लेले,
ॲडमिनिस्ट्रेटर.

# सहकारी लवादपद्धति

( लेखकः—श्री. द्. ग. येरवडेकर, एम्. ए, एलएल्. बी. )

स्वतंत्र भारताचें उद्दिष्ट 'सहकारी संघराज्य' असें ठरविण्यांत आल्यामुळें भारतांत आज जवळजवळ ६० वर्षे अस्तित्वांत असणारी सहकारी चळवळ यापुढें अनेक अंगांनीं वाढणार ही गोष्ट निर्विवाद आहे. सहकारी संस्था जीवनाच्या विविध गरजा भागविण्यासाठीं स्थापन करून त्या मार्गानें जीवन सुखी व समृद्ध होईल असे प्रयत्न करण्यांत येत आहेत. आजपर्यंत सहकारी संस्था या कर्जपुरवठा करण्याचें कार्यच मुख्यत्वेंकरून करीत होत्या. पण यापुढें निव्वळ मर्यादित कर्जपुरवठा करणें एवढेंच ध्येय त्यांच्यापुढें नसून तऱ्हेतऱ्हेच्या मालाचें उत्पादन व वांटप, शेती, घरबांधणी, निरनिराळे उद्योगधंदे, वगैरे अनेक व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्था अस्तित्वांत येत आहेत. आपल्या महाराष्ट्रांत ठिकठिकाणी स्थापन झालेले व होत असलेले सहकारी साखर कारखाने हे आपल्या सहकारी चळवळीचा आजपर्यंतचा उत्कर्षबिंदु समजण्यास हरकत नाहीं.

### सहकारी संस्थांना सवलती

सहकारी संस्था स्थापन करण्यास उत्तेजन मिळावें या हेतूनें सरकारनें पूर्वीपासून या संस्थांच्या कारभारांना अनेक सवलती दिल्या आहेत. त्या सवलतींचा एक भाग म्हणजे सहकारी संस्था व त्यांचे सभासद यांच्या दरम्यान सदर संस्थांच्या कामाच्या बाबतींत जे तंटे निर्माण होतील त्यांचा झटपट व शक्य तितक्या कमी खर्चांत निकाल करणारी सहकारी लवादपद्धति होय. सहकारी चळवळीचा व्याप एकसारखा वाढत असल्यामुळें सहकारी संस्थांचीं कामें व कारभार, उत्तरोत्तर अधिक मोठे व अधिक गुंतागुंतीचे होत आहेत. अशा परिस्थितींत बिनसहकारी व्यक्ति व संस्था यांच्या तंट्यांचा निर्णय ज्या न्यायकोर्टामार्फत होतो त्याच न्यायकोर्टाकडे सहकारी संस्था व त्यांचे सभासद यांच्या दरम्यानच्या तंट्याचा निर्णय करण्याचें काम दिलें असतें तर तें फार महाग व दिरंगाईचें झालें असतें. म्हणून सरकारनें सहकारी संस्थांसाठीं कायद्यानें सुलभ व सवंग अशी झटपट लवादपद्धति निर्माण केली आहे. सहकारी संस्थांशीं समाजांतील प्रत्येक व्यक्तीचा कोठें ना कोठें संबंध आल्यावांचून राहात नाहीं. म्हणून या सहकारी लवादपद्धतीची माहिती सामान्य वाचकांना ढोबळ रीतीनें असणें अत्यंत जरूर आहे. ती शक्य तितकी थोडक्यांत करून देण्यासाठीं हा लेख लिहिण्यांत येत आहे.

### रजिस्ट्रारकडे लवाद-फिर्याद

मुंबईच्या सहकारी सोसायट्यांच्या कायद्याच्या कलम ५४ अन्वयें ही सहकारी लवाद-पद्धति निर्माण करण्यांत आली आहे. सहकारी संस्था व तिचे माजी व विद्यमान सभासद, पदाधिकारी नोकर, समिति, प्रतिनिधि यांच्या दरम्यान संस्थेच्या कारभाराच्या अगर संघटनेच्या बाबतींत कांहीं तंटा निर्माण झाल्यास त्या तंट्याचा निकाल करण्यासाठीं तो तंटा रजिस्ट्रारकडे दाखल केला पाहिजे अशी ही सक्तीची योजना आहे. एखाद्या सहकारी सोसायटीनें आपल्या सभासदांना कर्ज दिलें व त्यांनीं त्या कर्जाची परतफेड केली नाहीं तर तें कर्ज वसूल करण्यासाठी सोसायटीने नेहमींच्या न्यायकोर्टांत दावा न लावतां रजिस्ट्रारकडे कर्ज थकविणाऱ्या सभासदांविरुद्ध लवाद-फिर्याद दाखल केली पाहिजे असें ५४ कलम सांगतें. मग असे कर्जदार जरी कांहीं अन्य कारणानें लवाद-फिर्याद करतेवेळीं विद्यमान सभासद नसले तरीहि कर्ज घेतेवेळीं ते सभासद होते म्हणून त्यांचेवर लवाद-फिर्याद चालूं शकते. त्याचप्राणें, कांहीं कर्जदार अशी फिर्याद दाखल करतेवेळीं मयत असले तरी त्यांच्या वारसांवर जरी ते वारस वादी सोसायटीचे सभासद नसले तसेंहि लवाद-फिर्याद चालूं शकते. सहकारी संस्थेच्या एखाद्या नोकरानें किंवा गुमास्त्यानें संस्थेच्या मालमत्तेची नासधूस केली किंवा पैशांची अफरातफर केली तर सहकारी संस्थेला त्या नोकरावर नुकसानभरपाईसाठीं किंवा पैशांच्या वसुलीसाठीं लवाद-फिर्यादच करावी लागते. त्याचप्रमाणें, सहकारी संस्थांच्या घटनेविषयीं अगर त्यांमध्यें होणाऱ्या निवडणुकांविषयीं उमेदवार सभासदांमध्यें परस्पर किंवा संस्था व उमेदवार यांच्या दरम्यान मतभेद व तंटा उपस्थित झाला तर त्याचाहि निर्णय लवादपद्धतीनेंच करून घ्यावयास हवा. या बाबतींत एक गोष्ट लक्षांत ठेवावयास हवी कीं लवाद-फिर्याद करण्याचा हक्क हा केवळ संस्थांनाच दिलेला नाहीं जशी संस्थांना सभासद व नोकर यांच्यावर लवाद-फिर्याद करतां येते तशीच नोकर व सभासद यांनाहि संस्थांवर लवाद-फिर्याद करतां येते. ही सवलत अशा रीतीनें एकेरी नसून दुहेरी आहे. उदाहरणार्थ, एकाद्या सभासदाला रक्कम-वसुलीसाठीं अगर हक्क-शाबिदीसाठीं सोसायटीला प्रतिवादी करून लवाद-फिर्याद करतां येते व एकाद्या नोकराला आपणांस अन्यायानें नोकरीवरून काढून टाकलें सबब नुकसानभरपाई मिळावी असा दावा लवाद-पद्धतीनें सोसायटीविरुद्ध दाखल करतां येतो. त्यांना नेहमींच्या न्यायकोर्टांत जावें लागत नाहीं.

### लवाद पद्धतीची सक्ति

ही लवाद-पद्धति सक्तीची आहे असें विधान वर करण्यांत आलें आहे, त्याचा खुलासा येथें केला पाहिजे. ५४ कलमान्वयें हे दावे रजिस्ट्रारपुढेंच दाखल केले पाहिजेत व त्याला अगर त्यानें नेमलेल्या लवादालाच ते चालविण्याचा अधिकार आहे. दिवाणी कोर्टांत असे दावे दाखल करतां येत नाहींत; केले तर ते रद्द होतात. अशा रीतीनें दिवाणी कोर्टें असले दावे चालविण्यास असमर्थ ठरविण्यांत आलीं आहेत. बिनसहकारी व्यक्ति व संस्था यांच्या दरम्यानचे तंटे त्यांना लवादामार्फत तोडून घेण्याचा सामान्य लवाद-कायदा अस्तित्वांत आहे. त्या कायद्याप्रमाणें तंट्याच्या सर्व बाजूच्या सर्व पक्षकारांनीं आपल्या पसंतीनें लवाद नेमून त्याला राजीनामा दिला म्हणजेच तो लवाद त्या तंट्याचा निकाल लावूं शकतो. म्हणजे तेथें वादी-प्रतिवादींना आपल्या पसंतीचा लवाद नेमतां येतो. पण सहकारी कायद्यानें निर्माण केलेल्या लवादपद्धतींत पक्षकारांना स्वतःच्या पसंतीचा लवाद नेमण्याची मुभा नाहीं. याहि दृष्टीनें ही योजना सक्तीची आहे. ५४ कलमान्वयें रजिस्ट्रार व असिस्टंट रजिस्ट्रार हे नेमून दिल्यामुळें त्यांच्या हद्दींतील सर्व सोसायट्यांच्या तंट्यांचे मूलभूत लवाद असतात. त्यांचा निर्णय वादी-प्रतिवादींना मानावाच लागतो. त्यांना त्यांच्या खात्यांतलीं इतर अनेक कामें पाहावीं लागतात. म्हणून त्यांना हीं लवादाचीं शेंकडोशें कामें स्वतः करण्यास सवड नसते. म्हणून असे तंटे ऐकून त्यांचा निर्णय

करण्यासाठी रजिस्ट्रार दरसाल जिल्हानिहाय कांहीं ' रजिस्ट्रार्स नॉमिनीज ' नेमतो व त्या त्या जिल्ह्याचे असिस्टंट रजिस्ट्रार त्यांच्याकडे दाखल होणाऱ्या लवाद-फिर्यादी अशा ' नियुक्त लवादांना ' ऐकून निकाल करण्यासाठी वांटून देतात. अशा नियुक्त लवादांनीं कांहीं गैरवर्तणूक, पक्षपात किंवा दिरंगाई केल्याशिवाय ' हा लवाद आम्हांला नको ' अशी तक्रार पक्षकारांना करतां येत नाहीं.

### लवाद निवाड्यांना अत्यल्प खर्च

सहकारी लवादांपुढें दाखल करण्यांत येणाऱ्या फिर्यादींना कोर्ट फी स्टँप लागत नाहीं व नियुक्त लवादांना मिळणारें वेतन अगदींच थोडें असतें. त्यामुळें पक्षकारांना फारशा खर्चाशिवाय तंटा तोडून मिळतो. लवादांपुढें वकिलांना बंदी असल्यामुळें वकिलाची फी देण्याचा खर्चहि पक्षकारांना पडत नाहीं. सामान्य न्यायकोर्टें म्हणजे दिवाणी कोर्टें यांच्यापुढील दाव्यांना जो खर्च येतो तो पहातां सहकारी लवादांपुढील तंटे जवळजवळ फुकटांतच चालतात असें तुलनेनें म्हणतां येतें.

### सहकारी ट्रिब्यूनल

सन १९४९ पर्यंत नियुक्त लवादांनीं दिलेल्या निकालांविरुद्ध रजिस्ट्रारकडे अपीलें करतां येत असत. पण १९४९ पासून सहकारी ट्रिब्यूनल स्थापन करण्यांत आलें व रजिस्ट्रारचा अपीलें ऐकण्याचा अधिकार कमी करण्यांत येऊन तो ट्रिब्यूनलकडे देण्यांत आला. ट्रिब्यूनलकडे निकालाच्या दिवसापासून ६० दिवसांत अपील करतां येतें. अपीलाला कोर्ट फी स्टँम्प लागत नाहीं, म्हणजे तेवढा खर्च वांचतो व अपील चालविण्यास वकील देतां येतो. ट्रिब्यूनलचे तीन सभासद असून मुख्य कचेरी मुंबईस असते. अलीकडे पक्षकारांच्या सोयीसाठा ट्रिब्यूनलच राज्यांतील प्रमुख शहरीं चारचार दिवस हिंडूं लागलें आहे व आसपासचीं अपीलें त्या त्या शहरीं ऐकूं लागलें आहे. त्यामुळें न्यायदान आणखी सोयीचें व सवंग झालें आहे. कांहीं विशिष्ट परिस्थितींत भारताच्या घटनेतील तरतुदींना अनुसरून सहकारी ट्रिब्यूनलच्या निकालाविरुद्ध मुंबई हायकोर्टाकडेहि अपील करून दाद मागतां येते.

### लवाद मंडळाची तरतूद रद्द

आजपर्यंत सहकारी कायद्याच्या ५४ व्या कलमामध्यें नियुक्त लवादाकडे फिर्याद सोपविल्यानंतर पक्षकारांना आपआपल्यातर्फे एक एक लवाद नेमून वादीचा एक लवाद, प्रतिवादीचा एक लवाद व ' नियुक्त लवाद ' अशा तिघांच्या लवाद मंडळापुढें तो दावा चालवून मिळण्याचा हक्क असे पण अशा रीतीनें ज्या दाव्यांत तिघांचें लवाद मंडळ स्थापन होईल त्या दाव्याचें काम तिघहि लवाद हजर असल्याशिवाय चालू शकत नसे व तिघांचें एकमत न झालें तर दोघांचा म्हणजे बहुमताचा निकाल प्रभावी ठरत असे. बहुमताच्या निकालावर अपील नसे. फक्त तपासणी अर्ज करतां येत असे व त्यांत कांहीं गैरवर्तणूक, पक्षपात किंवा उघड उघड बेकायदेशीर निर्णय दिसून आल्याशिवाय ट्रिब्यूनल बहुमताचा निर्णय फिरवूं शकत नसे. म्हणून मुंबई सरकारनें सहकारी कायद्यांत दुरुस्ती करून अशा लवाद मंडळाची तरतूद रद्द केली आहे. हीं नवी दुरुस्ती २७ जुलै, १९५६ पासून अंमलांत आली असल्यामुळें तिघांचीं लवादमंडळें इतिहासजमा झालीं आहेत.

### नियुक्त लवादाची लायकी

यापुढें सहकारी संस्थांचीं कामें व व्यवहार उत्तरोत्तर अधिक गुंतागुंतीचे व क्लिष्ट होणार व वादीचा एक, प्रतिवादीचा एक व रजिस्ट्रारचा एक असे तीन सभासद असणारीं लवादमंडळें तर अस्तित्वांत येण्याची शक्यता नाहीं. अशा परिस्थितींत ' नियुक्त लवादा ' ला एकट्यालाच प्रत्येक तंटा ऐकून त्याचा कायदेशीर निर्णय लावणें भाग पडणार आहे. असें करतां येणें केवळ कायद्याचें सूक्ष्म ज्ञान व कोर्टकामाचा व सहकारी-संस्थांच्या कार्यपद्धतीचा अनुभव व माहिती असणाऱ्या कायदेपंडितालाच शक्य आहे. कायद्याचें ज्ञान नसणाऱ्या सहकारी कार्यकर्त्यांना हें काम साधत नाहीं, असा आजपर्यंतचा अनुभव आहे व पुढेंहि तें जमणार नाहीं. तेव्हां रजिस्ट्रार्स नॉमिनी म्हणून सहकारी संस्थांतून पदाधिकारी म्हणून काम करणाऱ्या कायदेपंडितांची व वकिलांचीच नेमणूक होईल, इतरांची होणार नाहीं, याची खबरदारी सहकारी खात्यानें घेतली पाहिजे. लायक व कायद्याच्या सम्यक् ज्ञानानें युक्त अशा लवादांकडून तंट्यांचे योग्य निर्णय दिले गेले तरच या बिनखर्ची लवादपद्धतीचा जनतेला खराखुरा उपयोग होईल व सहकारी संस्थांचा व या लवादपद्धतीचा अधिकाधिक विश्वास वाटूं लागेल. जनतेचा पूर्ण विश्वास संपादन केल्यानेंच कोणतीहि न्यायदानपद्धति खऱ्या अर्थानें श्रेष्ठ व उपयुक्त ठरत असते. —पॅरेमाउंट उद्योग व्यापार वार्षिक.


'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



रजिस्टर नंबर ७२१८ स्थापना १९३५

सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँडमॉर्गेज बँक, लि.

शेतकरी बांधवांच्या कर्जाची खास सोय!

शेतकरी लोकांना कर्जातून मोकळें होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेची, अगर नवीन विहीर काढणेची, इंजिनादि यंत्रसामुग्री खरेदी करणेची अगर जमीन खरेदी करणेची आलेली अमूल्य संधि !

हेड ऑफिस, कराड ——— ब्रँच ऑफिस, सांगली

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | १,१५,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १७,००,००० |
| वांटलेलें कर्ज | रु. | २२,५०,००० |
| ३०-६-'५६ अखेर नफा | रु. | १६,४२५ |

व्याजाचे दरः—

| | |
|---|---|
| विहीर, विहीर दुरुस्ती | ६½% |
| शेती, यंत्रसामुग्रीकरितां | ५½% |
| जमीन-खरेदी व जुनें कर्ज भागविणें | ७½% |

म. सि. पुटाणी — मॅनेजर.
नीलकंठ आणाप्पा कल्याणी — चेअरमन.

# सहकारी न्यायदान दिवाणी कोर्टाकडूनच झालें पाहिजे!

( लेखक :—श्री. स. वा. दातार, बी. एस्सी., एलएल. बी., वकील, पुणें. )

### प्रचलित पद्धति

ध्येय व व्यवहार ह्या दोन्हीं दृष्टींनीं सहकारी कार्याची व्याप्ति वाढत जाणें आपल्या समाजाचे हिताचें आहे ह्यांत संशय नाहीं. परंतु सहकारी क्षेत्रांत जी न्यायदानपद्धति सध्यां जारी करण्यांत आलेली आहे ती मात्र सदोष, अनियमित व अडचणीचीच आहे. सहकारी संस्था व तिचे घटक वा नोकर ह्यांच्यांत कांहीं वाद उद्भवला तर त्याची फिर्याद रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ह्यांजकडे दाखल करावयाची; रजिस्ट्रार ह्यांना स्वतः किंवा रजिस्ट्रार ह्यांनीं नेमलेल्या लवादानें न्यायाधिशाची भूमिका घेऊन; जरूर त्याप्रमाणें पुरावा घेऊन व चौकशी करून त्या वादाचा निर्णय द्यावयाचा अशी सहकारी न्यायदानाची पद्धति सध्यां अंमलांत आहे. इतके दिवस रजिस्ट्रार ह्यांनीं नियुक्त केलेल्या लवादाचे जोडीला उभयबाजूंच्या पक्षकारांना एक एक प्रतिनिधी नेमतां येत असे व अशाप्रकारें तयार झालेल्या लवाद-मंडळामार्फत न्यायदान होऊं शके. परंतु आतां प्रतिनिधी देऊन लवाद मंडळामार्फत वादाचा निर्णय करून घेण्याचा महत्त्वाचा हक्क नष्ट करण्यांत आला आहे; व फक्त रजिस्ट्रार अगर नियुक्त लवाद ह्यांकडेच न्यायदानाचें काम सोंपविण्यांत आलें आहे. ( बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेट-विभाग ४ पृष्ठ १७२ दि. २-८-५६ )

### उघड दिसणारे दोष

ह्या न्यायदान पद्धतींतील उघड उघड दिसणारे प्राथमिक दोष म्हणजे अशा प्रकारें नियुक्त होणारे लवाद हे अन्य व्यवसायी अथवा सुखवस्तू लोक असतात. न्यायदानाची त्यांची हौस ही एक फावल्या वेळांतील उद्योग ह्या स्वरूपाची असते व बाह्य दृष्टीनें तिला समाजकार्याचें स्वरूप असलें तरी अंतीं तिचे हेतू अर्थार्जन वा सत्ताभिलाष हेच बहुतांची असतात. ह्या लवादांना स्वतंत्र न्यायालय, कचेरी, कारकून वा दप्तर असत नाहीं. लवादांच्या घरीं किंवा अशाच कोठल्या तरी उपऱ्या जागेंत हें न्यायदानाचें काम चालतें. जबान्या लिहून घेणें व रोजनामा तयार करणें, तारखांची समज देणें वगैरे कारकुनी कामें करणें हीं सारींच कामें नियुक्त लवादानेंच स्वहस्तें करावयाचीं असतात. पक्षकारांना कागदपत्र पहावयाचें असलें तरी लवादाच्या घरीं जाऊन तिष्ठत बसावें लागतें. समन्सें काढावयाचीं व चालू प्रकरणांतील नकला घ्यावयाच्या तर त्याचीहि कांहीं सुरळीत सोपी व्यवस्था नसते व सर्वांत महत्त्वाची अडचण म्हणजे लवाद हे पगारी कायम अधिकारी नसल्यामुळें ते हमखास हवे तेव्हां जागेवर सांपडतील असा भरंवसा नसतो.

### वकील देण्यास निष्कारण बंदी

सहकारी न्यायदानांत लवादापुढें वकील देण्याचा पक्षकारांना कायदेशीर हक्क नाहीं. ह्यामुळें होणारे गोंधळ-घोटाळे तर अनिवार आहेत. नियुक्त लवाद हे वकील वा माजी न्यायाधीश असतातच असें नाहीं. न्यायदानाच्या पद्धतीचा त्यांना अनुभव नसला तर न्यायकाम कसें चालावें ह्याला कांहीं पद्धत वा निर्बंधच रहात नाहींत. आणि न्यायाऐवजीं दडपादडपीच होण्याचे प्रसंग येतात. वादी प्रतिवादी हे सहसा कायदा व कार्यपद्धति जाणणारे असत नाहींत. लवादावरच दोन्ही बाजू योग्यप्रकारें मांडून व समजावून घेण्याची जबाबदारी असते. ही पद्धत निःसंशय बेभरंवशाची आहे. वरिष्ठ न्यायालयांत सुद्धां जर एकाद्या बाजूस वकील नसतील तर पुष्कळ वेळां न्यायाधीश कोणातरी वकिलांना मुद्दाम ती बाजू न्यायालयापुढें ठामपणें मांडून न्यायदानाचे कामीं न्यायाधिशास मदत ( ॲमिकस क्यूरी Amicus Curiae ) करावयास सांगतात. अनुभवी वरिष्ठ न्यायाधीशसुद्धां अशी काळजी घेत असतांना न्यायदानाचें शिक्षण व सराव नसलेल्या लवादांना मोकाटपणें न्यायदान देण्याची मुभा असावी हें विपरीत आहे. कांहीं लवाद दोन्ही बाजूंस वकील द्यावयास परवानगी देतात; पण काम चाललें असतां उपस्थित होणारे कायद्याचे मुद्दे समजण्याची पात्रता लवादास नसेल तर वकिलांचा खटाटोप व्यर्थच ठरेल. शिवाय मुख्य मुद्दा असा कीं पक्षकारांनीं वकिलांची मदत घेण्याचा त्यांना मूलभूत हक्क असतांना तो नाहींसा करून हा प्रश्न लवादांच्या मेहेरबानीवर काय म्हणून सोंपविला जावा ?

### हेतु

सहकारी संस्था व त्यांचे घटक व नोकर ह्यांच्यांत संस्थेच्या कार्याचे व घटनेचे संबंधांत उद्भवणारे वाद नेहमींच्या दिवाणी न्यायालयांकडे न नेतां ते रजिस्ट्रार अगर नियुक्त लवाद ह्यांजकडून मिटवून घेण्याची योजना सहकारी कायद्यांत करण्याचें उद्दिष्ट असें दाखविण्यांत आलें आहे कीं, सहकारी न्यायदान सोपें, लवचिक पद्धतीचें, स्वावलंबी व बिनखर्चीचें व्हावें. सहकारी चळवळीचें उद्दिष्ट काटकसर, स्वावलंबन व सहकार ह्यांना उत्तेजन देण्याचें आहे. प्रचलित दिवाणी न्यायालयांतील न्यायदान फार खर्चाचें, विलंबाचें, त्रासाचें व जिकिरीचें आहे; तेव्हां सहकाराचें क्षेत्र दिवाणी न्यायालयांच्या अधिकाराचे कक्षेबाहेरच ठेवणें जरूर आहे.

सहकारी न्यायदानाचे वरील हेतु खरोखरीच स्तुत्य आहेत; परंतु त्यावरून एक महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो. प्रचलित न्यायदान पद्धतींत जर कांहीं दोष व उणिवा असतील तर त्या एकंदर सर्वच समाजाकरितां दुरुस्त केल्या जाव्यात; सहकारी क्षेत्र व त्या क्षेत्रांत वावरणारा समाज हा आपल्या एकंदर समाजापासून निराळा नाहीं. तेव्हां सहकारी संस्था व त्यांचेसंबंधीं ह्यांना तेवढी खास सोप्या बिनखर्चीच्या न्यायदानाची सोय आणि त्याबाहेरील समाजाला अथवा समाजव्यवहारांना मात्र खर्चाच्या व विलंबाच्या न्यायदान पद्धतीचा हा शाप असा भेदाभेद कशासाठीं ?

### लवचिक कार्यपद्धति

कोठल्याहि क्षेत्रांत वाद पडला, कीं सहकार संपला. वादाचा निर्णय पद्धतशीरपणानें व न्यायानें लागावा अशी विरोधी पक्षांची अपेक्षा असते. प्रचलित न्यायालयांतील कार्यपद्धतीची आंखणी न्यायदानावर कोणत्याहि प्रकारचे आक्षेप येऊं नयेत अशा विचारानें केलेली आहे; तिला अनेक वर्षांच्या अनुभवाचा पाठिंबा आहे; वेळोवेळीं त्या पद्धतींत आवश्यक वाटलेल्या त्या सुधारणा करण्यांत आलेल्या आहेत व अद्यापहि जरूर वाटतील त्या सुधारणा करतां येण्यास वाव आहे. सहकारी न्यायदानाचें काम लवादापुढें चालतें तें सुद्धां लवादांच्या मगदुराप्रमाणें

प्रचलित दिवाणी न्यायालयांच्या कार्यपद्धतीस धरूनच चालविण्याचा प्रयत्न असतो. मग सहकारी न्यायदान लवचिक पद्धतीनें व्हावें हा काय हेतू सांगितला जातो व तो योग्य कसा समजला जाईल ? न्यायदान पद्धतींत निश्चितता असावी, तिला स्पष्ट निर्बंध असावेत व ते विरोधीपक्षांना ज्ञात असावेत हीच वास्तविक सुरक्षित व शहाजोग न्यायदानाची मूलभूत कसोटी असून तिचें परिपालन दिवाणी न्यायालयांकडूनच काटेकोरपणानें होत असतें. मग सहकारी न्यायदान लवचिकपणानें म्हणजेच लवादाच्या लहरीनुसार चालविलें जाण्यांत फायदा कोठला ?

### स्वस्तांत न्यायदान

सहकारी न्यायदान स्वस्तांत व्हावें ह्यासाठी सुद्धां तें शेलक्या नियुक्त लवादांकडे सोंपविण्याचें कारण नाहीं. दिवाणी न्यायालयांत आजसुद्धां नादारींत कामें चालविण्याची सोय आहे. न्यायदानासाठी काय किंमत आकारावी त्याचे कायदे विधिमंडळानें केलेले असतात. न्यायालयें त्यांचें पालन करतात. विधिमंडळानें जर सहकारी खटल्यांना कोर्ट फी माफी दिली तर दिवाणी न्यायालयें फुकटांत सुद्धां सहकारी न्यायदान करूं शकतील.

### विलंब

नियुक्त लवादांच्या पद्धतीनें सहकारी न्यायदान झटपट होतें व दिवाणी न्यायालयांकडून तें झटपट होणार नाहीं असेंहि नाहीं दिवाणी न्यायालयांत सुद्धां त्वरित न्यायदान व्हावें अशा प्रकारची कार्यपद्धति स्वीकारतां येते. दिवाणी न्यायालयांतील कांहीं कामें आजसुद्धां संक्षिप्त ( समरी ) पद्धतीनें चालविलीं जातात. दिवाणी न्यायालयांतील कामकाज नेहमीं कोणत्यातरी कायद्यानें घालून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार चालतें. कायद्यानें अशी त्वरित कार्यपद्धति आंखून देऊन सहकारी न्यायदान दिवाणी न्यायालयांकडे सोंपविलें तर तें खात्रीनें त्वरित व सुरळीत होऊं शकेल. उलटपक्षीं, लवादांकडे असलेलीं कितीतरी कामें वर्षानुवर्षे रखडत पडल्याचा अनुभव आहे. सामान्यपणें सुद्धां लवादांकडील कामें दिरंगाईनेंच होतात. तेव्हां विलंब टाळण्यासाठीं सहकारी न्यायदान दिवाणी न्यायालयांकडून काढून घेण्याची आवश्यकता नाहीं.

### समाजहिताची बुद्धि

नियुक्त लवाद हे समाजहिताच्या बुद्धीनें सहकारी न्यायदानाचें काम करतात हें म्हणणें खरें मानलें तरी दिवाणी न्यायाधीश अशीच समाजहिताची बुद्धि ठेवून न्यायदान करणार नाहींत असें समजण्याचें कांहींच कारण नाहीं. उलटपक्षीं दिवाणी न्यायाधीशांना नियमित पगार असतो, अधिकार श्रेणी असते, त्यांच्या कामाचे अहवाल ठेवले जातात व त्या अहवालांच्या बरेवाईटपणावर त्यांची बढती अवलंबून असते. तेव्हां दिवाणी न्यायाधीशहि जबाबदारीनें व निरभिलाष बुद्धीनें सहकारी न्यायदान करूं शकतील.

### सहकारी न्यायालय

सारांश, सहकारी न्यायदानाचे हेतू लवाद पद्धतीनें मुळींच साध्य होत नाहींत. लवादांच्या न्यायदानांत गटबाजी, वशिलेबाजी, अनिर्बंधता, अनियमितपणा विलंब व बेभरंवसा असे सारे दोष अनुभवास येत आहेत. त्याउलट, दिवाणी न्यायालयेंच सहकारी न्यायदानसुद्धां शहाजोगपणें, पद्धतशीर रीतीनें व सुलभपणें करूं शकतील ही गोष्ट सुतराम् खरी आहे. जिल्हानिहाय व तालुक्याचे ठिकाणीं दिवाणी न्यायालयांच्या स्वतंत्र व व्यवस्थित इमारती, सुप्रतिष्ठित कचेऱ्या, सुनियंत्रित न्यायाधिकारी अशी सर्व साधनसामुग्री उपलब्ध असतांना सहकारी न्यायदान अर्धवट, अनियंत्रित, अननुभवी लवादांकडे कशासाठी सोंपवावयाचे ? नेहमींच्या न्यायाधिकाऱ्यांच्या वर्गातून फार तर सहकारी न्यायाधीश ( को–ऑपरेटिव्ह जज्ज ) म्हणून कांहीं स्वतंत्र नेमणुका व्हाव्या व ह्या न्यायाधिशांना सर्व लक्ष सहकारी कार्याकडेच लावण्याची सोय करावी; आणि त्यांच्या न्यायालयास सहकारी न्यायालय ( को–ऑपरेटिव्ह कोर्ट ) असें नांव द्यावें. मात्र नेहमींच्या दिवाणी न्यायालयांपासून ह्या न्यायालयांची कोणत्याहि प्रकारें फारकत करण्यांत येऊं नये. स्मॉल कॉज कोर्टांची रचना ज्याप्रमाणें दिवाणी न्यायालयांच्या अंतर्भूत असूनहि स्वतंत्र केलेली आहे त्याप्रमाणेंच सहकारी न्यायालयांची रचना करण्यांत यावी व त्यांत वकिलांना इतर दिवाणी न्यायालयांप्रमाणेंच पक्षकारांचीं कामें पाहण्याचा संपूर्ण हक्क असावा.

### अपेलेट ट्रिब्यूनलहि नकोच

सहकारी न्यायपद्धतींतील अपीलेंसुद्धां डिस्ट्रिक्ट जज्ज व हायकोर्ट ह्यांचेकडूनच निर्णिलीं जावींत. को–ऑपरेटिव्ह ट्रिब्यूनलची जरूरी सहकारी अपिलांसाठी असूं नये. ज्यासाठी जे लोक मुद्दाम नेमले त्यांना रिकामे ठेवून ज्यांचें जें काम नाहीं व ज्यांनीं ज्या कामाची पात्रता संपादन केलेली नाहीं त्यांना भलतेच अधिकार वापरावयास नियुक्त करावयाचें ही गोष्ट चालू "प्रावीण्यपरते" ( स्पेशलायझेशन ) च्या युगांत व एकंदर व्यवहाराच्या दृष्टीनेंहि गैर आहे. तालुकानिहाय पढित न्यायाधिकारी व त्यांच्या कचेऱ्या कामाविना मोकळ्या पडावयाच्या व महत्त्वाचें न्यायदानाचें काम गैरसोयीच्या ठिकाणीं अलवत्यागलवत्याकडे द्यावयाचें ह्यांत देशहिताची व देशाच्या साधनसामुग्रीची भयंकर हानि आहे. हायकोर्टाची सुव्यवस्थित यंत्रणा सिद्ध असतांना को-ऑपरेटिव्ह ट्रिब्यूनलच्या अपेलेट न्यायदानाचा सरंजाम कशासाठी उभारावयाचा व त्यासाठीं खर्च काय म्हणून करावयाचा ? शिवाय ह्या ट्रिब्यूनलवर पुष्कळ वेळां सेवानिवृत्त हायकोर्ट जज्जांची नेमणूक करण्यांत येते. ही पद्धत तर फारच आक्षेपार्ह आहे. कार्यक्षम वयोमर्यादेंतील न्यायाधीश ज्या हायकोर्टांत काम करीत असतात त्यांच्याकडं सहकारी अपिलें पाठवावयाचीं नाहींत आर्थिक दृष्ट्या नुकसानीचें आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपला सारा समाज एकप्रकारें समपातळीवर आला आहे. समाजांतील एक विशिष्ट गट देशाच्या हिताची विशेष कळकळ बाळगणारा व त्या गटाबाहेरील समाज बेपर्वा वृत्तीचा असा समज आतां आपल्याला सोयीस्कर वाटला तरी करून घेतां येणार नाहीं. समाजाच्या सर्व विभागांना काम मिळावें व सर्व कामाची उठावणी कार्यक्षमतेनें व्हावी व त्यासाठीं श्रमविभागासारखें उपयुक्त साधन वापरणें सर्वांच्या हिताचें आहे. ह्या दृष्टीनें विचार केल्यास सर्वप्रकारचें न्यायदान प्रस्थापित न्यायालयांकडेच सोंपविणें योग्य होईल; मग त्यासाठीं विशिष्ट क्षेत्रांतील न्यायदानाबाबत स्वतंत्र नियम करावे लागले तरी ते करतां येतात व करावयास कांहीं हरकत नाहीं.

सारांश, मूळ प्राथमिक न्यायदानाचें व त्यावरील अपिलांचें असें साऱ्यंत सहकारी न्यायदान प्रस्थापित दिवाणी न्यायालय व डिस्ट्रिक्ट जज्ज आणि हायकोर्टादि वरिष्ठ न्यायालयें ह्यांजकडेच सोंपविण्याची व्यवस्था तावडतोब करण्यांत यावी अशी आग्रहाची सूचना आहे.

# सहकारी संस्थांतील निवडणुकाबाबत लवाद दावे

( लेखकः—श्री. सदाशिव वामन कुलकर्णी, बी. ए., एलूएल्. बी., पुणें ४ )

मुंबई सहकारी सोसायट्यांच्या १९२५ च्या कायद्याचें पोट कलम ५४ ( १ ) ( ब ) प्रमाणें सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे निवडणुकीबाबत कांहीं वाद, तंटा अगर दावा निर्माण झाल्यास त्याबाबत लवाद कोर्टांत दावा केव्हां दाखल करावयास पाहिजे याबाबतची तरतूद आहे. सहकारी संस्थांच्या निवडणुका प्रतिवर्षी होतात व त्या निवडणुकांत संचालक मंडळाचे सभासद, पंचकमिटीचे सभासद, कार्याध्यक्ष, उपकार्याध्यक्ष, कार्यवाह वगैरे पदाधिकारी निवडून येतात; व वर्ष संपेपर्यंत संस्थेचें कामकाज पाहतात. प्रतिवर्षी होणाऱ्या निवडणुकांत कांहीं वेळां वाद निर्माण होतात व त्या वादाचा अगर तक्रारीचा निर्णय सदरचे कायद्याचें कलम ५४ यांत नमूद केलेल्या कोर्टाकडून करून घ्यावयाचा असतो. निवणुका होण्याचे अगोदर ठरलेल्या मुदतींत उमेदवारांना संपूर्ण माहितीसह नॉमिनेशन पेपर्स भरून पाठवावे लागतात. अशा वेळीं कांहीं नॉमिनेशन पेपर्स अपूर्ण अगर चुकांचे असे भरलेले असतात. निवडणुकीचे अगोदर अशा आलेल्या नॉमिनेशन पेपर्सची छाननी करणेचा व पात्र अगर अपात्र उमेदवार ठरवणेचा अधिकार चिकित्सा मंडळास अगर संचालक मंडळास सदरच्या सहकारी संस्थेच्या निवडणुक नियमांनीं दिलेला असतो व त्याप्रमाणें त्या त्या मंडळाकडून अशा उमेदवारांचे नॉमिनेशन पेपर्सची छाननी होऊन उमेदवारास निवडणुकीस उभे राहणेस पात्र अथवा अपात्र ठरविलें जातें. कांहीं वेळां असें अवलोकनांत येतें कीं, एकादा उमेदवार संस्थेच्या नियमाप्रमाणें उभें राहणेस अपात्र असतांनाहि सत्ताधिकाऱ्यांचे पक्षांतील अगर लोभांतील म्हणून त्यास निवडणुकीस उभें राहणेस पात्र ठरविलें जातें. अर्थातच ह्याबाबत हितसंबंधीं उमेदवार व चिकित्सा मंडळ यांचे संघर्षास सुरवात होऊन, सलोख्यानें वाद न मिटल्यास, शेवटीं प्रकरण लवाद कोर्टांत नेल्याखेरीज न्याय मिळत नाहीं. कांहीं सहकारी संस्थांनीं त्यांच्या निवडणुकीचे नियमांत अपिलाची तरतूद केलेली आढळते; परंतु शेवटीं वाद शिल्लक राहतो असें अनुभवास येतें. अशी परिस्थिति निर्माण झाल्यास सदरचा वाद म्हणजे लवाद दावा केव्हां दाखल करावयाचा ह्याबाबत प्रदीर्घ चर्चा चालू आहे.

कलम ५४ ( १ ) ( ब ) अन्वयें ज्यावेळीं पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका जाहीर होतात त्यावेळेपासून एक महिन्याचे आंत असे लवाद दावे दाखल केले पाहिजेत. त्यानंतर अगर त्या अगोदर असे लवाद दावे दाखल झाल्यास ते कायदेशीर ठरणार नाहींत. सदरचें कलम ५४ ( १ ) ( ब ) हें सदरचें कायद्यांत १९५४ सालीं घातलें गेलें. बहुतेक सहकारी संस्थांचे निवडणुकीचे नियम चाळून पाहिल्यास निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचीं नांवें वार्षिक साधारण सभेंत जाहीर करावीं लागतात; व प्रतिवर्षी निवडणुका झाल्यावर त्याप्रमाणें अध्यक्ष हे सभेंत जाहीर रीत्या निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांची यादी वाचून दाखवितात. सहकारी संस्थांच्या निवडणुकीबाबत कांहींहि तंटा अगर वाद निर्माण झाल्यास, त्या वादाचें निराकारण करून घ्यावयाचें झाल्यास, ज्या उमेदवाराचा नॉमिनेशन पेपर अयोग्य ठरवला असेल अगर फेटाळला असेल, त्या उमेदवारास वार्षिक साधारण सभेंत निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचीं नांवें जाहीर होईतोंपर्यंत थांबून राहावें लागतें व तोंपर्यंत त्यास त्याजवर झालेल्या अन्यायाची दाद मागतां येत नाहीं. एकाद्या सहकारी संस्थेच्या पंच कमिटीनें अन्यायानें एकाद्या उमेदवारास निवडणुकीस उभे राहणेस अपात्र ठरविल्यास त्या उमेदवारास तावडतोब कलम ५४ अन्वयें दावा दाखल करून दाव्याचा निकाल होऊन मिळेपर्यंत निवडणुकीस मनाई आणतां येत नाहीं व त्यास वार्षिक साधारण सभेंत निवडणुकीचा निकाल जाहीर करीतोंपर्यंत झालेल्या अन्यायास वाचा फोडतां येत नाहीं. तळमळीनें कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यास द्वेषबुद्धीनें अगर आपसांतील हेवेदावे वैमनस्यामुळें, अन्यायानें अपात्र ठरवून त्याचा नॉमिनेशन पेपर सुरवातीसच फेटाळून लावून, अपिलाची तरतूद पोटनियमांत असल्यास तेथेंहि कारवाई करून, पंचमंडळी अगर संचालक मंडळ अशा उमेदवारास निवडणुकीच्या प्रांगणांत येऊं देत नाहींत. बरें, दावा करून मनाई हुकूम आणून निवडणूक थांबवून मागावी तर दावाच कायदेशीर ठरत नाहीं. या घटनेचा अप्रत्यक्ष परिणाम फार वेगळा होत आहे. लायक उमेदवारांना अगर कार्यकर्त्यांना एकाद्या सहकारी संस्थेच्या कारभारांत लक्ष घालावयाचें असल्यास अधिकारी मंडळावरील सदस्यांना दुखवून भागत नाहीं; नाहींतर अशा उमेदवाराचा नॉमिनेशन पेपर अपात्र ठरवून त्यास निवडणुकीस उभें राहाणेस मूलतःच मज्जाव करतां येतो. अशा अपात्र ठरविलेल्या उमेदवारास चरफडत वार्षिक साधारण सभेपर्यंत स्वस्थ बसण्याखेरीज दुसरें गत्यंतर नाहीं. त्यानंतर लवाद दावा दाखल करीतोंपर्यंत पंचकमिटी अगर संचालक मंडळ अस्तित्वांत येऊन कामकाजास सुरवात करतें, व संस्थेच्या खर्चानें त्या दाव्याचा परामर्ष घेतला जातो. लवाद कोर्टांत दाव्याचा निर्णय होईपर्यंत ७–८ महिने सहज निघून जातात व पुढें अपिलाची तरतूद असल्यामुळें पुढील ३–४ महिन्यांचा काळ सहज काढतां येतो. एवढ्या मुदतींत वर्ष संपून जाऊन नव्या निवडणुकीसाठीं नवे नॉमिनेशन पेपर्स मागवणेची वेळ येते व लवाददावा दाखल केलेला वादी हा कंटाळून जाऊन दाव्याचें अगर अपिलाचें काम मध्येंच सोडून देतो.

सहकारी संस्थांतील पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका ह्या खऱ्या अर्थानें लोकशाही तत्त्वावर आधारलेल्या आहेत. परंतु वर उल्लेख केल्याप्रमाणें एकाद्या लायक कार्यकर्त्यास वर्षानुवर्षें संचालक मंडळावर अगर पंचकमिटींत येऊं द्यावयाचें नाहीं असें सत्ताधिकारी संचालक अगर पंच मंडळींनीं ठरविल्यास तें अशक्य होणार नाहीं. लायक व प्रामाणिक सहकारी कार्यकर्ते ह्यामुळें उद्वेगजनक परिस्थितींत सांपडून सहकारी चळवळीपासून अलिप्त राहूं लागले आहेत. सहकार-प्रेमी कार्यकर्त्यांनीं ह्याबाबत योजना करणें आवश्यक आहे.


**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखकः –श्री. वा. काळे, संपादक, “ अर्थ ”

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

## मुंबई राज्यांतील कांहीं मोठ्या सेंट्रल व अर्बन सहकारी बँका

**( श्री. बी. आर. केंभावी, बी. ए., ऑनर्स )**

| सेंट्रल बँका | खेळतें भांडवल (००० रु.) | एकूण ठेवी (००० रु.) | एकूण उत्पन्न (०००रु.) | एकूण ठेवींशीं प्रमाण % | | | | | एकूण उत्पन्नाशीं प्रमाण % | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वसूल भांडवल | रिझर्व्ह | हातांतील व बँक शिल्लक | रोखे | कर्ज | वसूल व्याज | दिलेलें व्याज | पगार भत्ता | इतर खर्च | निवळ नफा |
| १. मुंबई स्टेट को. बँक | १५,३९,९१ | १२,८५,९७ | ४५,६२ | ६·१ | ४·४ | १९·१ | ५०·० | ४६·६ | ९१·२ | ४२·४ | २४·५ | ११·५ | १३·६ |
| २. सुरत डि. सेंट्रल को. बँक | ३,८७,३२ | ३,५०,५६ | ९,९० | २·४ | ५·१ | ५५·० | ३६·५ | १७·२ | ९४·८ | ३५·० | २०·६ | २३·० | २१·५ |
| ३. पूर्व खानदेश ,, ,, | ३,२७,१९ | २,४१,५३ | १३,१८ | ९·९ | १०·३ | २६·० | ४०·० | ६६·५ | ९२·६ | २८·७ | २९·१ | १९·५ | २२·७ |
| ४. कर्नाटक ,, ,, | २,४९,३२ | २,०९,१० | १०,५४ | ८·६ | ५·७ | २४·९ | १८·६ | ६८·४ | ९२·४ | ४०·३ | ३८·० | ११·२ | १०·५ |
| ५. पुणें ,, ,, | २,३८,६३ | २,०५,०१ | १०,०८ | ५·४ | ४·४ | २५·४ | ३१·७ | ५७·१ | ९३·८ | ४५·५ | २८·९ | १०·७ | १४·९ |
| ६. बेळगांव ,, ,, | १,६७,३३ | १,४४,८१ | ७,५८ | ९·० | ५·५ | १७·२ | १८·६ | ७३·१ | ८८·९ | ३९·६ | ३१·८ | १६·० | १२·६ |
| ७. भडोच ,, ,, | १,६६,९५ | ९१,९५ | ५,०७ | १५·० | ७·६ | ८२·६ | ४८·१ | ४७·६ | ९६·५ | ३५·९ | १५·८ | ३२·९ | १५·४ |
| ८. अहमदाबाद ,, ,, | १,४५,६७ | ८४,६३ | ५,७२ | ९·४ | ६·० | ४२·४ | ४१·२ | ६१·२ | ९६·२ | ४६·५ | १८·९ | ९·३ | २५·३ |
| **अर्बन बँका** | | | | | | | | | | | | | |
| १. सारस्वत को. बँक | १,७०,०६ | १,५२,६८ | ४,९८ | ५·२ | ४·६ | ९·१ | ६९·९ | २९·४ | ९९·० | ४८·८ | २०·० | १३·२ | १८·० |
| २. मुंबई मर्कंटाइल को. बँक | १,०९,८४ | ९५,७२ | ४,०९ | ४·७ | २·६ | २६·६ | २६·८ | ३०·४ | ७५·५ | १५·२ | ३८·२ | ३५·० | ११·२ |
| ३. सुरत पीपल्स को. बँक | १,०२,६० | ८८,३६ | ३,५६ | ३·९ | ६·६ | ३०·७ | ३३·३ | ३४·६ | ९५·५ | ४१·९ | २७·८ | १७·७ | १२·६ |
| ४. नगर डि. अ. सें. को. बँक | ७५,६१ | ६२,३२ | ३,५४ | ६·० | १०·१ | २४·४ | ३३·६ | ५२·१ | ८३·३ | ३१·६ | ३४·२ | २२·१ | १२·१ |
| ५. शामराव विठ्ठल ,, | ६७,३४ | ५७,६२ | ३,१५ | ५·५ | ६·१ | ३·२ | ६३·४ | ४३·३ | ९८·४ | ५३·६ | २५·४ | ११·२ | ९·८ |
| ६. एस. बी. पारडी पीपल्स ,, | ५२,६८ | ४५,१३ | १,२१ | ३·८ | ६·९ | ३२·४ | ३०·७ | ३१·१ | ८०·१ | १४·० | ३७·२ | १३·३ | ३५·५ |
| ७. कराड अर्बन ,, | ३५,३३ | २८,८४ | १,८८ | ५·१ | १२·० | ९·० | ५७·० | ५१·१ | ८९·४ | ५८·५ | ६·४ | २१·१ | १३·८ |
| ८. इचलकरंजी अर्बन ,, | २९,०६ | २४,७९ | १,४३ | ५·० | ८·७ | १५·४ | ५८·० | ४२·९ | ९०·१ | ५९·४ | १४·० | ७·० | १९·६ |


# दि कल्याण पीपल्स

## को-ऑपरेटिव्ह बँक लि. कल्याण

पो. बॉ. नं. ११ ] स्थापना: ४ जून, १९२३ [ टे. नं. ५५

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| भरलेलें भांडवल | रु. | ३,१४,९१० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ३,९४,२५६ |
| खेळतें भांडवल | रु. | १८,१८,३४० |

**मुख्य ऑफिस :**

सबनीस वकील यांची इमारत, टिळक चौक, कल्याण.

शाखा : ★ डोंबिवली ★ शहापूर व ★ अंबरनाथ

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

: डायरेक्टर बोर्ड :

चेअरमन

श्री. दौलतराव जयरामराव झुंजारराव

मॅनेजिंग डायरेक्टर

श्री. गंगाधर वासुदेव भिडे

डायरेक्टर्स

श्री. पांडुरंग शिवराम देशमुख
श्री. देवानंद जेठा राजा
श्री. महंमद इब्राहीम अजमुद्दीन भावे
श्री. कृष्णाजी लक्ष्मण भिडे
श्री. विठ्ठलदास मुरारजी
श्री. पुरुषोत्तम गणपतराम जोशी

मॅनेजर

बाळकृष्ण बाबुराव रुद्रभटे



# धी चाळीसगांव पीपल्स

## को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

चाळीसगांव, पूर्व खानदेश.

स्थापना १९४६

३०-९-५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| (१) झालेलें भाग भांडवल | रु. | ९५,६५० |
| (२) रिझर्व्ह व इतर फंड | रु. | ६६,८३१ |
| (३) खेळतें भांडवल | रु. | ३,९०,८३० |

: कार्यवाहक मंडळ :

(१) श्री. दाजी काशीनाथ भंडारी, प्रेसिडेंट.
(२) श्री. पांडुरंग वामन अंतापूरकर, व्हा. प्रेसिडेंट
(३) श्री. नथू काळू वाणी
(४) श्री. रामराव फकिरराव देशमुख
(५) श्री. पन्नालाल रामनारायण जोशी
(६) श्री. रामचंद्र कोंडू वाणी
(७) श्री. कालूराम हजारीमल दायमा

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

सोनें, शेतीचा माल व इतर व्यापारी मालाचे तारणावर, इमारतींचे तारणावर व वैयक्तिक पतीवर, कर्जाचे व्यवहार केले जातात. तसेंच चालू, सेव्हिंग्ज बँक व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

मुदतीच्या ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर.

विशेष माहिती चौकशीअंतीं समक्ष अगर पत्रद्वारें.

स. वा. महेंद्रळे,
मॅनेजर.

# हिंदी औद्योगिक उत्पादनांत वाढ

भारतातील औद्योगिक उत्पादनांत १९५६ च्या पूर्वार्धांत बरीच वाढ झाली आहे. या कालावधींत औद्योगिक उत्पादनाचा सरासरी निर्देशांक ( मूळ प्रमाण १९५१ = १०० धरून ) १२७.३ वरून १३६.८ वर गेला. या कालांतील निर्देशांक १९५५ च्या पूर्वार्धातील निर्देशांकापेक्षा ९.३ टक्क्यांनीं व त्या अखेरच्या वर्षार्धापेक्षा ७.५ टक्क्यांनीं जास्त आहे.

### पोलाद, सिमेंट व कोळसा

या कालावधींत पोलादाचें उत्पादन ६.४३ लाख टनांवर गेलें. १९५५ च्या पूर्वार्धातील हाच आंकडा ६.३७ लाख टन होता. १९५५ च्या उत्तरार्धापेक्षा हा आंकडा १९,००० टनांनीं जास्त आहे.

सीमेंटचें उत्पादन या कालांत २४.६२ लाख टन झालें. जानेवारी–जून १९५५ चा हा आंकडा २१.३० लाख टन तर त्यापूर्वीच्या उत्तरार्धाचा २२.७५ लाख टन होता. या अवधींत नवीन कारखान्यांसाठी ३ व जुन्या कारखान्यांच्या वाढीसाठी ९ मिळून १२ परवाने देण्यांत आले.

कोळशाच्या उत्पादनांतहि १९५५ च्या पूर्वार्धातील १९२ लक्ष टनांवरून या कालांत १९६ लक्ष टनांपर्यंत वाढ झाली. गतवर्षीच्या उत्तरार्धातील उत्पादनापेक्षा हा आंकडा ६.२५ लाख टनांनीं जास्त आहे.

### गिरणी कापड

गिरणी कापडाचें उत्पादन या अवधींत १९५५ च्या पूर्वार्धातील उत्पादनापेक्षा ७६० लक्ष वारांनीं वाढून २५,८३९ लक्ष वारावर गेलें. त्याचप्रमाणें तागी मालाचें उत्पादनहि या कालावधींत ५.७६ लाख टनांवर गेलें. १९५५ च्या पूर्वार्धाचा हा आंकडा ५.०८ लाख टन, तर त्या वर्षाच्या उत्तरार्धाचा हा आंकडा ५.१९ लाख टन होता.

### इंजिनिअरिंग माल

अनेक इंजिनिअरिंग धंद्यांच्या उत्पादनांत विशेष वाढ झाली. ऑइल प्रेशर लँम्प्सचें उत्पादन ९,८०० नें वाढून ४३,२०० वर गेलें. बोल्ट, नट, रिव्हेटस व डॉग स्पाइक्स यांचें उत्पादन २,८८१ टनांनीं वाढून १३,५५२ टनांवर गेलें. तसेंच मशीन स्क्रूचें उत्पादन ४.४९ लाख ग्रोसांवरून ६.७४ लाख ग्रोसांवर गेलें.

रेझर ब्लेडचें उत्पादन या कालांत गतवर्षीच्या पूर्वार्धापेक्षा कांहींसें कमी झालें. तसेंच ॲल्युमिनियम, ॲंटिमनी, शिसें, वगैरे धातूंच्या उत्पादनांतहि १९५५ च्या पूर्वार्धापेक्षा घट झाली आहे.

### यंत्रें, इंजिनें, मोटारी व सायकली

यंत्रें तयार करण्याच्या धंद्यांत या कालावधींत बरीच प्रगति झाली. शिवण्याच्या यंत्रांचें उत्पादन १७,१७४नें वाढून ६३,६५९ वर गेलें. विजेवर चालणाऱ्या पंपांचें उत्पादन ६४२ नें वाढून ५,६५५ वर गेलें. तसेंच डिझेल इंजिनें, रिंग स्पिनिंग फ्रेम्स, इत्यादींच्या उत्पादनांतहि बरीच वाढ झाली. मशीन टूल्सचें उत्पादन ७.२८ लाख रु. किंमतीच्या मालानें वाढून ४०.६४ लाख रु. किंमतीच्या मालापर्यंत गेलें.

मोटारींचें उत्पादन जानेवारी–जून १९५५ मध्यें ११,००० होतें. जानेवारी–जून १९५६ चा हा आंकडा १५,०३३ वर गेला. त्याचप्रमाणें सायकलींचें उत्पादनहि २,२०,००० वरून २,९१,००० वर गेलें.

### रासायनिक धंदा

रासायनिक धंद्यांत कॉस्टिक सोडा, सोडा ॲश, द्रव क्लोरिन, ब्लीचिंग पावडर, यांच्या उत्पादनांत या अवधींत बरीच वाढ झाली, तर अमोनियम सल्फेट व सुपर फॉस्फेटचें उत्पादन जवळ जवळ स्थिर राहिलें. रंगपदार्थांचें उत्पादन १९.४४ लाख रत्तलांवरून २७.५३ लाख रत्तलांवर गेलें. साबण, रंग, प्लास्टिक मोल्डिंग्ज, इत्यादि वस्तूंच्या उत्पादनांतहि वाढ झाली आहे.

### रेडिओ सेट, विजेचे दिवे, इत्यादि

बहुतेक सर्व विद्युत्विषयक धंद्यांतील उत्पादनांतहि बरीच वाढ झाली आहे. ही वाढ कॉंडिट पाइप, इलेक्ट्रिक ट्रान्सफॉर्मर्स व रेडिओ सेट यांत विशेष दिसून येते. रेडिओ सेटसचें उत्पादन १९५५च्या पूर्वार्धातील ३५,४६२ वरून या कालावधींत ७१,३४२ वर गेलें. विजेच्या दिव्यांचें उत्पादनहि २९.९० लाखांनीं वाढून १४१.५५ लाखांवर गेलें तर विजेच्या पंख्यांचें उत्पादन १५,००० नें वाढून १,५६,७०० वर गेलें. रेफ्रिजिरेटर्सच्या उत्पादन संख्येंत ९९ नें वाढ होऊन ती ४७४ वर गेली.

ही दीपावलि बँकेचे सभासद, खातेदार व हितचिंतक यांना आनंदाची व सुखाची जावो !

**जनता सहकारी बँक लिमिटेड**

८६६ सदाशिव पेठ, पुणें २.
फोन नं. २८८५

सेव्हिंगचा दर : द. सा. द. शें. दोन टक्के

अल्प मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर वा इतर माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.

★ मध्यम व गरीबांसाठी आकर्षक बचत योजना.
★ कार्यक्षम व तत्पर व्यवस्थापक-मंडळाची देखरेख.
★ रेल्वे रिसीट, हुंड्या, चेक्स, वगैरे वसुलीची व्यवस्था
★ शेअर्स खरेदी, विक्री, वगैरे व्यवहाराची सोय.

याशिवाय अद्यावत् बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

द. शं. जमदग्नि, मॅनेजिंग डायरेक्टर

# परदेशी हुंडणावळ मिळवून देणारा झाडपाला !

## हिंदी चहाचा धंदा

भारतांतील उद्योगधंद्यांत चहाच्या धंद्याला महत्त्वाचें स्थान आहे. भारतांत एकूण ६,६०० चहाचे मळे असून त्यांनीं ७,८९,४९० एकर क्षेत्र व्यापलेलें आहे, आणि त्यांचें वार्षिक उत्पादन ६६·४ कोटी पौंड, चहा एवढें आहे. चहाच्या धंद्यांत सुमारें ११३ कोटी रुपये भांडवल गुंतलेलें आहे. १९५५–५६ मध्यें, ह्या धंद्यानें एक्साइज कराच्या रूपानें १७ कोटी रुपये दिले. चहाच्या मळ्यांत १० लक्ष लोकांना काम मिळतें. प्लायवुड, सिरॅमिक्स, कोळसा, सिमेंट, खतें, चहाविषयक यंत्रसामुग्री, वहातुक, इत्यादि व्यवसायांसहि चहाच्या धंद्यामुळें मोठा हातभार लागतो. जगाच्या चहाच्या मागणीपैकीं निम्मी मागणी एकट्या भारताकडून पुरविली जाते; १९५५–५६ मध्यें चहानें भारताला १०९ कोटी रुपयांची हुंडणावळ मिळवून दिली.

चहाच्या मळ्याचें सरासरी क्षेत्र वेगवेगळ्या ठिकाणीं वेगवेगळें आढळतें. आसाममध्यें तें ३८९·१ एकर आहे, तर प. बंगालमध्यें तें ६०९ एकर आहे. मद्रासमध्यें २,१२२ मळे असून त्यांचें क्षेत्र २१,९०० एकर आहे. म्हणजे, तेथें प्रत्येकी सरासरीं १०·३ एकर एवढीच पडते, तर कांग्रा खोऱ्यांत २०१५ मळे आहेत पण त्यांनीं भारताच्या एकूण चहाक्षेत्रापैकीं फक्त १·१८% क्षेत्र व्यापलेलें आहे.

भारतांतील ८०% लागवड ब्रिटिशांच्या हातीं आहे. नोंदलेल्या चहाच्या कंपन्यांची संख्या वाढत गेली आहे. १९४४–४५ मध्यें त्यांची संख्या ४७३ होती, व त्यांचें वसूल भांडवल १५ कोटी रु. होतें. १९५४–५५ मध्यें त्यांची संख्या ५६७ झाली असून त्यांचें वसूल भांडवल २७ कोटी रुपये झालें आहे.

उत्पादक देशांतील भारताचें उच्च स्थान खालील तक्ता स्पष्ट करील :—

**चहाचें देशवार उत्पादन**

( लक्ष पौंड )

| | १९५० | १९५१ | १९५२ | १९५३ | १९५४ | १९५५ |
|---|---|---|---|---|---|---|
| ई. भारत | ५०८० | ५०९० | ५०७० | ४८५० | ५१३० | ५३३० |
| द. भारत | ९८० | ११५० | ११३० | १२०० | १२८० | १२९० |
| पाकिस्तान | ५२० | ५२० | ५१० | ५४० | ५४० | ५२० |
| सिलोन | ३०६० | ३२६० | ३१६० | ३४३० | ३६६० | ३८०० |
| इंडोनेशिया | ७८० | १०१० | ८१० | ८०० | १०३० | ९५० |
| पू. आफ्रिका. | ३७० | ३७० | ३७० | ३५० | ४५० | ४७० |
| जपान | ९२० | ९७० | १२६० | ९८० | १४९० | उपलब्ध नाहीं |
| फोर्मोसा | २१० | २३० | २५० | २६० | २८० | |
| इतर | १६० | २२० | २७० | २०० | २२० | |

ब्रिटिश मळेवाल्यांचे मळे हिंदी भांडवलदार हळूहळू खरेदी करूं लागले, तेव्हां त्यांना अडचणीहि बऱ्याच आल्या. बँकांकडून त्यांना खेळतें भांडवल मिळूं शके, परंतु नव्या लागवडीसाठीं तें मिळणें कठीण जाई हिंदी मळेवाल्यांनीं ह्या अडचणींना तोंड देऊन मळे यशस्वी केल्यानंतर त्यांच्या भांडवलाचा प्रश्न सुटण्यास मदत झाली. विशेषतः बंगालमधील बँकांनीं मळेवाल्यांना बरेच


५०

वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा
करीत असलेलें मुंबईतील एक
प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी
खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



**दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि., राहुरी**

राहुरी तालुक्यांतील ४३ गांवांतील शेतकऱ्यांनीं भांडवल जमवून उभारलेला कारखाना. या कारखान्यांतून १५ डिसेंबर १९५६ पासून शुभ्र दाणेदार साखर दररोज सुमारें १००० ते १२०० पोतीं बाहेर पडेल. मशिनरीची वाहतुक चालू असून मशिनरी उभारणीचें कामहि जोरांत चालू आहे.

(१) इंडस्ट्रियल लायसन्स नं. एल–८ दि. ५–१–५५
(२) रजिस्टर नं. जी. २६३ दिनांक ३–११–१९५४
(३) एकूण सभासदसंख्या ९१५,
(४) अधिकृत भांडवल ५० लाख ( पन्नास लाख )

::: संचालक मंडळ :::

(१) श्री. वा. पुं. वर्दे — चेअरमन
बी. कॉम. ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर मुंबई राज्य, को. ऑ. बँक, मुंबई बँक नॉमिनी.
(२) श्री बाबुराव बापुजी तनपुरे—व्हाईस चेअरमन–राहुरी
(३) श्री. लक्ष्मणराव बळवंतराव पाटील–डायरेक्टर–देवळाली प्रवरा
(४) श्री. अनंतराव शंकरराव धावडे „ राहुरी
(५) श्री. चंद्रभान रूपचंद डाकले „ बेलापूर खुर्द
(६) श्री. विश्वनाथ दादाजी मुसमाडे „ देवळाली प्रवरा
(७) श्री. शिवराम पांडुरंग राजुळे „ बेलापूर खुर्द
(८) श्री. किसन गंगाराम पाटील „ कोल्हार खुर्द
(९) श्री. बापुजी रामजी पाटील „ बेलापूर खुर्द
(१०) श्री. मुनशीबेग पापाबेग इनामदार „ देवळाली प्रवरा
(११) श्री. प्रा. धनंजयराव गाडगीळ(तज्ज्ञ)„ पुणें
(१२) श्री. पी. डी. कसबेकर–स्पेशल ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी को. ऑ. शुगर फॅक्टरीज, बॉम्बे स्टेट पुणें. —डायरेक्टर
(१३) श्री. कलेक्टरसाहेब अहमदनगर डिव्हिजन „
(१४) श्री. एक्झिक्युटिव्ह इंजिनियरसाहेब अहमदनगर डिव्हिजन „

मॅनेजर व सेक्रेटरी—श्री. य. द. खोले
चीफ अकौंटंट—श्री. द. वि. खडपेकर
असि. सेक्रेटरी—श्री. पा. वा. पवार

## दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

स्थापना ] बेळगांव [ १९४२

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ६२,८२० |
| एकूण रिझर्व्ह फंड | रु. ५४,९७७ |
| एकूण ठेवी | रु. ५,२३,५२२ |
| इनुव्हेस्टमेंटस् | रु. २,८३,६९४ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६,५९,२१२ |

★ या बँकेंत सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ व्याजाचे दर आकर्षक आहेत, याचा ठेवीदारांनीं अवश्य फायदा घ्यावा.

★ बँक सुरुवातीपासून " अ " वर्गांत आहे.

विशेष माहितीसाठी भेटा.

ए. के. सोमणाचे, सेक्रेटरी.

जी. एम्. मातकांडे, चेअरमन.



स्थापना सन १९३१ ━━━ फोन क्रमांक ५३

## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली.

जिल्हा–दक्षिण सातारा. | शाखा :—(१) माधवनगर

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. १,७९,०१० |
| रिझर्व्ह फंड | रु. १,१७,१०८ |
| इतर फंडस् | रु. १,६६,१५८ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ३७,९८,०१९ |

(१) माल गहाणावर अत्यंत सवलतीचे दरानें कर्जें दिलीं जातात.

(२) सरकारी कर्जरोखे व इतर सर्व प्रकारच्या ट्रस्टी सिक्यूरिटीज याची व अन्य, शेअर्स, डिबेंचर्स याची खरेदी–विक्री माफक कमिशन घेऊन करून दिली जाते.

(३) सर्व प्रकारची बिलें व पेन्शन्स वसूल केलीं जातात.

(४) सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय केली आहे.

(५) मुंबई, पुणें, हुबळी, बेळगांव, मद्रास, बँगलोर या ठिकाणचे ड्राफ्टस मिळूं शकतील.

इतर सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

ल. य. लायू, B. A., LL. B., मॅनेजर.

वा. वि. वाटवे, B. A., LL. B., चेअरमन.



## दि महाड को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., महाड

जि. कुलाबा.

— स्थापना १९३१ —

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ८७,५०० |
| रिझर्व फंड | रु. ५६,००० |
| इतर फंडस् | रु. ७०,००० |
| ठेवी | रु. ८,१५,००० |
| खेळतें भांडवल | रु. ११,००,००० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सभासदांस व्यक्तिशः रु. २०,००० पर्यंत कर्ज देणारी कुलाबा जिल्ह्यांतील ही एकच बँक आहे.
ठेवीवरील व्याजाचे दर आकर्षक आहेत.
मोठमोठ्या व्यापारी पेठा असलेल्या गांवीं ड्राफ्ट देण्याची योजना आहे.

*ही दिवाळी आमचे खातेदारांस व हितचिंतकांस सुखाची जावो.*

द. न. वैद्य, B.A.,LL.B. चेअरमन

पी. गो. मेथा B.A.,LL.B. मॅ. डायरेक्टर

मा. गो. धारप, B. Sc. (Hon.)H.D.C. मॅनेजर



## दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

कराड ( जिल्हा–उत्तर सातारा )

स्थापना : १९१७] [फोन नं. ४३

| | |
|---|---|
| भाग भांडवल | रु. २,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. १,४६,६३० |
| खेळतें भांडवल | रु. ३४,६१,५६१ |

चेक, हुंड्या, रेल्वे, रिसिट्स, वगैरेंची वसुली योग्य दरांत केली जाते. निरनिराळ्या विमा कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची सोय आहे. आकर्षक दरानें चालू, सेव्हिंग्ज, मुदत ठेव, वगैरे प्रकारच्या ठेवी स्वीकारणे वगैरे बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.

शकर पुरुषोत्तम कुलकर्णी
मॅनेजिंग डायरेक्टर.

# दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

## मुख्य कचेरी—पुणें २

स्थापना—१९३८

शाखा : १. पुणें लष्कर, २. बारामती, ३. श्रीरामपूर,
४. लोणावळा, ५. खोपोली, ६. ओझर, जि. नाशिक

## एकूण खेळतें भांडवल रु. ६५ लाखांचेवर

: बोर्ड ऑफ डायरक्टर्स :


अध्यक्ष :—१. श्री. के. पां. जोशी, वकील.

२. श्री. का. म. महाजन, (उपाध्यक्ष) ३. श्री. बा. भ. वाळवेकर,
४. श्री. बी. पी. केळकर, ५. सौ. इंदुमतीबाई फडके,
६. श्री. रा. भ. गिरमे, ७. श्री. रा. प्र. दामोदरे.

## आम्ही आपली सेवा सतत १८ वर्षें करीत आहोंत.


रा. बा. साळवेकर, बी. ए., एलएल. बी.
नी. ना. क्षीरसागर,
} मॅनेजिंग डायरेक्टर्स

## आणि आतां



FIAT the new 1100

## अधिक सुंदर—अधिक आरामशीर
## शिवाय कमा केलेली किंमत



टे. फो. नं. ३५०३ दि प्रीमियर गॅरेज, नवा पूल, पुणें ५


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण मुद्रणालयांत श्री. केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्री. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' **दुर्गाधिवास** ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.